# Criterion VII

# News Paper Clippings

सकाळ

, मंगळवार, ३ जानेवारी २०१७



प्रत्येक महाविद्यालयात कौशल्य विकास योजना सुरू करण्याचा निर्णय चांगला आहे. मात्र, याची अंमलबजावणी करताना काही खासगी संस्थांना नेमले आहे. असे कोर्सेस थेट महाविद्यालयांना सुलभ पद्धतीने मिळणे आवश्यक आहे. विद्यापीठ किंवा थेट शासनाच्या माध्यमातून असे अभ्यासक्रम राबवावेत. शासनाने विद्यार्थ्यांचे शुल्क द्यावे.

**- प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, बुर्ला महिला महाविद्यालय**

सुराज्य सोलापूर
दि. १० जानेवारी २०१७ 7

# बुर्ला महिला महाविद्यालयाचे योगासन स्पर्धेत यश

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ओ. आर बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाने योगासन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. ही योगासन स्पर्धा सोलापूर विद्यापीठ अंतर्गत बार्शी येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये तुळसी जाधव, शिवबाई हेगडे, अश्विनी मैल, भावना संभारम, गौरी पासकंटी व माधुरी कामूर्ती या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. डॉ. रजनी दळवी यांचे विद्यार्थिनींना मार्गदर्शन लाभले होते. पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, विश्वस्त मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आणि सर्व शिक्षक शिखकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

३ पुढारी | शुक्रवार १३ जानेवारी २०१७

# महिलांनी धैर्याने अत्याचारापासून रक्षण करावे : पोलिस निरीक्षक कुरी

**सोलापूर : प्रतिनिधी**

समाजातील विकृत मनोवृत्तीच्या व्यक्ती कायद्याला घाबरतातच असे नाही, यामुळे महिलांनी समाजात वावरताना अशा विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तींकडून होणाऱ्या अत्याचारापासून धैर्याने स्वत:चे रक्षण करावे. स्वत:वर येणाऱ्या अशा प्रसंगाचा खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने प्रतिकार करावा, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक विजया कुरी यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समिती आणि महाराष्ट्र शासन पुरस्कृत एकात्मिक बालविकास सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जाणीव जागृती अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा बाल सर्वेक्षण अधिकारी धर्मपाल शाहू होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. रजनी दळवी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचा परिचय करुन देण्यात आला. त्यानंतर उपस्थित व्यासपीठावरील सर्वांचा बुर्ला महिला महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

पोलिस निरीक्षक विजया कुरी पुढे बोलताना म्हणाल्या की, महिलांच्या जीवनात शिक्षणाला फार महत्त्व आहे. शिक्षण घेत असताना मुलांकडून अनेक आमिषे दाखविली जातात. कधी स्मार्ट फोन तर कधी कुठे फिरायला नेण्याचे आमिष दाखवले जाते. महिला अशा आमिषामुळे लैंगिक अत्याचाराला बळी पडतात. तेव्हा महिलांनी मुलांच्या अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. अशा आमिषामुळे लैंगिक अत्याचाराला महिला बळी पडतात. तेव्हा महिलांनी मुलांच्या अशा कोणत्याही अत्याचाराला बळू पडू नये. अशी आमिषे धुडकावून लावून समाजात आत्मविश्वासाने व खंबीरपणे वावरावे. तरच महिलांची लैंगिक अत्याचारापासून मुक्तता होऊ शकेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन थोरात यांनी केले. स्वागत शीतल ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी, तर आभार सुनीता बनसोडे यांनी मानले. यावेळी जयश्री दर्गोपाटील, वैशाली कोळी, सुवर्णा गुंगे, स्नेहा कुलकर्णी, सविता जगताप, शैलजा धुमाळ, पवार व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

३ पुढारी | शुक्रवार १३ जानेवारी २०१७

# महिलांनी धैर्याने अत्याचारापासून रक्षण करावे : पोलिस निरीक्षक कुरी

सोलापूर : प्रतिनिधी

समाजातील विकृत मनोवृत्तीच्या व्यक्ती कायद्याला घाबरतातच असे नाही, यामुळे महिलांनी समाजात वावरताना अशा विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तींकडून होणाऱ्या अत्याचारापासून धैयनि स्वत:चे रक्षण करावे. स्वत:वर येणाऱ्या अशा प्रसंगाचा खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने प्रतिकार करावा, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक विजया कुरी यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समिती आणि महाराष्ट्र शासन पुरस्कृत एकात्मिक बालविकास सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जाणीव जागृती अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा बाल सर्वेक्षण अधिकारी धर्मपाल शाहू होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. रजनी दळवी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचा परिचय करुन देण्यात आला. त्यानंतर उपस्थित व्यासपीठावरील सर्वांचा बुर्ला महिला महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

पोलिस निरीक्षक विजया कुरी पुढे बोलताना म्हणाल्या की, महिलांच्या जीवनात शिक्षणाला फार महत्त्व आहे. शिक्षण घेत असताना मुलांकडून अनेक आमिषे दाखविली जातात. कधी स्मार्ट फोन तर कधी कुठे फिरायला नेण्याचे आमिष दाखवले जाते. महिला अशा आमिषामुळे लैंगिक अत्याचाराला बळी पडतात. तेव्हा महिलांनी मुलांच्या अशा कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. अशा आमिषामुळे लैंगिक अत्याचाराला महिला बळी पडतात. तेव्हा महिलांनी मुलांच्या अशा कोणत्याही अत्याचाराला बळू पडू नये. अशी आमिषे धुडकावून लावून समाजात आत्मविश्वासाने व खंबीरपणे वावरावे. तरच महिलांची लैंगिक अत्याचारापासून मुक्तता होऊ शकेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन थोरात यांनी केले. स्वागत शीतल ढेपे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी, तर आभार सुनीता बनसोडे यांनी मानले. यावेळी जयश्री दर्गोपाटील, वैशाली कोळी, सुवर्णा गुंगे, स्नेहा कुलकर्णी, सविता जगताप, शैलजा धुमाळ, पवार व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कर्देहळ्ळी : बुर्ला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोपाप्रसंगी संस्थेचे सचिव दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, जगन्नाथ कोळी, डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

# राष्ट्रीय सेवा योजना समाजप्रबोधनाचे माध्यम

संचार वृत्त सेवा

**दक्षिण सोलापूर, दि. ९-** गावाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी शिबिरार्थींनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली असून राष्ट्रीय सेवा योजना हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी केले.

कर्देहळ्ळी येथे पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी गोप बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, विश्वस्त रमेश विडप, लक्ष्मीकांत गड्डम, मल्लिकार्जुन सरगम, श्रीनिवास पोशम, कर्देहळ्ळीचे सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले.

यावेळी प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्यासह शिबिरार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले.

४ पुढारी | शुक्रवार १३ जानेवारी २०१७

# बुर्ला महाविद्यालयातर्फे श्रमसंस्कार शिबिर

**सोलापूर : प्रतिनिधी**

बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर कर्दे हळ्ळी (ता. द. सोलापूर) येथे झाले. शिबिरात प्रा. श्रीनिवास गुंडेली यांनी बदल्यात काळातील समाजरचना आणि समाजातील व्यवहार यांची सांगड घालणे अतिशय आवश्यक आहे. तरुणांनी समाजातील व्यवहाराचे जे बदलते स्वरुप आहे, त्या गोष्टी अवगत करून जीवन सन्मुख विचाराने जगावे, असे मत त्यांनी मांडले. यावेळी त्यांनी रोकडविरहीत व्यवहाराशी संबंधित सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनची माहिती ग्रामस्थांना दिली.

अध्यक्षस्थानी ग्रा.पं. सदस्य मीनाक्षी वाघमारे या होत्या. यावेळी प्रा. रंजना बनसुडे, प्रा. शिरीष भोसले व शिबिरार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रजनी दळवी यांनी, तर आभार प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.

३ पुढारी | शनिवार १४ जानेवारी २०१७

# बुर्ला महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग

**सोलापूर (प्रतिनिधी) :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे झाले. या शिबिरात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिराच्या समारोपप्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावाला व समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी शिबिरार्थींनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून प्रबोधनाचे पारायण केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. या कार्यक्रमाच्यावेळी सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम व विश्वस्त मंडळ रमेश विडप, लक्ष्मीकांत गड्डम, मल्लिकार्जुन सरगम, श्रीनिवास पोशम, सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वडजे यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा. रंजना बनसुडे, प्रा.डॉ.टी.व्ही. शिंदे, प्रा.डॉ. अशोक यक्कलदेवी, ग्रामस्थ, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.tarunbharat.org
, १८ जानेवारी २०१७ ११

# अभ्यासक्रम जीवनोपयोगी असावेत : डॉ.सांगोलेकर



**सोलापूर, दि. १७ जानेवारी-** उदारीकरणामुळे युग सुरु होऊन २५ वर्षात काळ संपत आला आहे. याकाळात सर्व क्षेत्रात अनेक आव्हाने निर्माण झाली. उच्च शिक्षणातून या आव्हानांचा सामना करण्यात आपण यशस्वी होत आहोत. पण त्याचबरोबर अभ्यासक्रम जीवनोपयोगी ठरेल असा तयार करण्यावर भर दिला पाहिजे. असे प्रतिपादन डॉ.अविनाश सांगोलेकर यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय व सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी, हिंदी व इतिहास या विषयाच्या बी.ए. भाग-१ च्या अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.सोपान जावळ यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.सांगोलेकर म्हणाले की, महाविद्यालयीन स्तरावील शिक्षण घेत असलेला विद्यार्थी अद्यावत आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना विद्यार्थ्यांला केंद्रस्थानी ठेवावे, अशा विद्यार्थ्यांला पेलेल असा अभ्यासक्रम तयार करण्याबरोबर तो विद्यार्थी काळाची आव्हाने पेलू शकेल याचे शिक्षण देणारा तो असावा याची देक्षता घेतली जावी. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे म्हणाले की, आजच्या परिवर्तनाच्या काळात विषयाचे अभ्यासक्रम काळानुरुप असावेत याकडे लक्ष दिले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. प्राजक्ता जोशी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.श्रृती वडगळाळकर यांनी केले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
बुधवार । १८ जानेवारी २०१७ । पान ६

बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय व सोलापूर विद्यापीठ आयोजित कार्यशाळा

# अभ्यासक्रम जीवनोपयोगी असावेत : डॉ. सांगोलकर

प्रतिनिधी

सोलापूर : उदारीकरणाचे युग सुरू होऊन २५ वर्षाचा काळ संपत आला आहे. या काळात सर्व क्षेत्रात अनेक आव्हाने निर्माण झाली. उच्च शिक्षणातून या आव्हानांचा सामना करण्यात आपण यशस्वी होत आहोत. पण त्याचबरोबर अभ्यासक्रम जीवनोपयोगी ठरेल, असा तयार करण्यावर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलकर यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ओ. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी, हिंदी व इतिहास या विषयाच्या बी.ए.भाग-१ च्या अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सोपान जावळे यांची उपस्थिती होती. डॉ. सांगोलकर म्हणाले की, महाविद्यालयीन स्तरारील शिक्षण घेत असलेला विद्यार्थी अद्ययावत आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेवावे. अशा विद्यार्थ्यांना पेलेल असा अभ्यासक्रम करण्याबरोबर तो विद्यार्थी काळाची आव्हाने पेलू शकेल याचे शिक्षण देणारा तो असावा, याची दक्षता घेतली जावी. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, आजच्या परिवर्तनाच्या काळात विषयाचे अभ्यासक्रम काळानुरूप असावेत याकडे लक्ष दिले पाहिजे.

प्रास्ताविक डॉ. टी. एन. शिंदे यांनी केले. कार्यक्रमास सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सुराज्य सोलापूर दि. १९ जानेवारी २०१७ 6

# शिवाजी महाराजांचे सोलापूरशी अजोड नाते : देशमुख

सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याने सोलापूर जिल्ह्याची माती पवित्र झाली आहे. पुरंदरच्या तहानंतर छत्रपती शिवाजी महाराज मंगळवेढ्यास आले असता त्यांनी तिथे २१ दिवस वास्तव्य केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा वारसा अनेक सरदार घराण्यांनी पुढे चालविला असून त्र्यंबकराव पेठे, बापू गोखले आणि बापू चव्हाण हे सरदार सोलापूरसाठी लढले होते,असे प्रतिपादन जेष्ठ इतिहास संशोधक गोपाळराव देशमुख यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालय आणि सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए. भाग १ साठी एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत गोपाळराव देशमुख मराठा सत्तेचा उदय आणि सोलापूर जिल्हा याविषयी ते बोलत होते.



बुर्ला महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी बोलताना गोपाळराव देशमुख. यावेळी डॉ.राजेंद्र शेंडगे, डॉ. जावळे आदी.

व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राचार्य डॉ. सोपान जावळे, डॉ. नभा काकडे, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे आणि प्रा. सुमन केंद्रे, प्रा. संगशेट्टी, डॉ. टी.एन.शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना देशमुख म्हणाले की, सोलापूर जिल्हा हा पराक्रमाने आणि वैभवशाली इतिहासाने भारलेला आहे. हा इतिहास जिल्ह्यातील तालुक्यातील वाडे, गढ्या, किल्ले आणि शिलालेखात आहे. इतिहासाच्या अभ्यासकांनी हा इतिहास उलगडला पाहिजे.

प्रास्ताविक पूजा जक्का हिने केले. सूत्रसंचालन प्राची पाटील हिने केले. तर उपस्थितांचे आभार मनीषा भोसले हिने मानले. सदर कार्यक्रमास डॉ. शिवानंद भांजे आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

सकाळ
सोलापूर, मंगळवार, २४ जानेवारी २०१७
२



सोलापूर : ए. आर. बुर्ला महाविद्यालयातील कार्यशाळेत बोलताना गोपाळराव देशमुख, सुमन केंद्रे, डॉ. नभा कांकडे, डॉ. टी. एन. शिंदे.

# छत्रपतींचे सोलापूरशी अजोड नाते : देशमुख

**सोलापूर, ता. २३ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याने सोलापूरची माती पावन झाली आहे. पुरंदरच्या तहानंतर महाराज मंगळवेढ्यास आले होते. त्याठिकाणी ते २१ दिवस वास्तव्यास होते. महाराजांचा हा वारसा अनेक सरदार घराण्यांनी पुढे चालविला, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे सोलापूरशी अजोड नाते असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक गोपाळराव देशमुख यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत 'मराठा सत्तेचा उदय आणि सोलापूर जिल्हा' या विषयावर ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राचार्य डॉ. सोपान जावळे, डॉ. नभा काकडे, डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, सुमन केंद्रे, डॉ. टी. एन. शिंदे उपस्थित होते.

# शिवरायांचे सोलापूरशी अजोड नाते : देशमुख

शहर संचार

सोलापूर, दि. १९- छत्रपती शिवरायांच्या वास्तव्याने सोलापूर जिल्ह्याची माती पावन झाली असून पुरंदरच्या तहानंतर शिवरायांनी मंगळवेढ्यात २१ दिवस वास्तव्य केले होते. त्यामुळे त्यांचे सोलापूरशी अजोड नाते होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक गोपाळराव देशमुख यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेत ते 'मराठा सत्तेचा उदय आणि सोलापूर जिल्हा' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. सोपान जावळे, डॉ. नभा काकडे, डॉ. राजेंद्रसिंग लोखंडे, प्रा. सुमन केंद्रे, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. संगशेट्टी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक पूजा जक्का हिने केले.

देशमुख पुढे म्हणाले, शिवरायांचा वारसा चालविणारे त्र्यंबकराव पेठे, बापू गोखले आणि बापू चव्हाण हे सोलापूर जिल्ह्याचे सरदार घराणे होते. त्यामुळे आपला जिल्हा पराक्रम आणि वैभवशाली इतिहासाने भारलेला असून तो गड किल्ले आणि शिलालेखात दडल्याचे नमूद केले. कार्यशाळेस प्रा. डॉ. शिवानंद भांजे यांच्यासह जिल्ह्यातील इतिहासाचे प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राची पाटील हिने केले तर मनीषा भोसले हिने आभार मानले.

# बालाजी अमाइन्सतर्फे बुर्ला महाविद्यालयास ११ लाखांची देणगी

प्रतिनिधी । सोलापूर

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ए. आर. बुर्ला महाविद्यालयाला बालाजी अमाइन्स लिमिटेडने ११ लाख रुपयांची देणगी दिली. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सचिव दशरथ गोप आणि इतर विश्वस्तांनी तो स्वीकारला. त्याच्या कृतज्ञता सोहळ्यात बालाजी अमाइन्सचे सहव्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांचा गौरव करण्यात आला.

महाविद्यालयाची नवीन वास्तू राजेंद्र चौकातील कामगार कल्याण केंद्रासमोरील जागेत बांधण्यात येत आहे. त्याच्या विस्तारासाठी या निधीचा विनियोग व्हावा, त्यातून तेलुगू भाषिक विद्यार्थ्यांची उन्नती व्हावी, अशा सदिच्छा श्री. रेड्डी यांनी या वेळी दिल्या. महाविद्यालयाच्या नूतन वास्तूमध्येच शुक्रवारी कृतज्ञता सोहळा झाला. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, वास्तुरचनाकार यादगिरी कोंडा आदी उपस्थित होते. डॉ. रजनी दळवी यांनी सूत्रसंचालन केले. श्री. गोप यांनी आभार मानले. यापूर्वी सराफ व्यापारी सुरेश बिटला यांनी ११ लाख रुपयांची देणगी दिली होती.

## विद्यार्थ्यांना मदत देऊ

तेलुगू भाषक विद्यार्थी अतिशय कष्टातून शिकत असतात. त्यांना शैक्षणिक सुविधा पुरवल्यास ही मुले खूप पुढे जातील. बुर्ला महाविद्यालयाच्या नव्या वास्तूमध्ये स्पर्धा परीक्षांचे केंद्र सुरू करावे. त्यातून एमपीएससी, यूपीएससी परीक्षांची तयारी व्हावी. गरीब विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा खर्च बालाजी फाउंडेशन करण्यास तयार आहे."

डी. राम रेड्डी, सहव्यवस्थापकीय संचालक, बालाजी अमाइन्स




राम रेड्डी यांचा सत्कार करताना संस्थेचे पदाधिकारी.

# बालाजी अमाइन्सतर्फे बुर्ला महाविद्यालयास ११ लाखांची देणगी

प्रतिनिधी । सोलापूर

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ए. आर. बुर्ला महाविद्यालयाला बालाजी अमाइन्स लिमिटेडने ११ लाख रुपयांची देणगी दिली. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सचिव दशरथ गोप आणि इतर विश्वस्तांनी तो स्वीकारला. त्याच्या कृतज्ञता सोहळ्यात बालाजी अमाइन्सचे सहव्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांचा गौरव करण्यात आला.

महाविद्यालयाची नवीन वास्तू राजेंद्र चौकातील कामगार कल्याण केंद्रासमोरील जागेत बांधण्यात येत आहे. त्याच्या विस्तारासाठी या निधीचा विनियोग व्हावा, त्यातून तेलुगू भाषिक विद्यार्थ्यांची उन्नती व्हावी, अशा सदिच्छा श्री. रेड्डी यांनी या वेळी दिल्या. महाविद्यालयाच्या नूतन वास्तूमध्येच शुक्रवारी कृतज्ञता सोहळा झाला. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, वास्तुरचनाकार यादगिरी कोंडा आदी उपस्थित होते. डॉ. रजनी दळवी यांनी सूत्रसंचालन केले. श्री. गोप यांनी आभार मानले. यापूर्वी सराफ व्यापारी सुरेश बिटला यांनी ११ लाख रुपयांची देणगी दिली होती.

## विद्यार्थ्यांना मदत देऊ

तेलुगू भाषक विद्यार्थी अतिशय कष्टातून शिकत असतात. त्यांना शैक्षणिक सुविधा पुरवल्यास ही मुले खूप पुढे जातील. बुर्ला महाविद्यालयाच्या नव्या वास्तूमध्ये स्पर्धा परीक्षांचे केंद्र सुरू करावे. त्यातून एमपीएससी, यूपीएससी परीक्षांची तयारी व्हावी. गरीब विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा खर्च बालाजी फाउंडेशन करण्यास तयार आहे."

डी. राम रेड्डी, सहव्यवस्थापकीय संचालक, बालाजी अमाइन्स



राम रेड्डी यांचा सत्कार करताना संस्थेचे पदाधिकारी.

संचार २ सोलापूर, शनिवार २१ जानेवारी २०१७

# बुर्ला महिला महाविद्यालयास बालाजी अमाईन्सकडून ११ लाख

## नवीन वास्तू साकारणार

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. २०- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाईन्सच्यावतीने ११ लाखांची देणगी देण्यात आली.

महाविद्यालयात आयोजित कृतज्ञता सोहळ्यात बालाजी अमाईन्सचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी ११ लाखांचा धनादेश संस्थेकडे सुपुर्द केला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे होते. संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, बिराजदार यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रेड्डी म्हणाले, तेलुगू भाषिक कष्टाळू आहेत. आज या समाजातील मुली मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेत आहेत. यामुळे महिलांचा उध्दार करण्याचे काम येथे मोठ्या परिश्रमाने चालू आहे. तेलुगू भाषिक मुलींनी याचा उपयोग करून उच्च शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा. समाजातील इतर घटक एकत्र येऊन समजाचा विकास साधतात, सरकारकडून अनुदान मिळवितात. अशावेळी तेलुगू भाषिकांनी एकत्रित येऊन समाजाच्या विकासाचा विचार केला पाहिजे. शिक्षणात आघाडी घेतली पाहिजे. समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या पाहिजेत, असे सांगून या नूतन वास्तूमध्ये एमपीएससी व युपीएससी परीक्षेचे केंद्र सुरू करावे. स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींचा एमपीएससी व यूपीएससीच्या परीक्षेपर्यंतचा खर्च बालाजी फाऊंडेशन करेल असे त्यांनी सांगितले.

यावेळी अॅड. क्यातम यांनी आपल्या मनोगतातून बालाजी अमाईन्स लिमिटेडने महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी देणगी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार दिनेश यन्नम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार गोप यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, रामुलू मच्छा, रमेश केदारी, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली, लक्ष्मीकांत गड्डम, हरीश कोंडा, संगीता इंदापुरे, प्रसाद श्रीराम, कॉन्ट्रॅक्टर अनिल पाटील आदी उपस्थित होते.




सोलापूर : बुर्ला महाविद्यालयाच्या नूतन इमारतीसाठी बालाजी अमाईन्सचे राम रेड्डी यांनी ११ लाखांचा धनादेश संस्थेला दिला. यावेळी पांडुरंग दिड्डी, श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, दिनेश यन्नम व अन्य.

# तेलुगू भाषिक मुलींनी शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा : रेड्डी

सोलापूर/प्रतिनिधी

तेलुगू भाषिक समाज फार पूर्वी येथे आला. आज समाजातील मुली मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेत आहेत. यामुळे महिलांचा उध्दार करण्याचे काम येथे प्रत्यक्ष मोठ्या परिश्रमाने चालू आहे. तेलुगू भाषिक मुलींनी याचा उपयोग करुन उच्च शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा, असे प्रतिपादन सोलापूर येथील प्रसिध्द उद्योगपती व बालाजी अमाईन्सचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाईन्स लिमिटेडने ११ लाख रुपयांची देणगी दिली आहे.

कृतज्ञता सोहळा महाविद्यालयाच्या नूतन वास्तूमध्ये आयोजित केला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, यादगिरी कोंडा आणि बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

रेड्डी पुढे म्हणाले की, 'समाजातील इतर घटक एकत्र येऊन आपल्या समाजाचा विकास करत आहेत. सरकारकडून अनुदान मिळवत आहेत. अशावेळी तेलुगू भाषिकांनी एकत्रित येऊन समाजाच्या विकासाचा वापर केला पाहिजे.' प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार दिनेश यन्नम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी उपस्थितांचे आभार मानले.



ए.आर. बुर्ला महाविद्यालयाच्या नवीन वास्तुसाठी ११ लाखाचे देणगी पांडुरंग दिड्डी यांना देताना बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, रामुलू मच्छा, रमेश केदारी, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली, लक्ष्मीकांत गड्डम, हरिष कोंडा, संगीता इंदापुरे, प्रसाद श्रीराम, कॉन्ट्रॅक्टर अनिल पाटील, महाविद्यालय सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

सोलापूर, रविवार, २२ जानेवारी २०१७/३

TODAY सकाळ

# तेलुगु भाषिक मुलींनी शिक्षणात ठसा उमटवावा

## राम रेड्डी ; बुर्ला महाविद्यालयात कृतज्ञता सोहळा

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. २१ : तेलुगु भाषिक नागरिक खूप कष्टाळू आहेत. या समाजात महिला सक्षमीकरणाचे काम वेगाने सुरू असून, मुलींनी उच्च शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा, असे प्रतिपादन बालाजी अमाइन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाइन्सने अकरा लाखांची देणगी दिल्यानिमित्त आयोजित कृतज्ञता सोहळ्यात श्री. रेड्डी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, यादगिरी कोंडा व श्री. बिराजदार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींचा एमपीएससी, यूपीएससी परीक्षेचा खर्च बालाजी फाउंडेशन करेल, अशी घोषणा श्री. रेड्डी यांनी केली. ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी कृतज्ञता व्यक्त केली. श्री. यन्नम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रजनी दळवी यांनी सूत्रसंचालन केले. दशरथ गोप यांनी आभार मानले.

कार्यक्रमास विश्‍वस्त व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, रामलू मच्छा, रमेश केदारी, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली, लक्ष्मीकांत गड्डम, हरीश कोंडा, संगीता इंदापुरे, प्रसाद श्रीराम, अनिल पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




सोलापूर : ए. आर. बुर्ला महाविद्यालयाच्या नूतन इमारतीकरिता उद्योजक राम रेड्डी यांच्याकडून धनादेश स्वीकारताना दशरथ गोप, रमेश केदारी, ॲड. श्रीनिवास क्यातम, विजयकुमार गुल्लापल्ली, दिनेश यन्नम, पांडुरंग दिड्डी, श्री. बिराजदार, यादगिरी कोंडा, रमेश विडप, हरीश कोंडा आदी.

संचार सोलापूर, रविवार २२ जानेवारी २०१७ ९

# बुर्ला महिला महाविद्यालयात क्रीडा सप्ताह

सोलापूर, दि. २१- 'महाविद्यालयीन वयाच्या विद्यार्थ्यांचे जीवन सळसळत्या उत्साहात भरलेले असते. अशा वयात वेगवेगळ्या खेळ प्रकारात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले पाहिजे', असे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी सांगितले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात क्रीडा सप्ताहानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. क्रीडा दिनानिमित्त कबड्डी, स्लो सायकलिंग, फास्ट सायकलिंग, धावणे या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. डॉ. रजनी दळवी व डॉ. आर. के. वडजे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संजय लांडगे, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. विलास निंबाळकर, प्रा. शिरीष भोसले, डॉ. श्रुती वडगबाळकर, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. तुकाराम शिंदे, सविता मल्लाडे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. इंदापुरे, प्रा. नादरगी यांनी या स्पर्धा परिश्रमपूर्वक पार पाडल्या.

सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि. २४ जानेवारी २०१७ 9

# समाजाने नोंद घ्यावी असे जगा : डॉ. बंडगर

✔ सोलापूर/प्रतिनिधी

'माता' आणि 'माती' या दोन शब्दांमध्ये वेलांटीचा फरक आहे. हा फरक म्हणजेच माणसाचे आयुष्य असते. अशा या आयुष्यात रडत बसू नका तर लढा. समाजाने नोंद घ्यावी असे जगा, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी केले.

ते पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महविद्यालयाचे देणगीदार कै. रामचंद्र बुर्ला यांच्या पत्नी कै. अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांची २७ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. श्रीनिवास क्यातम होते. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव श्रीधर चिट्ट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त संगीता इंदापुरे, हरीश कोंडा, ॲड. श्रीनिवास कटकूर, श्रीनिवास आकेन, शशिकला आकेन, इंदिरा रच्चा, सुवर्णा येमूल आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. बंडगर पुढे म्हणाले की, वाचन करण्यासारखं लिहा आणि कुणीतरी आपल्याबाबत लिहावं असे जगा तरच तुम्ही कीर्तीरुप व्हाल. समाजात असे जगणाऱ्यांचीच जयंती वा पुण्यतिथी साजरी केली जाते,' 'नवरा मुलगा हा नवरी मुलीपेक्षा उंच असावा. नवरीने नवऱ्या मुलाच्या डाव्या बाजूला बसले पाहिजे. अशा परंपरेतून समाजात स्त्री आणि पुरुष यांच्यात विषमता निर्माण झाली आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी स्वत:ला बदललं पाहिजे', असे ते म्हणाले.

प्रास्ताविक प्राचाय डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. शिरीष भोसले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



बुर्ला महाविद्यालयात अनुसया बुर्ला यांच्यां पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन करताना माजी कुलगुरू बाबासाहेब बंडगर, ॲड. श्रीनिवास क्यातम, श्रीधर चिट्याल आदी.

लोकमत २ | सोलापूर, मंगळवार, दि. २४ जानेवारी २०१७



पद्मशाली शिक्षण संस्थेस ११ लाखांची देणगी दिल्याबद्दल बालाजी अमाईन्सचे राम रेड्डी यांचा सत्कार करताना सचिव दशरथ गोप. छायाचित्रात पांडुरंग दिड्डी, व्यंकटेश आकेन, श्रीधर चिट्याल, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदी.

# पद्मशाली शिक्षण संस्थेस रेड्डी यांची ११ लाखांची देणगी

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाईन्सचे राम रेड्डी यांनी ११ लाखांची देणगी दिली आहे. याचा कृतज्ञता सोहळा महाविद्यालयाच्या नूतन वास्तूमध्ये आयोजित करण्यात आला होता.

अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, यादगिरी कोंडा, बिराजदार यांची उपस्थिती होती.

नूतन वास्तूमध्ये एमपीएससी व युपीएससी परीक्षा केंद्र सुरु करावे. स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींचा एमपीएससी व युपीएससी परीक्षेपर्यंतचा खर्च बालाजी फाउंडेशन करेल, असे आश्वासन राम रेड्डी यांनी यावेळी केले. महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी देणगी दिल्याबाबत ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी बालाजी अमाईन्सची कृतज्ञता व्यक्त केली. प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार दिनेश यन्नम यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, रामुलु मच्छा, रमेश केदारी, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली, लक्ष्मीकांत गड्डम, हरिष कोंडा, संगीता इंदापुरे, प्रसाद श्रीराम, अनिल पाटील आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

३ पुढारी मंगळवार २४ जानेवारी २०१७

# तेलुगु भाषिक मुलींनी शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा : राम रेड्डी

सोलापूर : प्रतिनिधी

तेलुगु भाषिक समाज फार पूर्वी येथे आला. तेलुगु भाषिक लोक फार कष्टाळू आहेत. आज या समाजातील मुली मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेत आहेत. यामुळे महिलांचा उद्धार करण्याचे काम येथे प्रत्यक्ष मोठ्या परिश्रमाने चालू आहे. तेलुगु भाषिक मुलींनी याचा उपयोग करून उच्च शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा, असे प्रतिपादन सोलापूर येथील उद्योगपती व बालाजी अमाईन्सचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी केले.

पद्मशालीशिक्षणसंस्थासंचलितए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाईन्स कंपनीने अकरा लाख रुपयांची देणगी दिली आहे. याबाबत कृतज्ञता सोहळा महाविद्यालयाच्या नूतन वास्तूमध्ये आयोजित केला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, बिराजदार यांची उपस्थिती होती.



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी बालाजी अमाईन्सचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी अकरा लाख रुपयांची देणगी दिली. यावेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

सम रेड्डी पुढे म्हणाले, समाजातील इतर घटक एकत्र येऊन आपल्या समाजाचा विकास करीत आहेत. सरकारकडून अनुदान मिळवत आहेत. अशावेळी तेलुगु भाषिकांनी एकत्रित येऊन समाजाच्या विकासाचा विचार केला पाहिजे. शिक्षणात आघाडी घेतली पाहिजे. यावेळी त्यांनी नूतन वास्तूमध्ये एमपीएससी व युपीएससी परीक्षेचे केंद्र सुरु करावे, असे सांगून स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींना एमपीएससी वा युपीएससी परीक्षेपर्यंतचा खर्च बालाजी फाऊंडेशन करेल, असे घोषित केले.

यावेळी अॅड. श्रीनिवास क्यातम यांनी आपल्या मनोगतातून बालाजी अमाईन्स कंपनीचे महाविद्यालयाच्या नूतन वास्तूसाठी देणगी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार दिनेश यन्नम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार दशरथ गोप यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, मल्लिकार्जुन सरगम, रामुलू मच्छा, रमेश केदारी, रमेश विडप, विजय गुल्लापल्ली, लक्ष्मीकांत गड्डम, हरिप कोंडा, संगीता इंदापुरे, प्रसाद श्रीराम, अनिल पाटील, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.tarunbharat.org
मंगळवार, २४ जानेवारी २०१७ ११

# तेलगु भाषिक मुलींनी शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा : रेड्डी

## बालाजी अमाईन्सतर्फे संस्थेला अकरा लाखाची देणगी



अे. आर बुर्ला महाविद्यालयाच्या नुतन इमारतीस बालाजी अमाईन्सचे संचालक राम रेड्डी यांनी दिलेल्या देणगीचे धनादेश स्विकारताना सचिव दशरथ गोप व इतर मान्यवर.

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-** तेलगु भाषिक लोक फार कष्टाळू आहेत, आज या समाजातील मुली मोठया संख्येने उच्च शिक्षण घेत आहेत. तेलगु भाषिक मुलींनी याचा उपयोग करुन उच्च शिक्षणात वेगळा ठसा उमटवावा असे प्रतिपादन उदयोगपती राज रेड्डी यांनी केले आहे.

अे. आर. बुर्ला महाविदयालयाच्या नुतन वास्तूसाठी बालाजी अमाइन्स लिमीटेडने एकरा लाखाची देणगी दिली आहे याबाबत कृतज्ञता सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग दिड्डी होते यावेळी व्यासपिठावरती ॲड श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, श्रीधर चिटयाल, दिनेश यन्नम, डॉ राजेंद्र शेंडगे, यादगिरी कोंडा, बिराजदार उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना राम रेड्डी म्हणाले कि, या नुतन वस्तूमध्ये एमपीएससी, युपीएससी परिक्षा केंद्र सुरु करावे. या स्पर्धा परिक्षा देऊ इच्छिणाऱ्या गुणवत्ताप्रात्प विदयार्थीनीचा परिक्षेचा खर्च बालाजी फौंडेशन करील असे घोषित केले.

यावेळी श्रीनिवास क्यातम यांनी आपल्या मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनेश यन्नम यांनी केले.सुत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले शेवटी दशरथ गोप यांनी आभार मानले.

संचार ४ सोलापूर, बुधवार २५ जानेवारी २०१७

# समाजाने नोंद घ्यावी असे जगा : डॉ. बंडगर

शहर संचार

सोलापूर, दि. २४- माता आणि माती या दोन शब्दांमध्ये केवळ एका वेलांटीचा फरक असून हा फरक म्हणजेच माणसाचे आयुष्य असते. अशा आयुष्यात रडत बसू नका तर लढा आणि समाजाने नोंद घ्यावी असे जगा, असे आवाहन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी केले.

पूर्व विभाग वाचनालयात पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात महाविद्यालयाचे देणगीदार रामचंद्र बुर्ला यांच्या पत्नी अनसूयाबाई बुर्ला यांची २७ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बंडगर बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. श्रीनिवास क्यातम हे होते. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, विश्वस्त संगीता इंदापुरे, हरीश कोंडा, ॲड. श्रीनिवास कटकूर, श्रीनिवास आकेन, शशिकला आकेन, इंदिरा रच्चा, सुवर्णा येमूल आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम शिंदे यांनी करून दिला.



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयातर्फे अनसूयाबाई बुर्ला यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर, डॉ. राजेंद्र शेंडगे, ॲड. श्रीनिवास क्यातम, दिनेश यन्नम व अन्य.

डॉ. बंडगर पुढे म्हणाले, आपण समाजाचे काही देणे लागतो याचे भान ठेवून सर्वांनी वागले पाहिजे. काळानुसार आपल्यात बदल न केल्यास नामशेष होण्याची भीती असते. या कार्यक्रमास प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी केले तर प्रा. शिरीष भोसले यांनी आभार मानले.

सकाळ ५
सोलापूर, बुधवार, २५ जानेवारी २०१७

## बुर्ला कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

सोलापूर, ता. २४ : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (ता. २८) पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयातील विणकर सभागृहात होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. संजय नवले हे प्रमुख पाहुणे म्हणून तर पांडुरंग दिड्डी अध्यक्षस्थानी असतील.

सुराज्य
सोलापूर
, दि. २५ जानेवारी २०१७ 9

# शनिवारी बुर्ला महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा २७ वा वार्षिक पारितोषीक वितरण समारंभ शनिवार २८ रोजी होत आहे. कन्ना चौकातील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयातील विणकर सभागृहात हा समारंभ सकाळी ९.३० वा. सुरू होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील डॉ. संजय नक्ले हे प्रमुख पाहुणे आहेत तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी भूषविणार आहेत. हा कार्यक्रम संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम व सर्व विश्वस्त यांच्या उपस्थितीत होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख डॉ.आर.के.वडजे आणि क्रीडा विभाग प्रमुख डॉ.रजनी दळवी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

३ पुढारी | गुरुवार २६ जानेवारी २०१७

# अंनिस शहर शाखा अध्यक्षपदी प्राचार्य राजेंद्र शेंडगे

**सोलापूर (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या सोलापूर शहर शाखेची (जिल्हा लिड शाखा) २०१७ची पदाधिकारी आणि कार्यवाह यांची बिनविरोध निवड झाली. शहर शाखेच्या पदांची निवड सुधाकर काशिद यांच्याअध्यक्षतेखाली पार पाडली. अध्यक्षपदी प्राचार्य राजेंद्र शेंडगे, कार्याध्यक्षपदी व्ही. डी. गायकवाड, सचिवपदी कुंडलिक मोरे, कायदेविषयक सल्लागारपदी ॲड. गोविंद पाटील, विविध उपक्रम देविदास येमूल, बुवाबाजी संघर्ष यशवंत फडतरे, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प दत्तात्रय खंडेराव, वार्तापत्र विभाग सुहास जोशी, सांस्कृतिक विभाग रोहिदास क्षीरसागर, युवा सहभाग निलेश साबळे, महिला सहभाग रश्मी प्रक्षाळे, निधी संकलन आर.डी. गायकवाड, जातीअंत संकल्प विभाग लालनाथ चव्हाण अशी निवड करण्यात आली. यावेळी प्रा. केदारीनाथ सुरवसे, रविंद्र मोकाशी, ब्रम्हानंद धडके, डॉ. सुरेश व्यवहारे, निशा भोसले, मधुरा सलवारू, अंजली नान्नल, निनाद शहा, उषा शहा उपस्थित होते. अंनिस सोलापूर जिल्हा कार्यवाह सुधाकर काशिद यांनी यावेळी मार्गदर्शन केले. हा अहवाल महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे. आभार व्ही.डी. गायकवाड यांनी मानले.

# बहुभाषक असणे काळाची गरज

शहर संचार

**सोलापूर, दि. २८-** ज्ञान जिथून मिळते तिथून ते ग्रहण केले पाहिजे. ज्ञान मिळण्याचे भाषा हे प्रभावी माध्यम आहे. भारतीय भाषा संपन्न आहेत. भारतीय भाषेत ज्ञानाचे प्रचंड भांडार आहे, असे ज्ञान आत्मसात करण्यासाठी विविध भाषा आत्मसात केल्या पाहिजेत. इंग्रजी भाषाही शिकली पाहिजे. यामुळेच आज बहुभाषक असणे ही काळाची गरज बनत आहे, असे प्रतिपादन डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी केले.

बुर्ला महिला व वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित इंग्रजी संभाषणं कौशल्य वर्ग व तेलुगू लिपी वर्गाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.

वडगबाळकर पुढे म्हणाल्या की, आजच्या स्पर्धेच्या युगात आपले स्थान टिकविण्यासाठी प्रत्येकांना इंग्रजी भाषा येणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होण्यासाठी इंग्रजी भाषा हे माध्यम आहे. त्यासाठी विद्यार्थिनींनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन केले पाहिजे.

यावेळी श्वेता जेऊरकर व राधाबाई यरझल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक वैष्णवी कुडक्याल यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री सुरवसे यांनी केले, तर आभार निकिता कैरमकोंडा यांनी मानले.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
मंगळवार, ३१ जानेवारी २०१७




# समाजाने नोंद घ्यावी असे जगा : डॉ. बंडगर

**सोलापूर, दि. ३० जानेवारी -** माता आणि माती या दोन शब्दामध्ये वेलांटीच्या फरक आहे. हा फरक म्हणजेच माणसाचे आयुष्य असते. अशा या आयुष्यात रडत बसू नका तर लढा. समजाने नोंद घ्यावी असे जगा. वाचन करण्यासारखं लिहा आणि कुणी तरी आपल्याबाबत लिहावं असे जगा तरच तुम्ही किर्तीरुप व्हाल. समाजात असे जगणाऱ्यांचीच जयंती व पुण्यतिथी साजरी केली जाते. असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.बाबासाहेब बंडगर यांनी केले.

अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयाचे देणगीदार रामचंद्रशेठ बुर्ला यांच्य पत्नी कै.सौ.अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांची २७ वी पुण्यतिथी साजरा करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड.श्रीनिवास क्यातम होते. व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव श्रीधर चिटयाल, खजिनदार दिनेश यत्रम, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, विश्वस्त, संगीता इंदापुरे, हरिष कोंडा, ॲड.श्रीनिवास कट्कूर, श्रीनिवास आकेन, शशिकला आकेन, इंदिरा रच्चा आणि सुवर्णा येमूल आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांनी केले. पाहुण्यांच्य परिचय डॉ.तुकाराम शिंदे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ.श्रृती वडगबाळकर यांनी करुन दिला. तर उपस्थितांचे आभार प्रा.शिरीष भोसले यांनी मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीउपस्थित होते.

३ पुढारी | बुधवार १ फेब्रुवारी २०१७

# शिक्षणामुळेच महिलांच्या जीवनात क्रांती : डॉ. नवले

**सोलापूर : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले यांनी सनातनी वर्गाचे दगडधोंडे झेलून महिलांच्या शिक्षणाचा मार्ग तयार केला. आज महिला या मार्गाने जाताना विविध क्षेत्रात यशस्वी भरारी घेत आहेत. शिक्षणामुळेच एकेकाळी समाजाने घरात कोंडून ठेवलेल्या महिलांना समाजात सन्मान प्राप्त होत आहे. शिक्षणामुळेच महिलांच्या जीवनात ही क्रांती घडून आली आहे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे डॉ. संजय नवले यांनी केले.



**सोलापूर : विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. संजय नवले. यावेळी ॲड. श्रीनिवास क्यातम, दिनेश यन्नम, श्रीधर चिटयाल, संगीता इंदापुरे, रमेश विडप, रामलु मच्छा, डॉ. आर.के. वडजे.**

बुर्ला महिला महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयातील विणकर सभागृहात आयोजित केला होता. याप्रसंगी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम होते. व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव श्रीधर चिटयाल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त रमेश विडप, रामलु रच्चा, संगीता इंदापुरे, पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख डॉ.आर.के. वडजे, संस्थेचे माजी सचिव अविनाश कोंडा आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. नवले पुढे म्हणाले की, शिक्षण, शिक्षक, फळा, डस्टर आणि खडू यांचा ज्यांनी शोध लावला त्यांचे आभार मानले पाहिजे. कारण हे शिक्षण माणूस बनण्याचे साधन बनले. अशा शिक्षणामुळेच म[illegible]सातील हिंस्त्रपणा, रानटीपणा कमी [illegible]ला. माणसातील शहाणपणा जा[illegible]ला. माणसा[illegible]ल माणूसपणाची [illegible] पटू लागली. उद्ध्वस्त होत चाललेल्या समाजाला सावरून धरण्याचे सामर्थ्य अशा शिक्षणातच आहे. म्हणून सर्वांनी शिक्षणाचे पावित्र्य जपले पाहिजे, तरच आपला भविष्यकाळ सुरक्षित राहील.

याप्रसंगी शैक्षणिक पारितोषिकाचे वाचन डॉ. ॲनी जॉन व प्रा. श्रीनिवास गुंडेली यांनी केले. क्रीडाविषयक पारितोषिकाचे वाचन डॉ. रजनी दळवी यांनी केले. सांस्कृतिक पारितोषिकाचे वाचन डॉ. तुकाराम शिंदे यांनी केले. डॉ. प्राजक्ता जोशी व डॉ. शिवानंद भांजे यांचा पीएच.डी. प्राप्त केल्याबाबत सोलापूर विद्यापीठाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त केल्याबाबत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. ॲनी जॉन यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त केल्याबाबत, डॉ. श्रुती वडगबाळकर, डॉ. संजय लांडगे, डॉ. टी.एन. शिंदे व डॉ. आर.के. वडजे यांचा ग्रंथलेखनाबाबत सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील पीएच.डी. संशोधन केंद्रातील पीएच.डी. प्राप्त अंकुश गायकवाड, राजदत्त रासुलगीकर, शरीफ शेख, लतिका कट्टीमनी यांचा सत्कार करण्यात आला. मिस बुर्ला हा पुरस्कार यंदाच्या वर्षी काजल दाते या विद्यार्थिनीला मिळाला.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी करून दिला, तर उपस्थितांचे आभार डॉ.आर.के. वडजे यांनी मानले. या कार्यक्रमास कर्देहळ्ळीचे सरपंच जगन्नाथ कोळी, तसेच अंबादास कोळी, नरसिंग कोळी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

सुराज्य
सोलापूर
, दि. १ फेब्रुवारी २०१७ 9



# बुर्ला महिला महाविद्यालयात मार्कंडेय जयंती साजरी

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलिक अे.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात पद्मशाली समाजाचे कुलदैवत महामुनी मार्कंडेय यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते महामुनी मार्कंडेय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. श्रुती वडगबाळकर, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. विलास निंबाळकर, डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी.एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. आर. के. वडजे, प्रा. इंदापूरे, संजीवनी सादुल, शिवाजी चिंता व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# बुर्ला महिला महाविद्यालयात हुतात्मा दिन साजरा



सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयातील डॉ. श्रुती वडगबाळकर, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. विलास निंबाळकर, डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. रंजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शंकर राजे, डॉ.टी.एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. आर.के. वडजे, प्रा. नादरगी, संजीवनी सादुल, शिवाजी चिंता व इतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर, दि. ६ जानेवारी २०१७ 6

# रोकड विरहीत व्यवहार काळाची गरज : प्रा. श्रीनिवास गुंडेली

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे कर्देहळ्ळी ता. द.सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे दि. २८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत झाले.

शिबिरात प्रमुख वक्ते श्रीनिवास गुंडेली रोकड विरहीत व्यवहार या विषयावर मार्गदर्शन करीत होते. ते पुढे म्हणाली, बदलत्या काळातील समाजरचना आणि समाजातील व्यवहार यांची सांगड घालणे अतिशय आवश्यक आहे. तरुणांनी समाजातील व्यवहाराचे जे बदलते स्वरूप आहे. त्या गोष्टीला अवगत करून जीवन सन्मुख विचाराने जगावे असे मत प्रा. गुंडेली यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मीनाक्षी वाघमारे (ग्रामपंचायत सदस्या) या होत्या.

या कार्यक्रमाच्या वेळी रंजना बनसुडे, शिरीष भोसले, ग्रामस्थ व शिबिरार्थी बहुसंख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. रार्जेद्र वडजे (कार्यक्रम अधिकारी रा.से. योजना) यांनी मानले.

सुराज्य सोलापूर
दि. ७ जानेवारी २०१७ 7

# राष्ट्रीय सेवा योजना समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम : गोप

सोलापूर/प्रतिनिधी




बुर्ला महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करताना दशरथ गोप. यावेळी डॉ. राजेंद्र शेंडगे, रमेश विडप आदी.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावाला व समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी शिबिरार्थिंनी प्रयत्नाची पराकाष्ठा करुन प्रबोधनाचे पारायण केले पाहिजे, असे मत दशरथ गोप यांनी व्यक्त केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ऑ.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महिलाविद्यालयातील राष्ट्रीय योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) यावेळी ते बोलत होते. शिबीराच्या समारोप प्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिवा दशरथ गोप प्रमुख पाहुणे म्हणून शिबिरार्थींना मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. यावेळी श्रीधर चिट्याल दिनेश यन्नम व विश्वस्त मंडळ, रमेश विडप, लक्ष्मीकांत गड्डम, मल्लिकार्जुन सरगम, श्रीनिवास पोशम, जगन्नाथ कोळी, दीपक सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. राजेंद्र वडजे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. यावेळी प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. टी.व्ही, शिंदे, प्रा. डॉ. अशोक वक्कलदेवी, ग्रामस्थ, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर शनिवार, दि. २७ मे २०१७ 9

# अश्विनी मैले राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत राज्यात प्रथम



✔ सोलापूर:पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ऐ. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील अश्विनी नरेश मैले (बी. कॉम. भाग ३) या विद्यार्थिनीने राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्यावतीने ही परीक्षा फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आली होती. मैले या विद्यार्थिनीला प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचे मार्गदर्शन लाभले होते.

अश्विनी मैले या विद्यार्थिनीचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्ट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, सर्व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आणि सर्व प्राध्यापक वर्ग आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org

शुक्रवार पा.कं. ११
दि:- 26/05/2017

## अश्विनी मैले पंडित परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम



सोलापूर, दि. २५ मे– बुर्ला महिला महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयातील अश्विनी नरेश मैले या विद्यार्थीनीने राष्ट्र भाषा पंडित परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्यावतीने ही परिक्षा फेब्रुवारी मध्ये घेण्यात आली होती.

अश्विनी मैलेया विद्यार्थीनीचे संस्थेचे अध्यक्ष पांडूरंग दिड्डी, उपाध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे सर्व प्राध्यापक वर्ग व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

लोकमत सोलापूर, शुक्रवार, दि. २६ मे २०१७ २

हॅलो सोलापूर

## अश्विनी मैले राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत प्रथम



सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील अश्विनी नरेश मैले या विद्यार्थिनीने राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. पुणे येथील महाराष्ट्र राष्ट्रभाषा यांच्या वतीने ही परीक्षा फेब्रुवारी २०१७ मध्ये घेण्यात आली होती. अश्विनीला प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, संस्थाध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींचे मार्गदर्शन लाभले.

# अश्विनी मैले हिचे यश

सोलापूर : प्रतिनिधी



पद्मशाली संस्थेच्या बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील अश्विनी मैले (बी.कॉम. ३) या विद्यार्थिनीने राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे यांच्यावतीने ही परीक्षा फेब्रुवारी १७मध्ये घेण्यात आली होती. या विद्यार्थिनीला प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

अश्विनी मैले हिचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, ॲड. श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले आहे. अश्विनी मैले हिने बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे.

सकाळ
सोलापूर, शनिवार, २७ मे २०१७
१०

# राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत मैले प्रथम



अश्विनी मैले

सोलापूर, ता. २६ : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाच्या बी.कॉम. भाग तीनची विद्यार्थिनी अश्विनी मैले हिने राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. तिला प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, सर्व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

गुरूवार, दि. १ जून २०१७ 6

सुराज्य सोलापूर



# प्रा. डॉ. विलास निंबाळकरांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

पद्मशाली शिक्षण संस्था ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. विलास निंबाळकर यांचा दि. ३१ मे रोजी सेवानिवृत्तीनिमित्त महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते डॉ. विलास निंबाळकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम व सर्व विश्वस्त यांनी त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रंथपाल सविता मल्लाडे, मुख्य लिपिक संजीवनी सादूल, वरिष्ठ लिपिक शिवाजी चिंता, कनिष्ठ लिपिक अनिल सग्गम व सत्यनारायण गजेली, शिपाई संतोष मालतुमकर, मिनाक्षी कुडक्याल इत्यादि उपस्थित होते.

गुरुवार, दि. १ जून २०१७ 9

सुराज्य सोलापूर



# अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. आर.के. वडजे, ग्रंथपाल सविता मल्लाडे, मुख्य लिपिक संजीवनी सादूल, वरिष्ठ लिपिक शिवाजी चिंता, कनिष्ठ लिपिक, अनिल सग्गम, कनिष्ठ लिपिक सत्यनारायण गजेली, शिपाई संतोष मालतुमकर, कुडक्याल मिनाक्षी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

दै- सकाळ

गुरुवार १ जून २०१७ C

९९२१८२८२०५.

# डॉ. निंबाळकर यांचा सत्कार

**सोलापूर, ता. ३१ :** ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. विलास निंबाळकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम उपस्थित होते.

सोलापूर, शुक्रवार,
दि. २३ जून २०१७

## प्रतिभाशाली कवींना आवाहन

**लोकमत**

# राज्यस्तरीय काव्य स्पर्धा

मराठी मनाचा मानबिंदू असलेल्या अग्रगण्य दैनिक 'लोकमत'ने प्रतिभाशाली कवींना अभिव्यक्तीचे नवे व्यासपीठ आणि त्यांच्या काव्यप्रतिभेला मानाचा मुजरा करण्यासाठी राज्यस्तरीय काव्य स्पर्धा आयोजित केली आहे.

सहभागी होणाऱ्या कवींमधून परीक्षक मंडळ विजेत्यांची निवड करेल. त्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांसह पाच उत्तेजनार्थ विजेत्यांचीही निवड केली जाईल. लोकमततर्फे सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात येईल. इच्छुक कवींनी त्यांच्या कविता पाठवाव्यात, असे आवाहन लोकमततर्फे करण्यात आले आहे.

परीक्षकांनी निवडलेल्या कवितांना प्रथम क्रमांकासाठी पाच हजार, द्वितीय क्रमांकासाठी तीन हजार, तृतीय क्रमांकासाठी दोन हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. पाच उत्तेजनार्थ पुरस्कार विजेत्यांना एक हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल.

**कविता पाठवण्याची मुदत २५ जून २०१७**

**काव्यस्पर्धेचे नियम व अटी :**

- दोन स्वरचित कविता पाठवाव्या.
- कविता एकाच फुलस्केप पानावर असावी
- कवितेसाठी विषयाचे बंधन नाही.
- कविता पाठवण्याची अंतिम मुदत २५ जून २०१७
- यशावकाश योग्य वेळी व योग्य ठिकाणी कवितांना प्रसिद्ध केली जाईल.
- कविता पीडीएफ वा जेपीजी फॉर्मेटमध्येच पाठवाव्यात.

**कविता पाठवण्याचा पत्ता :**
kavyarutu@lokmat.com

लोकमत
दि. २६ जून २०१७ ४

## राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत बुर्ला महाविद्यालयाचे यश



सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित बुर्ला महाविद्यालयाचा राष्ट्रभाषा पंडित परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. अश्विनी मैले हिने या परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तिला डॉ. प्राजक्ता जोशी, पांडुरंग दिड्डी, श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, श्रीधर चिट्याल यांचे मार्गदर्शन लाभले.

(1)

सुराज्य सोलापूर, दि. २९ जून २०१७ 09

# राजर्षी शाहू महाराजांची अर्थनीती आजही मार्गदर्शक : डॉ. संतोष कदम

✔ सोलापूर/प्रतिनिधी



शाहू मजारांच्या जयंती कार्यक्रमाप्रसंगी डॉ. संतोष कदम, डी. टी. शिंदे, डॉ. रजनी दळवी आदी.

राजर्षी शाहू महाराजांनी लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेती व्यवसायाच्या विकासावर अधिक भर दिला. महाराजांच्या या कृषीपूरक अर्थनीतीमुळे जनतेची आर्थिक उन्नती घडून आली. शाहू महाराजांची ही अर्थनीती आजही मार्गदर्शक आहे. असे प्रतिपादन डॉ. संतोष कदम यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. संतोष कदम यांचे राजर्षी शाहू महाराज यांची अर्थनीती या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. टी. एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर. के. वडजे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ. रजनी दळवी यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शंकर राजे उपस्थित होते.

३ पुढारी
शुक्रवार
३० जून २०१७

# शाहू महाराजांची अर्थनीती आजही मार्गदर्शक : डॉ. कदम

**सोलापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांनी लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेती व्यवसायाच्या विकासावर अधिक भर दिला. पाणीपुरवठा, बी-बियांणांचा पुरवठा करण्याचे धोरण स्वीकारून शेतीपूरक उद्योग व्यवसाय वाढीवर भर दिला. त्यांच्या या कृषिपूरक अर्थनीतीमुळे जनतेची आर्थिक उन्नती घडून आली. राजर्षी शाहू महाराजांची ही अर्थनिती आजही मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन डॉ. संतोष कदम यांनी केले.

ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ. संतोष कदम यांचे 'राजर्षी शाहू महाराज यांची अर्थनीती' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रृती वडगबाळकर होत्या.

पुढे बोलताना डॉ. कदम म्हणाले की, इ.स. १८९७ च्या भीषण दुष्काळाचा जनतेला फार मोठा त्रास सहन करावा लागला होता. दुष्काळाचा पुन्हा जनतेला त्रास होऊ नये व शेतीला नियमित पाणीपुरवठा व्हावा, यासाठी जुन्या विहिरी व तलावांची दुरुस्ती केली. राधानगरी धरण बांधले, कृषी प्रदर्शन भरविली. चहा, रबर या व्यापारी पिकांची लागवड केली.

मधमाशी पालनाचा पहिला यशस्वी प्रयोग केला. शेतीमालाच्या विक्रीसाठी शाहुपुरी आणि जयसिंगपूर येथे बाजारपेठा सुरु केल्या.

यावेळी डॉ. श्रृती वडगबाळकर यांनीही श्री राजश्री शाहू महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकत प्रेरणात्मक मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. टी. एन. शिंदे यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. आर. के. वडजे यांनी केले.

आभार डॉ. रजनी दळवी यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शंकर राजे व विद्यार्थिनी उपस्थित होते.



सोलापूर : ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करताना शिक्षकवृंद व विद्यार्थी.

# बुर्ला महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**सोलापूर : प्रतिनिधी**

ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम समन्वयक डॉ. तुकाराम शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रजनी दळवी आणि डॉ. आर. के. वडजे, डॉ. टी. एन. शिंदे, मीनाक्षी कुडक्याल, संतोष मालतूमकर आणि विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

17

सुराज्य सोलापूर

शुक्रवार, दि. ३० जून २०१७ 09



# बुर्ला महाविद्यालयात शाहू जयंती साजरी

✓ सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम समन्वयक डॉ. तुकाराम शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रजनी दळवी आणि डॉ. आर. के. वडजे, डॉ. टी. एन. शिंदे, मिनाक्षी कुडक्याल, संतोष मालतूमकर यांच्यासह प्रशालेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत
शुक्रवार, दि. ३० जून २०१७ ३



ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन करताना डॉ.टी.व्ही.शिंदे, डॉ. रजनी दळवी, डॉ.आर.के.वडजे आदी विद्यार्थी

३ पुढारी | सोलापूर, बुधवार ५ जुलै २०१७

# योगा व प्राणायाम जीवनाचा भाग बनावा : डॉ. श्रृती वडगबाळकर

**सोलापूर : प्रतिनिधी**

योगामुळे शरीराच्या प्रत्येक भागाची हालचाल होते, मन स्थिर व एकाग्र होते. प्राणायाममुळे शरीराला आवश्यक तेवढ्या प्रमाणात ऑक्सिजन मिळतो. यामुळे आजच्या धावपळीच्या व ताणतणावाच्या जीवनशैलीत मानसिक व शारीरिक स्वास्थ्यासाठी योगा व प्राणायामला जीवनाचा भाग बनविले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. श्रृती वडगबाळकर यांनी केले.

ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सौ. भू.म. पुल्ली कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त आयोजित प्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत होत्या. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रजनी दळवी व डॉ. आर. के. वडजे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवबाई हेगडे, भावना संभारम, गौरी पासकंटी आणि तुलसी जाधव यांनी प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिवानंद भांजे, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. हत्ताळी, प्रा. हवालदार, प्रा. शेख व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
दि. ६ जुलै २०१७ 09



# बुर्ला महिला महाविद्यालयाकडून कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण

✓ सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दत्तक गाव कर्देहळ्ळी (ता.द.सोलापूर) येथे वृक्षारोपण करण्यात आले.

महाराष्ट्र शासन वनविभागाकडून वनमहोत्सवाच्या निमित्ताने १ जुलै ते ७ जुलै दरम्यान राज्यभर दोन कोटी वृक्षांची लागवड करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण मोहिमेंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या १०० स्वयंसेविका सहभागी झाल्या होत्या. त्याचबरोबर यावेळी गावचे सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत, रा.से.यो.चे.कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे, डॉ.रजनी दळवी, ग्रामसेवक तोळणुरे, मुख्याध्यापिका तोगरे, अंबादास कोळी, नरसिंग पौळ, रोहिदास पवार, विश्वनाथ पौळ, हस्तगीर मुकला, जनार्दन बाळशंकर आणि बबलू कोळी आदी मान्यवर उपस्थित होते.

३ पुढारी | गुरुवार ६ जुलै २०१७

# बुर्ला महाविद्यालयातर्फे कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण

सोलापूर (प्रतिनिधी) : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दत्तक गाव कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत, अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. रजनी दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या १०० जणांनी सहभाग नोंदवला.

लोकमत
शुक्रवार, दि. ७ जुलै २०१७ ४

## बुर्ला महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपण

सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयाच्या रासेयोच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. शासनाच्या वृक्ष लागवड मोहिमेंतर्गत शंभर स्वयंसेविकांच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला. यावेळी सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत, डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. रजनी दळवी, अंबादास कोळी उपस्थित होते.

लोकमत | बुधवार, दि. १२ जुलै २०१७ | ३

संयुक्त उपक्रम : सोलापूर विद्यापीठ, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन लायन्स क्लबचा सहभाग

# लोकसंख्यादिनानिमित्त भव्य जनजागरण दिंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन, सोलापूर विद्यापीठ व लायन्स क्लब ऑफ सोलापूरच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्यादिनानिमित्त जनजागरण दिंडी काढण्यात आली. या दिंडीचा शुभारंभ कुलगुरु डॉ. एन.एन. मालदार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी फॅमिली प्लॅनिंग राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे, नगरसेवक रियाज खैरदी, निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विनायक टेंभुर्णीकर, रफिक शेख, प्रा. मोहिनी पत्की, रमणलाल सोनीमिंडे, डॉ. एन.बी. तेली, डॉ. रजनी दळवी, प्राचार्य डॉ. शिवकुमार गणपूत, फरहा बागबान, नीलेश बक्षी, विजय जिला, दत्ता कुलकर्णी, संजय जाधव, नागराज कुंदाराम आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, भौगोलिकदृष्ट्या सातव्या क्रमांकाचा आपला देश लोकसंख्येत जगात दुसऱ्या स्थानावर आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, हवा, जल, ध्वनिप्रदूषण, नैसर्गिक पर्यावरणाचा ढासळत चाललेला समतोल अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे म्हणून प्रत्येक छोट्या कुटुंबाची संकल्पना अमलात आणावी. शाळा व महाविद्यालयातून किशोरवयीन मुलींकरिता लैंगिक शिक्षण व लोकसंख्येबाबत जाणीवजागृती केल्यास लोकसंख्या नियंत्रणास प्रभावी उपाययोजना होऊ शकते.




जागतिक लोकसंख्यादिनानिमित्त जनजागरण दिंडीचे हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. एन.एन. मालदार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. सोनिया बागडे, नगरसेवक रियाज खैरदी, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, रफिक शेख, डॉ. नभा काकडे, चंद्रकांत यादव, प्रा. मोहिनी पत्की, डॉ. रजनी दळवी, प्राचार्य शिवकुमार गणपूर आदी.

## २२ महाविद्यालयांचा सहभाग

या दिंडीत कनिष्ठ व वरिष्ठ २२ महाविद्यालय व ५ सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व १८०० पेक्षा जास्त विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले होते. ही दिंडी सोशल महाविद्यालय ते विजयदत्त फोटो स्टुडिओ, बालाजी चौक, पद्मशाली चौक, कालिका मंदिर, राहुल गांधी झोपडपट्टी, संजय गायकवाड चौक, शासकीय रुग्णालय, रंगभवन चौक, हरिभाई देवकरण मार्गे मंगळवेठेकर इन्स्टिट्यूट येथे विसर्जित करण्यात आली. उपस्थितांना अल्पोपहार व प्रमाणपत्राचे वाटप करुन दिंडीची सांगता करण्यात आली.



सोलापूर : शहरात लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जनजागरण दिंडी काढण्यात आली.

# जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त शहरात भव्य जनजागरण दिंडी

सोलापूर : प्रतिनिधी

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, विद्यापीठ व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जनजागरण दिंडी काढण्यात आली.

सोशल कॉलेज येथून निघालेल्या दिंडीचा शुभारंभ सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी फॅमिली प्लॅनिंगचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे भारताला दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, हवा, जल, ध्वनी प्रदषूण, नैसर्गिक पर्यावरणाचा ढासळत चाललेला समतोल अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शाळा व महाविद्यालयातून लैंगिक शिक्षण व लोकसंख्येबाबत जागृती केल्यास लोकसंख्या नियंत्रणास प्रभावी उपाययोजना होऊ शकते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

प्रारंभी डॉ. नभा काकडे व चंद्रकांत यादव यांनी उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी डॉ. सोनिया बागडे, नगरसेवक रियाज खैरदी, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, रफिक शेख, प्रा. मोहिनी पतकी, रमणलाल सोनिमिंडे, डॉ. एन. बी. तेली, डॉ. रजनी दळवी, प्राचार्य डॉ. शिवकुमार गणपूर, फरहान बागवान, निलेश बक्षी, विजय जिला, दत्तात्रय कुलकर्णी, नागराज कुंदाराम उपस्थित होते.

या दिंडीत कनिष्ठ व वरिष्ठ २२ महाविद्यालये व पाच सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व १८०० पेक्षा जास्त विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते. ही दिंडी सोशल महाविद्यालय, बालाजी चौक, पद्मशाली चौक, कालिका मंदिर, राहुल गांधी झोपडपट्टी, संजय गायकवाड चौक, सिव्हिल हॉस्पिटल, रंगभवन चौक ते मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे विसर्जित झाली. उपस्थितांना प्रमाणपत्राचे वाटप करून दिंडीची सांगता करण्यात आली.

सुराज्य
सोलापूर
गुरूवार, दि. १३ जुलै २०१७ 09

# विद्यार्थ्यांनी सतत शिकण्याची जिज्ञासा बाळगावी : डॉ. शेंडगे

✔ सोलापूर/प्रतिनिधी



जगाच्या परिप्रेक्ष्यामध्ये लोक भौतिक जीवनाच्या मागे धावत आहेत. अशा जगात जगत असताना, विद्यार्थ्यांनी विचार करण्याचे स्वातंत्र्य जपावे पण वेगळ्या वाटेने जाताना आपले संस्कार व संस्कृती जपावी. प्रत्येक क्षणाला नवीन शिकण्याची जिज्ञासा बाळगावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थिनींनी गुरुजनांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी डॉ.श्रुती वडगबाळकर, डॉ.शिवानंद भांजे, मंजूषा गंपले, अश्विनी कांबळे, मोनिका गुंडाळे, शिरीषा कंदिकटला, गीता मनकोंडी मनीषा कुंजरकुंट, सोनाली पवार, अंबिका पेंटा, डॉ.ॲनी जॉन, डॉ.प्राजक्ता जोशी, डॉ.रजनी दळवी, डॉ.संजय लांडगे, प्रा.शिरीष भोसले, प्रा.सुरेखा बत्तुल, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ.अशोक एक्कलदेवी, डॉ.शंकर राजे, डॉ.टी.एन.शिंदे, डॉ.पंचप्पा वायमारे, डॉ.आर.के.वडजे, प्रा.नादरगी, प्रा.इंदापुरे, प्रा.कबाडे उपस्थित होते.

## भावसार प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना आवाहन

सोलापूर, दि. १२- दरवर्षीप्रमाणे यंदाही भावसार समाजातील दहावी-बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा भावसार प्रतिष्ठानतर्फे सत्कार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करण्यासाठी येत्या ३० जुलैपर्यंत साखर पेठ येथील विद्यानिकेतन प्रशालेतील गोपी नवले, अरुण आकुडे, हिंगलाज पतसंस्था तसेच नवी पेठ येथील महाराष्ट्र टोपी भांडार व टिळक चौकातील वसंत कॅप येथे आपल्या गुणपत्रिकेची छायांकित (झेरॉक्स) प्रत, मोबाइल क्रमांक व पत्ता लिहून पोहोच करावी, असे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी संस्कार, संस्कृती जपावी : डॉ. शेंडगे

शहर संचार

सोलापूर, दि. १२- 'जगाच्या परिप्रेक्षामध्ये लोक भौतिक जीवनाच्या मागे धावत आहेत. अशा जगात जगत असताना विद्यार्थ्यांनी विचार करण्याचे स्वातंत्र्य जपावे, पण वेगळ्या वाटेने जाताना आपले संस्कार व संस्कृती जपावी. प्रत्येक क्षणाला नवीन शिकण्याची जिज्ञासा बाळगावी', असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.



सोलापूर : गुरुपौर्णिमेनिमित्त बुर्ला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी मार्गदर्शन केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थिनींनी गुरुजनांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. डॉ. शेंडगे म्हणाले, 'विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन जीवनाचा काळ हा सूवर्णकाळ असतो. या काळातच आपल्या जीवनाची पायाभरणी होत असते. या काळातील मिळविलेले ज्ञान आणि आलेले अनुभव ही आपल्या जीवनाची शिदोरी असते, जी की आपल्याला जीवनभर पुरते. यामुळेच विद्यार्थ्यांनी या काळात अधिकाधिक शिकण्याचा प्रयत्न करावा.' याप्रसंगी डॉ. श्रुती वडगबाळकर आणि डॉ. शिवानंद भांजे यांनी आपले विचार मांडले. तसेच मंजूषा गंपले, अश्विनी कांबळे, मोनिका गुंडाळे, शिरीषा कंदिकटला, गीता मनकोंडी या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास डॉ. ॲनी जॉन, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. आर. के. वडजे, प्रा. नादरगी, प्रा. इंदापुरे, प्रा. कबाडे व विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रास्ताविक मनीषा कुंजरकुंट हिने केले. सूत्रसंचालन सोनाली पवार हिने केले तर आभार अंबिका पेंटा हिने मानले.

३ पुढारी | शुक्रवार १४ जुलै २०१७

# बुर्ला महाविद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**सोलापूर : प्रतिनिधी**

बुर्ला महिला महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षणाला सतत नवीन शिकण्याची जिज्ञासा बाळगावी. जगाच्या परिक्षेत्रामध्ये लोक भौतिक जीवनाच्या मागे धावत आहेत. अशा जगात जगत असताना विद्यार्थ्यांनी विचार करण्याचे स्वातंत्र्य जपावे, असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी डॉ. श्रुती वडकबाळकर आणि डॉ. शिवानंद भांजे यांनी आपले विचार मांडले. तसेच मंजुषा गंपले, अश्विनी कांबळे, मोनिका गुंडाळे, शिरीषा कदीकंटला, गीता मनकोंडी या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास डॉ. ॲनी जॉन, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी.एन शिंदे यांच्यासह आदी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संचार
सोलापूर, शनिवार २२ जुलै २०१७ | ९

# इंग्रजी अभ्यासक्रमात नावीन्यता हवी

शहर संचार

सोलापूर, दि. २१- 'बदलत्या युगात इंग्रजी भाषेचा व्यवहारात वापर वाढत आहे. आर्थिक व्यवहार डिजिटल पध्दतीने करण्याचे प्रमाण वाढत आहे. अशावेळी इंग्रजी भाषा अधिकाधिक लोकांना येण्यासाठी इंग्रजी भाषेच्या अभ्यासक्रमात व शिकविण्याच्या पध्दतीत नावीन्यता आली पाहिजे', असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठातील स्कूल ऑफ सोशल सायन्सचे संचालक अधिष्ठाता डॉ. अशोककुमार यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महाविद्यालय, सोलापूर इंग्लिश टीचर्स असोसिएशन आणि मॅकमिलन एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग १ व २ वर्गांच्या 'आवश्यक इंग्रजी' या विषयासाठी अभ्यासक्रमावर आधारित एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.




सोलापूर : इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमावर आयोजित कार्यशाळेत डॉ. अशोककुमार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पांडुरंग दिड्डी, डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. एच.के. आवताडे व अन्य.

या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. एच. के. आवताडे, डॉ. ॲनी जॉन व मॅकमिलन एज्युकेशनचे तुषार नायक यांची उपस्थिती होती. डॉ. अशोककुमार म्हणाले की, 'इंग्रजी भाषा अवघड वाटत असली तरी शिकण्यास सोपी आहे. इंग्रजी भाषा शिकण्यासाठी डायरीमध्ये दररोज दहा वाक्ये लिहावीत. इंग्रजी शब्द तोंडपाठ करावेत. इंग्रजी वाचन करावे, इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न करावा. इंग्रजी भाषा प्रयत्नपूर्वक आत्मसात करावी'. याप्रसंगी बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग १ व २ च्या 'आवश्यक इंग्रजी' विषयाच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत डॉ. एस. के. आवताडे, प्राचार्य डॉ. संतोष कोटी आणि डॉ. दवे यांनी मार्गदर्शन केले.

दिड्डी म्हणाले की, इंग्रजी भाषेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात भीती आहे. ती दूर करण्यासाठी व इंग्रजी भाषा विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे येण्यासाठी काय करता येईल, याबाबतचा विचार होण्यासाठी अशा कार्यशाळा होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले आभार डॉ. रजनी दळवी यांनी मानले. या कार्यक्रमास सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

दै. सुराज्य



# इंग्रजीच्या अभ्यासक्रमात नाविण्यता आवश्यक

## ▶▶ डॉ. अशोककुमार यांचे प्रतिपादन



बुर्ला महाविद्यालयातील कार्यशाळेत बोलताना डॉ. अशोककुमार व मान्यवर.

सोलापूर/प्रतिनिधी

बदलत्या युगात इंग्रजी भाषेचा व्यवहारात वापर वाढत आहे. आर्थिक व्यवहार डिजीटल पध्दतीने करण्याचे प्रमाण वाढत आहे. अशावेळी इंग्रजी भाषा अधिकाधिक लोकांना येण्यासाठी इंग्रजी भाषेच्या अभ्यासक्रमात व शिकवण्याच्या पध्दतीमध्ये नाविण्यता आली पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठातील स्कूल ऑफ सोशल सायन्सचे संचालक व मानव्यशास्त्र विभागाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. अशोककुमार यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर इंग्लिश टिचर्स असोसिएशन आणि मॅकमिलन एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए, बी.कॉम. व बी.एस्सी.भाग - १ व २ वर्गाच्या आवश्यक इंग्रजी या विषयासाठी अभ्यासक्रमावर आधारित एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.

या कार्यशाळेच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे डॉ. ॲनी जॉन व मॅकमिलन एज्युकेशनचे तुषार नायक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.पंचप्पा वायमारे यांनी केले. तर आभार रजनी दळवी यांनी केले.

दै. दिव्य मराठी

सोलापूर. शनिवार, २२ जुलै २०१७ | ३

## बुर्ला महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण मोहीम सुरू

**सोलापूर ।** अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाकडून दत्तक गाव कर्देहळ्ळी येथे वृक्षारोपण करण्यात आले. महाराष्ट्र शासन वनविभागाकडून वनमहोत्सवाच्या निमित्ताने १ ते ७ जुलैदरम्यान राज्यभर चार कोटी वृक्षाची लागवड करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्याचे अनुकरण म्हणून महाविद्यालयाच्या १०० स्वयंसेविका यांनी ही वृक्षलागवड केली. या वेळी जगन्नाथ कोळी, दीपक सावंत, राजेंद्र वडजे, रजनी दळवी, लक्ष्मण पौळ, रोहिदास पवार आदी उपस्थित होते.

पुढारी | सोमवार
२४ जुलै २०१७

# इंग्रजीच्या अभ्यासक्रमात नाविन्यता येणे आवश्यक

**सोलापूर : प्रतिनिधी**

बदलत्या युगात इंग्रजी भाषेचा व्यवहारात वापर वाढत आहे. आर्थिक व्यवहार डिजिटल पद्धतीने होत असल्याने इंग्रजी भाषा अधिकाधिक लोकांना येण्यासाठी अभ्यासक्रमात व शिकविण्याच्या पद्धतीत नाविन्य आले पाहिजे, असे प्रतिपादन मानव्यशास्त्र विभागाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. अशोककुमार यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयाच्या इंग्रजी विषयासाठी अभ्यासक्रमावर आधारित एकदिवशीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. आवताडे, डॉ. ॲनी जॉन व तुषार नायक यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेस डॉ. एस. के. अवताडे, प्राचार्य कोटी आणि डॉ. दवे यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना पांडुरंग दिड्डी म्हणाले की, इंग्रजी भाषेबाबत असलेली भीती दूर करून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे येण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करावा, असे ते म्हणाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शेंडगे, सूत्रसंचालन डॉ. पंचप्पा वाघमारे, तर आभार डॉ. दळवी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत
www.tarunbharatsolapur.
मंगळवार, २५ जुलै २०१७ ११

# इंग्रजी भाषेच्या अभ्यासक्रमात नाविन्यता येणे आवश्यक

## डॉ. अशोककुमार यांचे प्रतिपादन

**सोलापूर, दि. २४ जुलै–**

बदलत्या युगात इंग्रजी भाषेचा व्यवहारात वापर वाढत आहे. आर्थिक व्यवहार डिजीटल पद्धतीने करण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा वेळी इंग्रजी भाषा अधिकाधिक लोकांना येण्यासाठी इंग्रजी भाषेच्या अभ्यासक्रमात व शिकविण्याच्या पद्धतीमध्ये नाविन्यता आली पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठातील स्कूल ऑफ सोशल सायन्सचे संचालक व मानव्यशास्त्र विभागाचे प्रभारी अधिष्ठता डॉ. अशोककुमार यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर इंग्लिश टिचर्स असोसिएशन आणि मॅकमिलन एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग-१ व २ वर्गांच्या आवश्यक इंग्रजी या विषयासाठी अभ्यासक्रमावर आधारित एकदिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. एच.के. अवताडे, डॉ. ॲनी जॉन व तुषार नायक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बी.ए.बी.कॉम व बी.एस्सी भाग १ व २ च्या आवश्यक इंग्रजी विषयाच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत डॉ. एस.के. अवताडे, प्राचार्य डॉ. संतोष कोटी आणि डॉ. दवे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना पांडुरंग दिड्डी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.पंचप्पा वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. रजनी दळवी यांनी मानले.



बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. इंग्रजी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. अशोककुमार. व्यासपीठावर पद्मशाली ज्ञातीचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. एच. के. आवताडे आणि अन्य पदाधिकारी

८ सकाळ सोलापूर, बुधवार, ३ ऑक्टोबर २०१८

दृष्टिक्षेपात

# डॉ. मुरूमकर यांच्या संशोधनास १२ लाखांचे अनुदान



प्रा. मुरूमकर

**सोलापूर :** ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील मराठी विभागात कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. कविता मुरूमकर यांच्या संशोधन प्रकल्पास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून १२ लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. स्त्री शतक : स्त्रीलिखित आधुनिक मराठी कविता : प्रेरणा, परंपरा आणि योगदान (१९९८ ते २०१८) या विषयावर संशोधनग्रंथ तयार करणार आहेत. डॉ. मुरूमकर या एक आश्वासक कवयित्री आहेत.

सोलापूर तरुण भारत www.tarunbharat.org दि. ४ ऑक्टोबर २०१८ ११

# दशरथ गोप पंचदशकपूर्तीनिमित्त खाऊ वाटप



**सोलापूर दि.३ ऑक्टोबर -** बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात पदमशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या वाढदिवसानिमित्त पंचदशकपूर्ती व शिक्षण रजतसेवा गौरव समितीच्या वतीने खाऊ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्ष पांडुरंग दिड्डी यांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. राजेंद्र शेंडगे, यांच्या अध्यक्षतेखाली श्रीनिवास गड्डम, विजय चिप्पा, लक्ष्मीनारायण सरगम, व हरीष कोंडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले.

संचार सोलापूर, सोमवार १३ ऑगस्ट २०१८ ७

# अहिंसात्मक चळवळीनेच ब्रिटिशांनी भारत सोडला

शहर संचार

▶ सोलापूर, दि. १२- भारतीय स्वातंत्र चळवळ ही अनेक क्रांतिकारक घटना आणि भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून कसा मुक्त करावा याबाबतच्या मतप्रवाहाने भारलेली होती. महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक चळवळीने ब्रिटिशांना भारत सोडावा लागला होता. सामाजिक बदलातूनच क्रांती होते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी या होत्या.

शिंदे पुढे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र चळवळीत क्रांतिकारकांचे मवाळवाद, जहालवाद आणि महात्मा गांधीजींचा अहिंसात्मक मार्ग हे मुख्य प्रवाह होते.

गांधीजींनी सामान्य जनतेला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेतले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही लोकचळवळ बनली. १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळ सुरू होण्यापूर्वीच ब्रिटिशांनी गांधींसह अनेक आघाडीच्या नेत्यांना तुरुंगात टाकले. तेव्हा यात सामान्य लोकांनी चले जाव चळवळ हाती घेतली. ही घटना भारतीय स्वातंत्र चळवळीच्या इतिहासात क्रांतिदिन म्हणून ओळखली जाते.

जोशी म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी सनातनी वर्गाचे दगड धोंडे झेलून महिलांच्या शिक्षणाचा मार्ग तयार केला. आज महिला या मार्गाने जाताना विविध क्षेत्रात भरारी घेत आहेत.

शिक्षणामुळेच महिलांच्या जीवनात ही क्रांती घडून आली आहे. विद्यार्थिनींनी चांगल्या संस्कारासाठी कर्तृत्वान महिलांचे चरित्र वाचणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींनी वैचारिकदृष्ट्या स्वावलंबी व सक्षम बनले पाहिजे तर येणाऱ्या संकटांचा यशस्वीपणे सामना करता येईल. प्रारंभी प्रास्ताविक प्रा. डॉ. आर. के. वडजे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. टी. एन. शिंदे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्वाती घाटोळे यांनी केले तर आभार प्रा. रंजना बनसुडे यांनी मानले.



▶ सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, रंजना बनसुडे व अन्य.

३ पुढारी | सोमवार २१ ऑगस्ट २०१७



सोलापूर : ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांझणदिन कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे व इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. टी.एन. शिंदे, व्यासपीठावर बसलेले प्रा.डॉ.एस.एस. राजे, प्रा.डॉ. आर.के.वडजे, प्रा. डॉ. श्रुती वडगबाळकर, प्रा.डॉ.आर.जे. दळवी व विद्यार्थिनी.

# 'चले जाव' ही जनतेची चळवळ : डॉ. टी. एन. शिंदे

**सोलापूर : प्रतिनिधी**

माणसाला स्वातंत्र्य सर्वाधिक प्रिय असते. ब्रिटिशांनी भारतीयांचे हे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. असे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी भारतीयांनी ब्रिटिश सत्तेबरोबर प्रदीर्घ लढा दिला. या लढ्याचे नेतृत्व अनेक नेत्यांनी केले. यापैकी महात्मा गांधी यांचे नेतृत्व सर्वाधिक प्रभावी ठरले. चले जाव चळवळ महात्मा गांधींनी सुरू केली. पण त्यांना तुरुंगात टाकले. तेव्हा जनतेने ही चळवळ हाती घेतली व ती यशस्वी करुन दाखविली, असे प्रतिपादन डॉ.टी.एन. शिंदे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीदिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रुती वडगबाळकर होत्या. व्यासपीठावर डॉ.रजनी दळवी आणि प्रा. सुरेखा बत्तुल होत्या. पुढे बोलताना डॉ. शिंदे म्हणाले की, महात्मा गांधी यांनी सामान्य जनतेतील नेतृत्व पुढे आणले. यामुळे महिला, कामगार आणि तरुणवर्ग देशासाठी वाट्टेल तो त्याग करण्यासाठी सिद्ध झाला. अशाच सामान्य जनतेने चले जाव चळवळीचे नेतृत्व केले होते. यामुळे चले जाव चळवळी ही जनतेची चळवळ बनली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रुती वडगबाळकर म्हणाल्या की, चले जाव चळवळ ही भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांती होती. या क्रांतीमुळे भारताला स्वातंत्र्य मिळाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आर.के वडजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले. उपस्थितांचे आभार मंजुषा गंपले हिने मानले. सदर कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. भोसले, प्रा. कबाडे व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
दि. २८ सप्टेंबर २०१८ ११



बुर्ला महिला महाविद्यालयात दशरथ गोप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वादविवाद स्पर्धेत बोलताना

# गोप यांच्या हाती शिक्षण संस्थेचे भविष्य सुरक्षितः ॲड.क्यातम

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

सोलापूरमधील पद्मशाली शिक्षण संस्था ही नामांकित शिक्षण संस्था आहे. या संस्थेत पूर्व भागातील मुला मुलींच्या बालवाडीपासून ते उच्च महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था झाली आहे. दशरथ गोप हे शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी २५ वर्षापासून परिश्रम घेत असून, त्यांच्या हाती शिक्षण संस्थेचे भविष्य सुरक्षित आहे, असे मत ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी व्यक्त केले.

बुर्ला महिला महाविद्यालय संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त वाद-विवाद स्पर्धा आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, दशरथ गोप, समितीचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, मल्लिकार्जुन सरगम, ॲड. श्रीनिवास कटकूर, नागनाथ गंजी, संगीता इंदापूरे, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली आदी उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
दि. ३० सप्टेंबर २०१८
११

# मुरुमकरांच्या संशोधनास १२ लाख अनुदान

**सोलापूर, दि. २९ सप्टेंबर-** मराठी विभागात कार्यरत असणाऱ्या डॉ. प्रा. कविता मुरुमकर यांच्या संशोधनास प्रकल्पास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृ मंडळाकडून १२ लाखाचे अनुदान मंजूर झाले आहे.

सदर प्रकल्पांतर्गत प्रा. डॉ. कविता मुरुमकर, 'स्त्री शतक: स्त्रीलिखीत आधुनिक मराठी कविता : प्रेरणा परंपरा आणि योगदान' (१९९८ ते २०१८ या शतकातील मराठी स्त्रीलिखीत कवितेचा अभ्यास) या विषयावर संशोधनग्रंथ संपन्न करणार आहेत.

प्रा. डॉ. कविता मुरुमकर या म हाराष्ट्रातील नव्या पिढीतील नामवंत अशा एक आश्वासक कवयित्री आहेत. आजपर्यंत त्यांचे विविध प्रकारचे विपुल साहित्य प्रकाशित झाले आहे. 'मी सावित्री जोतीराव' (संशोधनात्मक चरित्र कादंबरी), 'भैरवी' (कादंबरी), 'मीराधा' (काव्यसंग्रह), 'तुझीच कविता' (काव्यसंग्रह), 'मराठी कवितेतील मि' (आगामी समीक्षात्मक ग्रंथ), 'बाई समजुन घेताना, बाई म्हणून जगताना' (आगामी प्रकाशन) याशिवाय 'नव्या जाणिवेच्या कथा व लेकीस पत्र'(चार्ली चॅपलीनच्या कवितेचा मराठी अनुवाद) या ग्रंथांचे संपादन केले आहे. तसेच त्यांनी विविध वर्तमानपत्रामध्ये सदरलेखन केले आहे.

त्यांच्या 'सावित्री ज्योतीराव' या कादंबरीवर स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड येथे दोन विद्यार्थी एम. फिल. करत आहेत. तसेच नांदेड विद्यापीठाच्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकात त्यांच्या पटकथा लेखन यावराचा अभ्यासु लेख समाविष्ठ आहे. याशिवाय त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संशोधनपर लेखांचे सादरीकरण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पांडुरंग दिड्डी, अॅड. श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, चिट्याल, दिनेश यन्नम व प्राचार्य डॉ. शेंडगे यांनी अभिनंदन केले.

संचार

२ सोलापूर, शनिवार ७ ऑक्टोबर

# बुर्ला महिला महाविद्यालयास नॅक पिअर टीम भेट देणार

शहर संचार

सोलापूर, दि. ६- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) यांची समिती भेट देणार आहे.

९ व १० ऑक्टोबर रोजी या समितीकडून महाविद्यालयाचे मूल्यांकन होणार अहे. या समितीमध्ये चेन्नई येथील भारथीदसन विद्यापीठाचे माजी कुलगुरू सी. थंगामुथू (चेअरमन), बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठातील अध्या सक्सेना (सदस्या) आणि श्रीनगर येथील गव्हर्नमेंट कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. झीनत अरा (समन्वयक सदस्या) यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम,

पान ४ वर

## बुर्ला महिला महाविद्यालयास ..

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी जोरदार तयारी करीत आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, सामाजिक काम आणि विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट यावर अधिक भर देत महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी सज्ज असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेंडगे यांनी दिली.

सकाळ
सोलापूर, सोमवार, ९ ऑक्टोबर २०१७
७



मंगळवेढा : युवा महोत्सवात सहभागी होत आपला आनंद सेल्फी घेऊन साजरा करताना ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील युवती.

४ पुढारी | मंगळवार १० ऑक्टोबर २०१७




मंगळवेढा : हागणदारी मुक्तीचा संदेश देणारा लघुनाटिका सादर करताना विद्यार्थिनी.

# 'लोटा पार्टी' ने दिला हगणदारी मुक्तीचा संदेश

**मंगळवेढा : प्रतिनिधी**

श्री संत दामाजी महाविद्यालय येथे सुरु असलेल्या सोलापूर विद्यापीठाच्या १४व्या युवा महोत्सवात सोलापूर येथील ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी लोटा पार्टी या लघुनाटिकेतुन हागणदारीमुक्त भारत या विषयावर आपली नाटिका सादर करुण उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली.

या कलाप्रकारात सोनाली पवार, प्रगती पवार, तुलसी जाधव, रुक्मिणी कोळी, अंबिका पेंटा, अनिता मंता यांनी सहभाग घेतला होता. यांना पाटोळे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते, तर संगीत मनीषा कुमरकुंठा यांचे लाभले. या प्रकारात एकूण ३४ संघानी सहभाग घेतला होता. याला पर्यवेक्षक म्हणून डॉ अंबादास कांबळे, गणेश शिंदे, सतीश वाघमारे यांनी काम पाहिले.

८ पुढारी | सोलापूर, गुरुवार १२ ऑक्टोबर २०१७



युवा महोत्सवात सहभागी ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी. (छाया-दत्ता कांबळे, मंगळवेढा)

# बुर्ला महाविद्यालयाचे सांघिक कला प्रकारातून केले आविष्काराचे दर्शन

**मंगळवेढा : प्रतिनिधी**

श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा येथील सोलापूर विद्यापीठाचा १४ युवा महोत्सव मोठ्या जल्लोष्यात संपन्न झाला. यामध्ये जिल्ह्यातील ११४ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यात सर्वच महाविद्यालयाच्या कलाकारांनी चांगल्या प्रकारे कला सादर करून सर्वच प्रेक्षेकांचे भरपूर मनोरंजन केले. यातच 'हम भी कुछ कम नहीं हैंअसे म्हणत सोलपुरातील ए आर बुर्ला महिला महाविद्यालयाने युवा महोत्सवामध्ये सर्व कलाप्रकारात भाग घेऊन आपले कलाप्रकार दाखवून दिले.

आपल्याकडे मुलांचा रोल असेल ते सुद्धा अगदी जबरदस्त प्रकारे करून दाखवले. त्यामुळे ह्या मुलींनी आपली कला सादर चांगल्याप्रकारे करून दाखवले.

या मुलींनी लघुनाट्य, पथनाट्य, एकांकीका, नकला, वक्तृत्व, मातीकाम, चित्रकला, रांगोळी यासह सर्व कलाप्रकारात आपली कला सादर केली. यामध्ये या कॉलेजमधील सोनाली पवार, चैतन्या कंदीकटला, लक्ष्मी पोलू, वैष्णवी श्रीचिप्पा, अदिती तळीखेडे, कोमल पवार, स्वीटी कोमपेल्ली, सुरभी यलगम, राणी कडला, शिल्पा फत्तेपुरकर,अंबिका पेंटा, सोनम काशिद, तुलशी जाधव, रुक्मिणी कोळी, प्रगती पवार, सौंदर्या मच्छा, अनिता महंता, मनीषा कुमरकुटा, राजश्री रच्छा, सोनाली पवार, ऋषिता भालेराव, सावित्री कदम, पूजा यनगुल, काजल लोखंडे, आरती दासी, वर्षा हलसगीकर, धारा भारती, ऐश्वर्या गिरी आदी मुलीहनी सहभाग घेऊन आपली कला सादर केली.

या मुलींना मार्गदर्शक म्हणून आतिश पाटोळे,राजन जाधव,शरद मुटकिरी, निखिल भालेराव यांचे लाभले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
दि. २५ ऑक्टोबर २०१७, पान ७

## प्राचार्य शेंडगे यांना डी. लिट. पदवी



**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांना डी. लिट् पदवी प्राप्त झाली आहे. दक्षिण अमेरिका विद्यापीठाकडून त्यांना ही पदवी प्राप्त झाली आहे. शिक्षण, साहित्य, संशोधन, प्रशासन व समाज या क्षेत्रात केलेल्या गुणवत्तापूर्ण कार्याबाबत त्यांना डी. लिट् पदवी मिळावी, अशी शिफारस डॉ. राधाकृष्णन रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याकडून केली होती. त्यांना यापूर्वी सोलापूर विद्यापीठाकडून उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.

संचार ८ सोलापूर, बुधवार २५ ऑक्टोबर २०१७

## प्राचार्य डॉ. शेंडगे यांना डी.लिट पदवी



▶ सोलापूर, दि. २४- ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांना दक्षिण अमेरिका विद्यापीठाकडून डी.लिट ही पदवी प्राप्त झाली आहे. शिक्षण, साहित्य, संशोधन, प्रशासन व समाज या क्षेत्रात केलेल्या गुणवत्तापूर्ण कार्याबाबत त्यांना डी.लिट पदवी मिळावी, अशी शिफारस भारतातील डॉ. राधाकृष्णन रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याकडून करण्यात आली होती. प्राचार्य डॉ. शेंडगे यांना यापूर्वी सोलापूर विद्यापीठाकडून उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.

५ पुढारी | सोलापूर, बुधवार
२५ ऑक्टोबर २०१७

# प्राचार्य राजेंद्र शेंडगे यांना डी. लिट पदवी

**सोलापूर : प्रतिनिधी**



बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांना डी. लिट पदवी प्राप्त झाली आहे. दक्षिण अमेरिका विद्यापीठाकडून त्यांना ही पदवी प्राप्त झाली आहे. शिक्षण, साहित्य, संशोधन, प्रशासन व समाज या क्षेत्रांत केलेल्या गुणवत्तापूर्ण कार्याबाबत त्यांना डी.लिट् पदवी मिळावी, अशी शिफारस भारतातील डॉ. राधाकृष्णन रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याकडून केली होती. प्राचार्य शेंडगे यांना यापूर्वी सोलापूर विद्यापीठाकडून उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट लेखनाबाबत महाराष्ट्रातील नामवंत संस्थांकडून त्यांच्या साहित्यास पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सोलापूर विद्यापीठातील त्यांचा बीसीयुडीचे संचालकपदाचा कार्यकाळ अविस्मरणीय ठरला होता. प्राचार्य म्हणून काम पाहात असताना नॅकपिअर टिमने तीन वेळा महाविद्यालयास भेट दिली आहे. शेंडगे यांच्या या यशाबाबत संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम यांनी अभिनंदन केले.

सुराज्य
सोलापूर
दि. २६ ऑक्टोबर २०१७ 9

# डॉ. राजेंद्र शेंडगे यांना डी. लिट् पदवी

✓ सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांना दक्षिण अमेरिका विद्यापीठाकडून डी. लिट् पदवी प्राप्त झाली आहे. शिक्षण साहित्य, संशोधन, प्रशासन व समाज या क्षेत्रात केलेल्या गुणवत्तापूर्ण कार्याबाबत त्यांना ही पदवी मिळावी अशी शिफारस भारतातील डॉ. राधाकृष्णन रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याकडून करण्यात आली होती. यापूर्वी सोलापूर विद्यापीठाकडून उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट लेखनाबाबत त्यांच्या साहित्यास पुरस्कार मिळाले आहेत. बीसीयूडीचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. प्राचार्य म्हणून काम पहात असताना नॅकपीअर टीमने तीन वेळा महाविद्यालयास भेट दिली आहे. या यशाबद्दल अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम आदींनी अभिनंदन केले.

सकाळ
C शनिवार, २७ ऑक्टोबर २०१८ | २

# 'ए. आर. बुर्ला'चे युवा महोत्सवात यश

सोलापूर, ता. २६ : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाने सोलापूर विद्यापीठाच्या १५व्या युवा महोत्सवात भरीव यश संपादन केले.

महाविद्यालयातर्फे सादर करण्यात आलेल्या लघुनाटिकेला तृतीय क्रमांक मिळाला तर एकांकिकेसाठी प्रगती पवार हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. कलाकार विद्यार्थिनींना प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे व प्रा. डॉ. रजनी दळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास कटकूर, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर विद्यापीठाची फसवणूक; दोघा विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर : प्रतिनिधी**

तोतया विद्यार्थी परीक्षेला बसवून सोलापूर विद्यापीठाची फसवणूक करणाऱ्या दोघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मूळ परीक्षार्थी विद्यार्थी प्रवीण सायबण्णा जवळगी (वय २१, रा. शिरवळ, ता. अक्कलकोट) आणि तोतया विद्यार्थी वीरेश श्रीशैल पोमाजी (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत प्राचार्य डॉ. राजेंद्र नारायण शेंडगे (वय ५७, रा. प्रेम नगर, विजापूर रोड, जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

शुक्रवारी सोलापूर विद्यापीठाची ए. आर. बुर्ला कॉलेज महिला महाविद्यालय येथे बी. एस्सी. चे पेपर होते. ए. आर. बुर्ला कॉलेजमधील ब्लॉक नं. ४ मध्ये प्रवीण जवळगी याचा बी.एस्सी. भाग ३ चा केमेस्ट्रीचा पेपर क्र. ९ हा होता. ब्लॉक नं. ४ मध्ये चालू असताना बैठक क्र. ३१६२६६ च्या मूळ विद्यार्थ्याच्या नावावर तोतया विद्यार्थी वीरेश पोमाजी हा पेपर देताना मिळून आला. म्हणून या दोघा विद्यार्थ्यांनी सोलापूर विद्यापीठाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलिस निरीक्षक राठोड तपास करीत आहेत.

दिव्य मराठी
सोलापूर. रविवार, १९ नोव्हेंबर २०१७ | ८

न्यूज ब्रीफ

## दुसऱ्याच्या नावे बीएस्सीची परीक्षा देताना दोघांवर गुन्हा दाखल

सोलापूर | बीएस्सी भाग तीन केमेस्ट्री विषयाचा पेपर दुसऱ्याच्या नावे देताना दोघा तरुणांवर जेल रोड पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना शुक्रवारी ए. आर. बुर्ला महिला कॉलेजात उघडकीस आली. प्रवीण सायबण्णा जवळगी (वय २१, रा. शिरवळ, अक्कलकोट) व तोतया विद्यार्थी वीरेश श्रीशैल पोमाजी (रा. वागदरी, अक्कलकोट) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी तक्रार दिली आहे. बीएस्सी भाग तीन, पेपर नऊ या विषयाचा पेपर वीरेश हा देत होता. मूळ विद्यार्थी प्रवीण आहे. त्याचे नावाने तो परीक्षा देत होता. तपासणीत हा प्रकार समोर आला आहे. सहायक निरीक्षक राठोड तपास करीत आहेत.

संचार
२७ नोव्हेंबर २०१७ ११

## सोनाली मुनगापाटीलची अश्वमेध स्पर्धेस निवड

▶ सोलापूर, दि. २६- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील सोनाली मुनगापाटील (बी.ए. भाग-१) या विद्यार्थिनींची अश्वमेध स्पर्धेतील खो-खो खेळासाठी निवड झाली.



ही स्पर्धा दापोली येथे होणार आहे. सोनाली ही खो-खो खेळातील उत्तम खेळाडू आहे. तिला डॉ. रजनी दळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

सोनालीच्या या निवडीबाबत संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींनी अभिनंदन केले.

संचार

८ सोलापूर, सोमवार ४ डिसेंबर २०१७



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित वक्तृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी व अन्य.

# बुर्ला महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**शहर संचार**

सोलापूर, दि. ३- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मनपातर्फे आयोजित स्वच्छ महाविद्यालय उपक्रमांतर्गत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शौचालय वापराबाबत जागृती, घनकचरा व्यवस्थापन, प्लॅस्टिक वापर टाळणे, महाविद्यालय परिसर स्वच्छतेबाबत विद्यार्थिनींमध्ये व पालकांमध्ये जागृती व्हावी यासाठी रांगोळी, पोस्टर, घोषवाक्य, वक्तृत्व आदी स्पर्धांचे आयोजन केले आहे.

तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींकडून मनपाच्या स्वच्छता ॲपविषयी जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

पुढारी | सोमवार ४ डिसेंबर २०१७

## सोनाली मुंगापाटीलची अश्वमेध स्पर्धेसाठी निवड



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील सोनाली मुंगापाटील या विद्यार्थिनीची अश्वमेध स्पर्धेतील खो-खो खेळासाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा दापोली येथे होणार आहे. सोनाली मुंगापाटील खो-खो खेळातील उत्तम खेळाडू असा नावलौकिक आहे. तिला डॉ. रजनी दळवी यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या निवडीबाबत अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, ॲड. श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, सर्व विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सकाळ
७ डिसेंबर २०१७ / ४

## अे. आर. बुर्ला महाविद्यालय

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. संजय लांडगे, डॉ. शिवानंद भांजे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल, रंजना बनसुडे, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. आर. के. वडजे तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

तरुण भारत
www.tarunbharat.org
शुक्रवार, दि. ८ डिसेंबर २०१७ | ३

## बुर्ला महाविद्यालयात कापडी पिशव्यांचे वाटप

सोलापूर, दि.७ डिसेंबर -

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात टाकाऊ कापड व साड्यापासून बनविलेल्या कापडी पिशव्यांचे डॉ.प्राजक्ता जोशी यांच्या हस्ते पालकांना वाटप करण्यात आले. प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापराला आळा बसावा आणि प्रदुषण टाळण्यासाठी प्रबोधन व्हावे यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी डॉ.तुकाराम शिंदे, डॉ.रजनी दळवी, डॉ.आर.के.वडजे यांची उपस्थिती होती.

३ पुढारी | शुक्रवार ८ डिसेंबर २०१७

## बुर्ला महिला महाविद्यालय

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय योजनेमार्फत डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. संजय लांडगे, डॉ. शिवानंद भांजे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. सुरेखा बत्तुल,रंजना बनसुडे, डॉ. शंकर गजे, डॉ. टी.एन. शिंदे, डॉ. आर. के. वडजे, प्रा. इंदापुरे, प्रा. नादरगी, प्रा. हिरेमठ आदी उपस्थित होते.

संचार

सोमवार ११ डिसेंबर २०१७ | ९

# बुर्ला महाविद्यालयात स्वच्छतेबाबत शपथ

सोलापूर, दि. १०- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात महाविद्यालयीन स्वच्छता याबाबत राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींना स्वच्छतेबाबत आणि प्लॅस्टिक पिशव्या न वापरण्याबाबत शपथ देण्यात आली. विद्यार्थिनींना ही शपथ सोनाली पवार हिने देवविली. यावेळी डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. संजय लांडगे, प्रा. सुरेखा बत्तुल, रंजना बनसुडे, डॉ. शंकर भांजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. आर. के. वडजे व विद्यार्थिनींनी उपस्थित होते.

३ पुढारी | मंगळवार १२ डिसेंबर २०१७

# बुर्ला महाविद्यालयाकडून विणकर बागेत स्वच्छतेसाठी श्रमदान

**सोलापूर (प्रतिनिधी) :** ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाकडून विणकर बागेमध्ये स्वच्छतेसाठी विद्यार्थिनींनी श्रमदान केले. सोलापूर महापालिकेच्या स्वच्छ महाविद्यालय स्पर्धेत महाविद्यालय सहभागी झाले आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांपैकीच हा उपक्रम होता. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या श्रमदानातून बागेचा परिसर स्वच्छ केला. तसेच बागेत उपस्थित असलेल्या नागरिकांना आपला परिसर, घर स्वच्छ राखणे, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळणे आणि सोलापूर महानगरपालिकेचे स्वच्छता ॲप डाऊनलोड करुन आपल्या परिसरातील अस्वच्छतेची माहिती सोलापूर नगरपालिकेला कळविण्याचे आवाहन केले. ही स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यासाठी डॉ. रजनी दळवी, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. टी.एन. शिंदे आणि प्रा. अश्विनी राऊत यांनी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
दि. १२ डिसेंबर २०१७ | 9

# बुर्ला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दिले स्वच्छतेचे धडे

✓ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर ९ पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविदयालयाकडून महाविदयालय परिसरामध्ये स्वच्छता रॅली काढण्यात आली. सोलापूर महानगरपालिकेच्या स्वच्छ महाविदयालय स्पर्धेत महाविदयालय सहभागी झाले आहे.

महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. या उपक्रमांपैकीच हा उपक्रम होता. या रॅलीचे उद्घाटन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. रार्जेद्र शेंडगे यांनी केले होते.

विद्यार्थिनींनी या रॅलीतून सोलापूरवासीयांना आपला परिसर, आपले घर स्वच्छ राखण्याचे आणि प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन केले. ही रॅली राजेंद्र चौक, कन्ना चौक, साखर पेठ, विणकर बाग परिसरातून काढण्यात आली होती. ही रॅली यशस्वी करण्यासाठी डॉ. रजनी दळवी, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. टी. एन. शिंदे आणि प्रा. अश्विनी राऊत यांनी परिश्रम घेतले.

शिक्षण संस्था संचलित अे. आर. बर्ला महिला महाविदयालयाकडून विणकर बागेमध्ये स्वच्छतेसाठी विदयार्थीनींनी श्रमदान केले. सोलापूर महानगरपालिकेच्या स्वच्छ महाविदयालय स्पर्धेत महाविदयालय सहभागी झाले आहे. महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमापैकी महाविदयालयातीलविदयार्थीनींनी आपल्या श्रमदानातून बागेचा परिसर स्वच्छ केला.

सुराज्य
सोलापूर
१३ डिसेंबर २०१७ 9

## बुर्ला महाविद्यालयातर्फे स्वच्छता रॅली

✓ सोलापूर : सोलापूर महानगरपालिकेच्या स्वच्छ महाविद्यालय स्पर्धेत बुर्ला महाविद्यालय सहभागी झाले आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता रॅली काढण्यात आली. ही रॅली राजेंद्र चौक, कन्ना चौक, साखर पेठ, विणकर बाग परिसरातून काढण्यात आली होती. त्यानंतर विणकर बागेत विद्यार्थिनींनी श्रमदान केले. रॅली यशस्वी करण्यासाठी डॉ. रजनी दळवी, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. टी. एन. शिंदे आणि प्रा. आश्विनी राऊत यांनी परिश्रम घेतले.

सकाळ
सोलापूर, बुधवार,
१३ डिसेंबर २०१७
३

## बुर्ला महाविद्यालयाचे पथनाट्य सादर

सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातर्फे कुचन प्रशाला परिसरात स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर केले. स्वच्छतागृह बांधण्याची गरज, प्लास्टिकचा वापर टाळणे याबाबत पथनाट्यातून प्रबोधन करण्यात आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्यात तुलसी जाधव, अंबिका पेंटा, सोनाली पवार आणि इतर विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

संचार

४ सोलापूर, गुरुवार १४ डिसेंबर २०१७




सोलापूर : बुर्ला महाविद्यालयातर्फे आयोजित स्वच्छता रॅलीत सहभागी विद्यार्थिनी.

# बुर्ला महाविद्यालयातर्फे रॅली संपन्न

**शहर संचार**

सोलापूर, दि. १३- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातर्फे स्वच्छता रॅली अपूर्व उत्साहात काढण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ही रॅली पुढे राजेंद्र चौक, कन्ना चौक, साखर पेठ, विणकर बाग आदी भागातून काढण्यात आली. रॅलीत सहभागी विद्यार्थिनींनी नागरिकांना आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे व प्लॅस्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन केले.

ही रॅली यशस्वी करण्यासाठी या महाविद्यालयातील डॉ. रजनी दळवी, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. अश्विनी राऊत आदींनी परिश्रम घेतले.

संचार

, बुधवार १३ डिसेंबर २०१७ ७

## बुर्लामध्ये पथनाट्यातून स्वच्छतेचा संदेश

**शहर संचार**

सोलापूर, दि. १२- येथील बुर्ला महिला महाविद्यालयाकडून कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय परिसरात पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

या पथनाट्यातून शौचालय बांधणे तसेच परिसर स्वच्छता, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळणे याबाबत प्रबोधन करण्यात आले. महानगरपालिकेच्या स्वच्छ महाविद्यालय स्पर्धेत महाविद्यालय सहभागी झाले आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमापैकी हा एक उपक्रम होता. हे पथनाट्य तुलसी जाधव, अंबिका पेंटा, सोनाली पवार आणि अन्य विद्यार्थिनींनी सादर केले. याला विद्यार्थी व नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

तरुण भारत
गुरुवार, दि. १४ डिसेंबर २०१७ | १

## बुर्ला कॉलेजमध्ये पथनाट्यातून स्वच्छता संदेश

**सोलापूर, दि. १३ डिसेंबर -**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयाकडून स्वच्छतेबाबत कुचन प्रशाला व ज्युनिअर कॉलेज परिसरात पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्यातून शौचालय बांधणे याबरोबर परिसर स्वच्छता, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळणे याबाबत प्रबोधन करण्यात आले. पालिकेच्या स्वच्छ महाविद्यालय स्पर्धेत महाविद्यालय सहभागी झाले होते. महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमापैकीच हा उपक्रम होता. हे पथनाट्य तुलसी जाधव, अंबिका पेंटा, सोनाली पवार आणि इतर विद्यार्थीनींनी सादर केले. यावेळी कुचन प्रशालेतील विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचार २० डिसेंबर २०१७ ७



▶ सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन केतन शहा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी डॉ. प्राजक्ता जोशी, श्याम पाटील, रत्नाकर महाजन, माया पाटील, सुवर्णा कटारे, हेमा वेद व अन्य.

# धाडसीपणामुळेच महिला स्वरक्षण करू शकतील

शहर संचार

▶ सोलापूर, दि. १९- आजच्या स्त्री पुढे आव्हानांचा डोंगर उभा आहे. कधी नव्हे इतकी आजची स्त्री असुरक्षित बनली आहे, अशा वेळी कोणावरही अवलंबून न राहता महिलांनी स्वरक्षणासाठी धाडसीपणाने पुढाकार घेतला पाहिजे. काळाचे आव्हान ओळखून तिने स्वतःला घडविले पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय जैन संघटनेच्या राज्य शाखेचे उपाध्यक्ष केतन शहा यांनी केले.

येथील बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व भारतीय जैन संघटना शहर महिला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट गर्ल या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी शहा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राजक्ता जोशी या होत्या. यावेळी श्याम पाटील, रत्नाकर महाजन, माया पाटील, सुवर्णा कटारे, नीता शहा, हेमा वेद, डॉ. रजनी दळवी, रंजना बनसुडे आदी उपस्थित होते.

शहा पुढे म्हणाले की, महिलांमध्ये प्रचंड ताकद असते. सहनशीलता असते. परंतु आजच्या महिला अतिशय असुरक्षित, हतबल आणि हातश झाल्याचे चित्र दिसत आहे. निर्भयाप्रकरण असो की कोपर्डी प्रकरण यामुळे अखंड महिला विश्व ढवळून निघाले होते, अशा वेळी तिच्यातील आत्मविश्वास जागविला पाहिजे. तिच्यातील परिस्थितीशी दोन हात करण्याची ताकद वाढविली पाहिजे. तरच महिला स्वतःचे रक्षण करू शकतील.

जोशी म्हणाले की, महिलांना निसर्गाने प्रचंड ताकद दिले आहे. तेव्हा महिलांनी परिस्थिती पुढे हतबल न होता परिस्थितीशी लढण्याची तयारी ठेवली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. सूत्रसंचालन सोनाली पवार यांनी केले तर आभार संजय भस्मे यांनी मानले.

सुराज्य सोलापूर | दि. २० डिसेंबर २०१७ | 5

# जोडीदार हा एकमेकांना समजून घेणारा असावा

सोलापूर/प्रतिनिधी

दि.१८ स्थिर जीवन जगण्यासाठी विवाह करणे आवश्यक आहे. या विवाहाच्या अनुषंगाने मुला-मुलींच्या आपला जोडीदार कसा असावा याबाबत प्रचंड अपेक्षा असू शकतात पण वैवाहिक जीवन सुखी समाधानी व यशस्वी होण्यासाठी वैवाहिक जीवनातील जोडीदार हा समजून घेणारा असावा लागतो. असे प्रतिपादन डॉ.विजया महाजन यांनी केले.



बुर्ला महाविद्यालयात व्याख्यान देताना डॉ. विजया महाजन, मंचावर डॉ. मंजुश्री कुलकर्णी, आमले आदी.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर आणि रोटरी क्लब ऑफ नॉर्थ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जोडीदार कसा असावा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.प्राजक्ता जोशी होत्या. व्यासपीठावर डॉ.मंजुश्री कुलकर्णी, विजयश्री आमले, विरेंद्र परदेशी, राजपाल जेठीथोर आदी मान्यवर उपस्थित होते.

३ पुढारी | गुरुवार २१ डिसेंबर २०१७

# जोडीदार एकमेकांना समजून घेणारे असावेत : विजया महाजन

**सोलापूर : प्रतिनिधी**

स्थिर जीवन जगण्यासाठी विवाह करणे आवश्यक आहे. या विवाहाच्या अनुषंगाने मुला-मुलींच्या आपला जोडीदार कसा असावा, याबाबत प्रचंड अपेक्षा असू शकतात, पण वैवाहिक जीवन सुखी समाधानी व यशस्वी होण्यासाठी वैवाहिक जीवनातील जोडीदार हा समजून घेणारा असावा लागतो, असे प्रतिपादन डॉ. विजया महाजन यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर आणि रोटरी क्लब ऑफ नॉर्थ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जोडीदार कसा असावा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ.प्राजक्ता जोशी होत्या. व्यासपीठावर डॉ. मंजुश्री कुलकर्णी, विजयश्री आमले, विरेंद्र परदेशी, राजपाल जेठीथोर, सुगत गायकवाड आदी उपस्थित होते.




**सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात 'जोडीदार कसा असावा' या विषयावर बोलताना डॉ. विजया महाजन.**

पुढे बोलताना महाजन म्हणाल्या की, वैवाहिक जोडीदार निवडताना वास्तववादी विचार करावा. वैवाहिक जोडीदार निवडताना आर्थिक बाबींचा विचार होतोच पण त्याचबरोबर जोडीदार निवडताना दोघांनी एकमेकांचे विचार, अपेक्षा याबाबत चर्चा केली पाहिजे. कुठे कुठे आणि कशा बाबतीत जुळवून घेऊ शकतो, कोणकोणत्या आवडीबाबत जुळवून घेऊ शकतो, हे पाहावे लागते. त्याचबरोबर ज्यांची आपण जोडीदार म्हणून निवड करणार असतो, त्याच्याबरोबरील नाते आपणास आनंद किंवा समाधान देऊ शकेल का, याचाही विचार करावा लागतो.

प्रभारी प्राचार्या डॉ. प्राजक्ता जोशी म्हणाल्या की, जोडीदार निवडताना अपेक्षा भरपूर असतात पण त्याचबरोबर प्रत्यक्ष वैवाहिक जीवन जगत असताना जोडीदार आवश्यक आहे. त्याच्याबरोबर आनंदी व समाधानी जीवन जगता येणे महत्त्वाचे असते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. रंजना बनसुडे यांनी मानले.

# 'बुर्ला'चे कर्देहळ्ळीत श्रमसंस्कार शिबिर

## गुरुवारी प्रारंभ तर ३ जानेवारीला समारोप

शहर संचार

सोलापूर, दि. २४- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक खेडे कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे २८ डिसेंबर ते ३ जानेवारी २०१८ दरम्यान आयोजिले आहे.

आपत्ती निवारण व व्यवस्थापनातील युवतींची भूमिका हे यंदाच्या शिबिराचे घोषवाक्य असून या शिबिराचे उद्घाटन २८ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

२९ रोजी डॉ. अश्विन बोंदार्डे यांचे शिक्षण हक्क कायदा जनजागृती यावर तर ३० रोजी डॉ. टी. व्ही. शिंदे यांचे आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन होणार आहे. ३१ रोजी महिला सबलीकरणाविषयी डॉ. श्रुती वडगबाळकर यांचे तर १ जानेवारी रोजी सचिन जाधव यांचे स्वच्छ भारत अभियान यावर मार्गदर्शन होणार आहे. २ रोजी डॉ. शिवानंद भांजे हे 'सर्वांगीण ग्रामीण विकास' यावर मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिरादरम्यान शेतकरी मेळावा, मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर, महिला व युवती मेळावा तसेच शरद पोतदार यांचा संगीतरजनी सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात येणार आहे. ३ रोजी संस्थेचे सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा समारोप करण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. के. वडजे, डॉ. रजनी दळवी आदी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

**सुराज्य** सोलापूर

शनिवार दि. २३ डिसेंबर २०१७ 9

## बुर्ला महाविद्यालयात स्मार्ट गर्ल कार्यशाळा उत्साहात

सोलापूर : 'मुलींनी आपला आत्मविश्वास, आत्मसंरक्षण, आत्मसन्मान व संरक्षण ह्या गोष्टीकडे प्राधान्यांने लक्ष द्यावे, मुलींनी स्वतःमधील गुण ओळखून त्यांचा विकास केला पाहिजे व कोणत्याही प्रसंगाला आत्मविश्वासाने व खंबीरपणे सामोरे गेले पाहिजे', असे प्रतिपादन रत्नाकर महाजन यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व भारतीय जैन संघटना शहर महिला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट गर्ल या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती.

**पुढारी** सोमवार २५ डिसेंबर २०१७



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयात 'स्मार्ट गर्ल' या विषयावर मार्गदर्शन करताना रत्नाकर महाजन.

## आत्मविश्वास हेच प्रगतीचे पाऊल : महाजन

**सोलापूर : प्रतिनिधी**

मुलांनी आपला आत्मविश्वास, आत्मसंरक्षण, आत्मसन्मान व संरक्षण या गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. मुलींनी स्वत:मधील गुण ओळखून त्यांचा विकास केला पाहिजे व कोणत्याही प्रसंगाला आत्मविश्वासाने व खंबीरपणे सामोरे गेले पाहिजे, असे प्रतिपादन रत्नाकर महाजन यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व भारतीय जैन संघटना शहर महिला विभागाच्यावतीने 'स्मार्ट गर्ल' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, निरोगी संवादामुळे निरोगी नाती निर्माण होतात. तसेच संवादातील महत्त्वाचे घटक आणि निरोगी संवादासाठी काही टिपणीही विद्यार्थिनींना सांगितल्या. विद्यार्थिनींना आपले विचार स्पष्टपणे, आत्मविश्वासाने व खंबीरपणे मांडावेत, अशी अपेक्षाही त्यांनी या कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केली.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील स्त्री अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेस शिक्षक, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

३ पुढारी | सोमवार २५ डिसेंबर २०१७

# संवेदनशील मन, निरीक्षण शक्ती हीच कवितेची बलस्थाने : शेंडगे

**सोलापूर : प्रतिनिधी**

प्रेम आणि मैत्री या महाविद्यालयीन जीवनात भावणाऱ्या उत्कट भावना असतात. संवेदनशील मन आणि निरीक्षण शक्ती यामुळे या भावना शब्दबद्ध करता येतात. यातूनच कविता जन्मास येते. हीच कवितेची बलस्थाने असतात अर्थात मनातील विचार वा भावना लगेच जशाच्या तशा कागदावर उतरवता येत नाहीत. संगीताच्या रियाजामधून जसा उत्तम संगीतकार जन्मास येतो, तसेच साहित्याच्या स्वच्छंदी वाचनातून आणि पुन्हा पुन्हा लेखन करण्यातूनच उत्तम कवी व साहित्यिक जन्मास येत असतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.



**सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागामार्फत काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थिनींनी काव्य वाचन केले.**

बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागामार्फत काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. काव्यवाचन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. शिवानंद भांजे, डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे आणि डॉ. आर. के. वडजे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाप्रसंगी रेणुका कोकणे, पूजा हलकट्टी, सोनाली शिंदे, सुवर्णा चौगुले, अश्विनी कांबळे, पूनम दहिहंडे, वैष्णवी साळुंके, सिद्धी कोकाटे, मंजुषा गंपले, वर्षा कांबळे, धनश्री ढवळे, ऐश्वर्या गिरी, रागिनी घंटे, ज्योती मजगे, पूजा पोगूल, तुलसी जाधव, समरीन मुजावर, सावित्री कदम, अनिता म्हंता, मोनिका गुंडाळे या विद्यार्थिनी आपल्या खास शैलीत कविता सादर केल्या.

प्रास्ताविक डॉ. संजय लांडगे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. कविता मुरुमकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. जाधव यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. अश्विनी राऊत, प्रा. गौरी भोसले उपस्थित होत्या.

सोलापूर
तरुण भारत
सोमवार, दि. २५ डिसेंबर २०१७ | ११

## बुर्ला महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर दत्तक खेडे कर्देहळ्ळी येथे आयोजित केले आहे. दि. २८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत हे शिबीर होणार आहे. आपत्ती निवारण व व्यवस्थापनातील युवतींची भूमिका हे घोषवाक्य घेवून आयोजित केलेल्या या शिबीराचे उदघाटन २८ डिसेंबर रोजी होणार आहे. या उदघाटनाच्या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे प्रमुख पाहुणे आहेत. उपाध्यक्ष ॲड. श्रिनिवास क्यातम हे उदघाटक आहेत.

## सोनाली पवार हिची निवड

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**



बुर्ला महिला महाविद्यालयाती बी.कॉम भाग -३ मध्ये शिकत असलेली सोनाली पवार हिची २२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. हा युवा महोत्सव जयपूर येथे १२ ते १६ जानेवारी या कालावधीत होणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकासाठी हा युवा महोत्सव आयोजित केला जातो. भारत सरकार, युवा कार्य एवं खेल मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय केंद्र, पुणे यांच्याकडून सोलापूर विद्यापिठांतर्गत सोनालीची युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

सुराज्य
सोलापूर
दि. २५ डिसेंबर २०१७ 9

## उत्तम वक्तृत्वासाठी भाषेवर प्रभुत्व असावे : डॉ. भांजे

सोलापूर : वक्तृत्व अशी कला आहे की, जी माणसाला अत्युच्च शिखरावर पोहोचवू शकते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कलेची साधना केली पाहिजे. नियमित विविध विषयाचे वाचन केले पाहिजे. यातूनच भाषेवर प्रभुत्व निर्माण होते. संभाषण कौशल्य आत्मसात होते. उत्तम वक्तृत्वासाठी हे आवश्यक असते. असे प्रतिपादन वाणिज्य विभागप्रमुख डॉ.शिवानंद भांजे यांनी केले. मराठी विभागामार्फत वक्तृव स्पर्धेचे आयोजन केले होते. याप्रसंगी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना डॉ.भांजे बोलत होते. प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.संजय लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.मयुरा जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.पल्लवी कोडम यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा.सुरेखा बत्तुल, प्रा.अश्विनी राऊत आणि विद्यार्थिनींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## कर्देहळ्ळी येथे श्रमसंस्कार शिबिर

सोलापूर : २३ पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ऐ.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक खेडे मोजे कर्देहळ्ळी ता.दक्षिण सोलापूर येथे आयोजित केले आहे. दि.२८ डिसेंबर २०१७ ते ०३ जानेवारी २०१८ या कालावधीत हे शिबिर होणार आहे. आपत्ती निवारण व व्यवस्थापनातील युवतींची भूमिका हे घोषवाक्य घेऊन आयोजित केलेल्या या शिबिराचे उद्घाटन २८ डिसेंबर रोजी होणार आहे. या उद्घाटनाच्या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे प्रमुख पाहुणे आहेत. उपाध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम हे उद्घाटक आहेत. तर गावचे सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे हे भूषविणार आहेत. शिबिराचा समारोप प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या हस्ते होणार आहे. सहसचिव श्रीधर चिटयाल, खजिनदार दिनेश यन्नम यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिटयाल आणि विश्वस्त मंडळ यांचे सहकार्य लाभत आहे. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.आर.के.बडजे, डॉ.रजनी दळवी आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

सोलापूर तरुण भारत
मंगळवार, दि. २६ डिसेंबर २०१७ | ११

# एकपात्री प्रयोग हे अभिनयातील मोठे आव्हान : शेंडगे



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर –** एकपात्री प्रयोग हे अभिनयातील मोठे आव्हान असते. एकपात्री अभिनयाचा प्रयोग करताना प्रत्येक व्यक्तिरेखेचा बारकाईने आणि सूक्ष्म अभ्यास करावा लागतो. प्रत्येक व्यक्तीमत्वाच्या छटा विचारात घ्याव्या लागतात. यासाठी निरीक्षण शक्ती उत्तम असावी लागते. ज्या काळातील पात्र रंगवायचे आहे त्या काळातील परिस्थिती नजरेसमोर ठेवावी लागते. तरच एकपात्री प्रयोग यशस्वी होतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

प्रास्ताविक डॉ. संजय लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पल्लवी कोडम यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. मयुरा जाधव यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

संचार
४ सोलापूर, मंगळवार २६ डिसेंबर २०१७

# उत्तम वक्तृत्वासाठी भाषेवर प्रभुत्व आवश्यक : डॉ. भांजे

शहर संचार

सोलापूर, दि. २५ - वक्तृत्व अशी कला आहे की, जी माणसाला अत्युच्च शिखरावर पोहोचवू शकते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कलेची साधना केली पाहिजे. नियमित विविध विषयांचे वाचन केले पाहिजे. यातूनच भाषेवर प्रभुत्व निर्माण होते. संभाषण कौशल्य आत्मसात होते. उत्तम वक्तृत्वासाठी हे आवश्यक असते, असे प्रतिपादन वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शिवानंद भांजे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील मराठी विभागामार्फत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. भांजे बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

'आंतरजातीय विवाह योग्य की अयोग्य' आणि 'आधुनिक समाजमाध्यमे आणि आजची तरुणाई' असे या स्पर्धेचे विषय होते. या स्पर्धेमध्ये सोनाली पवार (बी. कॉम ३) हिला प्रथम क्रमांक, संजना सरवदे (बी.ए. २) हिला द्वितीय क्रमांक आणि मनीषा कुमारकुंटला (बी. कॉम. ३) या विद्यार्थिनीला तृतीय क्रमांक मिळाला. प्रा. रंजना बनसुडे आणि डॉ. शंकर राजे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. संजय लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मयुरा जाधव यांनी केले. प्रा. पल्लवी कोडम यांनी आभार मानले. या कार्यक्रमास प्रा. सुरेख बत्तुल, प्रा. अश्विनी राऊत आदींची उपस्थिती होती.



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित वक्तृत्व स्पर्धेत डॉ. शिवानंद भांजे यांनी मार्गदर्शन केले.

३ पुढारी | मंगळवार २६ डिसेंबर २०१७

# सोनाली पवार हिची राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड

**सोलापूर : प्रतिनिधी**

बुर्ला महिला महाविद्यालयातील बी.कॉम. भाग ३ मध्ये शिकत असलेली सोनाली पवार हिची २२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. हा युवा महोत्सव जयपूर येथे १२ ते १६ जानेवारी २०१८ या कालावधीत होणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकासाठी हा युवा महोत्सव आयोजित केला जातो. भारत सरकार, युवा कार्य एवं खेल मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रिय केंद्र, पुणे यांच्याकडून सोलापूर विद्यापीठांतर्गत सोनाली पवार हिची या युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

सोनाली पवार हिच्या या निवडीबाबत संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी आदींनी अभिनंदन केले आहे.

सकाळ
सोलापूर, गुरुवार,
२८ डिसेंबर २०१७
१

# बुर्ला महाविद्यालयात एकपात्री स्पर्धा

सोलापूर : ए. आर. बुर्ला महाविद्यालयात मराठी विभागातर्फे एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत तुलसी जाधव, पूनम दहीहंडे, सोनाली पवार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. या वेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. संजय लांडगे, प्रा. पल्लवी कोडम, डॉ. मयुरा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# कुटुंब व समाजात महिलांचा सन्मान व्हावा

## बुर्ला महाविद्यालयाचे पारितोषिक वितरण

शहर संचार

सोलापूर, दि. १०- महिला या निसर्गाच्या चमत्कार असून पुरुषी व्यवस्थेने तिला अनेक बंधनात जखडून ठेवले आहे. परंतु समर्पित भावनेने जळत राहून विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या या महिलांचा आता कुटुंब व समाजात सन्मान झाला पाहिजे, अशी अपेक्षा मुंबई येथील प्रसिध्द कवी अरुण म्हात्रे यांनी व्यक्त केली.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या २८ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून म्हात्रे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, विश्वस्त प्रसाद श्रीराम यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. म्हात्रे पुढे म्हणाले, महाराष्ट्र हा जिजाबाई, अहिल्याबाई आणि सावित्रीबाई अशा थोर महिलांचा वारसा सांगणारा प्रदेश असून आजच्या महिला त्यांचा हा वारसा सक्षमपणे पुढे चालवित आहेत. खेड्यात पुरुष शेतकऱ्यांची आत्महत्या वाढत असताना त्या डगमगून न जाता परिस्थितीला धैर्याने तोंड देत आहेत. महिलांचे हे जीवन कौतुकास्पद आहे.




सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे कवी अरुण म्हात्रे. यावेळी संस्थाध्यक्ष पांडुरंग दिड्डी, श्रीनिवास कटकूर, श्रीधर चिट्याल, डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

यावेळी प्राचार्य डॉ. शेंडगे यांना डी.लिट. पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा तसेच इंग्रजी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या डॉ. अॅनी जॉन, सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य डॉ. तुकाराम शिंदे, वामनदादा कर्डक पुरस्कारप्राप्त डॉ. संजय लांडगे व अन्य पुरस्कारप्राप्त व विविध मंडळांवर निवड झालेल्या आणि पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात अला. यंदाच्या वर्षी मिस बुर्ला पुरस्कार शिवबाई हेगडे या विद्यार्थिनीला देण्यात आला.

याप्रसंगी अॅड. क्यातम यांनी आजच्या महिला सक्षम असल्याचे सांगून त्यांना पाठबळ देण्याची गरज असल्याचे नमूद केले. पारितोषिकाचे वाचन डॉ. जॉन, प्रा. श्रीनिवास गुंडेली, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. आर. के. वडजे यांनी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले तर आभार डॉ. अॅनी जॉन यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षकवृंद व पालक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
बुधवार, दि. ३ जानेवारी २०१८ 9

# स्पर्धा परिक्षा अवघड नाही : जाधव




बुर्ला महाविद्यालयाती बोलताना सचिन जाधव, मंचावर प्रा. तुकाराम शिंदे

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दि. २९ स्पर्धा परिक्षा अवघड असते हा भ्रम नको. मनाची द्विधा अवस्था नको. स्पर्धा परिक्षेतून जे पद प्राप्त करायचे आहे त्याबाबत स्पष्टता हवी. अभ्यास समजून घेत केला पाहिजे तरच स्पर्धा परिक्षेत यश मिळते असे प्रतिपादन विक्रीकर अधिकारी सचिन जाधव यांनी केले. ए. आर बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. तुकाराम शिंदे होते. प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले डॉ. शंकर राजे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. शिरीष भोसले, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. टी.एन.शिंदे, प्रा. इंदापूरे, प्रा. अश्विनी राऊत, प्रा. भोसले, प्रा. कोडम, प्रा. जाधव उपस्थित होते.



# बुर्ला महाविद्यालयातर्फे रक्तदान शिबिर

✔ सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे. कर्देहळ्ळी येथे आयोजित केले आहे. आपत्ती निवारण आणि व्यवस्थापनातील युवतींची भूमिका हे घोषवाक्य घेऊन आयोजित केलेल्या या शिबिरात विविध उपक्रमाचे आयोजन केले आहे. रक्तदान शिबिराचे आयोजन हा त्यापैकीच एक उपक्रम होता. या शिबिराचे उद्‌घाटन गावचे सरपंच जगन्नाथ कोळी यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्‌घाटन झाले या प्रसंगी उपसरपंच दीपक सावंत यांची उपस्थिती होती. यावेळी २७ जणांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. आर.के. वडजे, डॉ. रजनी दळवी, प्रा. सुरेखा बत्तुल आणि डॉ. शंकर राजे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

सोलापूर, गुरुवार
४ जानेवारी २०१८

४

C

## बुर्ला महाविद्यालयात अर्थशास्त्र परिषद

**सोलापूर :** ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात ४ फेब्रुवारीला अर्थशास्त्र परिषद होणार आहे. काळा पैसा - विमुद्रीकरण आणि चलनव्यवस्था हा विषय परिषदेत चर्चेसाठी असणार आहे. अधिक माहितीसाठी ९४२३५८८९८५ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

संचार

८ सोलापूर, शुक्रवार ५ जानेवारी

## बुर्ला महाविद्यालयात २७ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ४-** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कर्देहळ्ळी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन सरपंच जगन्नाथ कोळी यांच्या हस्ते झाले.

यावेळी उपसरपंच दीपक सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. आर.के. वडजे, डॉ. रजनी दळवी, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शंकर राजे आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
शुक्रवार, दि. ५ जानेवारी २०१८



# रासेयोचे श्रमसंस्कार शिबिरातून परिवर्तन : गोप

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रम संस्कार शिबीर ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. बदलत्या परिस्थितीत स्वच्छता, शौचालय, महिलांच्या प्रश्नाबाबात उपाय, जलसंवर्धन, आधुनिक शिक्षणपध्दती याबाबत नवीन संकल्पना येतात. रासेयोच्या माध्यमातून या संकल्पना ग्रामणी भागात पोहोचतात. यामुळे ग्रामीण भागातील जीवनात परिवर्तन घडून येते, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे दशरथ गोप यांनी केले.




बुर्ला महाविद्यालयात रासयोचे शिबीर कर्देहळ्ळी येथे आयोजित केले होते. समारोपाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, विजय गुल्लापल्ली, यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे होते. व्यासपीठावर सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच, दिपक सावंत, डॉ. तुकाराम शिंदे आदी मन्यवरांची उपस्थिती होती.

संचार
२ सोलापूर, शनिवार ६ जानेवारी २०१८

# स्पर्धा परीक्षा अवघड असते हा भ्रम सोडा : जाधवर

**सोलापूर, दि. ५-** स्पर्धा परीक्षा अवघड असते हा भ्रम सोडून द्या. स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यास समजून घेतला पाहिजे. जे पद मिळवायचे आहे त्याबाबत आपले स्पष्टता असणे महत्त्वाचे असल्याचे मत विक्रीकर अधिकारी सचिन जाधवर यांनी व्यक्त केले.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात जॉब प्लेसमेंट अँन्ड करिअर गायडन्स ब्युरो, अर्थ-वाणिज्य मंडळ आणि ड्रीम फाउंडेशनच्यावतीने स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर आयोजित व्याख्यानात जाधवर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. तुकाराम शिंदे हे होते.

याप्रसंगी डॉ. अॅनी जॉन, प्रा. रंजना बनसुडे, ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशीनाथ भतगुणकी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. शिवानंद भांजे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. शिंदे यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेताना स्पर्धा परीक्षेतून करिअर करण्याचा निर्णय घेतल्यास त्या परीक्षेत यश मिळविणे शक्य होत असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास प्रा. शिरीष भोसले, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. अश्विनी राऊत यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले तर डॉ. शंकर राजे यांनी आभार मानले.

५ पुढारी | सोलापूर, रविवार ७ जानेवारी २०१८

# बुर्ला महाविद्यालयात रक्तदान शिबिर

सोलापूर (प्रतिनिधी) : बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे कर्देहळ्ळी येथे आयोजित केले आहे. 'आपत्ती निवारण आणि व्यवस्थापनातील युवतींची भूमिका' हे घोषवाक्य घेऊन आयोजित केलेल्या या शिबिरात विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. रक्तदान शिबिराचे आयोजन हा त्यापैकीच एक उपक्रम होता. या शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच जगन्नाथ कोळी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपसरपंच दीपक सावंत यांची उपस्थिती होती. यावेळी २७ जणांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. आर.के. वडजे, डॉ. रजनी दळवी, प्रा. सुरेखा बत्तुल आणि डॉ. शंकर राजे यांनी परिश्रम घेतले.

संचार २ सोलापूर, रविवार ७ जानेवारी २०१८

# स्वयंसेविकांनी स्वच्छतादूत व्हावे : जाधव

सोलापूर, दि. ६- स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत बनून गावागावात स्वच्छता निर्माण करावी आणि लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक सचिन जाधव यांनी केले.

कर्देहळ्ळी (ता.द. सोलापूर) येथे बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात जाधव 'स्वच्छ भारत अभियान' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जगन्नाथ कोळी होते.

या शिबिरामध्ये प्रा. जवाहर मोरे (मंद्रूप) यांनी 'हास्यखजिना' हा कार्यक्रम सादर केला.

३ पुढारी | शनिवार
६ जानेवारी २०१८

# 'रासेयो'च्या शिबिरातून ग्रामीण जीवनात परिवर्तन : गोप




सोलापूर : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलताना दशरथ गोप.

सोलापूर : प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. बदल्या परिस्थितीत स्वच्छता, शौचालय, महिलांच्या प्रश्नाबाबत उपाय, जलसंवर्धन, आधुनिक शिक्षण पध्दती याबाबत नवनवीन संकल्पना येतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून या संकल्पना ग्रामीण भागात पोहोचतात. यामुळे ग्रामीण भागातील जीवनात परिवर्तन घडून येते, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले होते. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम व विश्वस्त विजय गुल्लापल्ली यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत, डॉ. तुकाराम शिंदे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

गोप पुढे म्हणाले की, रासेयो श्रमसंस्कार शिबिरातून शिबिरार्थी ज्या संकल्पना गावात घेऊन येतात, त्याची गावातील लोक अंमलबजावणी मनपासून करतात. हे शिबिर कालावधीपुरता मर्यादित न राहता त्यांनी त्याचा अंमल केला पाहिजे.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अंबिका पेंटा आणि सोनाली पवार या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. के. वडजे यांनी केले. आभार प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. बनसुडे, अमोल पोळ, ग्रा.पं. सदस्य नंदकुमार पौळ, संजय पौळ, राजेंद्र पौळ, सुरेखा तोगरे, एस.जी. तोळनुरे आणि नरसिंग पौळ, शिबिरार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्यावेळी सचिन जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत व्हावे : सचिन जाधव

सोलापूर (प्रतिनिधी) : महात्मा गांधी यांनी स्वराज्याइतकेच स्वच्छतेला महत्त्व दिले होते. स्वच्छता झाली तरच लोकांना आरोग्यदायी जीवन लाभेल. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत बनून गावागावात स्वच्छता निर्माण करावी आणि लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे कार्यक्रम समन्वयक सचिव जाधव यांनी केले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्यावेळी सचिन जाधव प्रमुख पाहुणे म्हणून स्वच्छ भारत अभियान या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमावेळी महाविद्यालयातील शिबिरार्थी व ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेचे कार्य अतिशय उत्कृष्टपणे केले, असेही उद्‌गार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या शिबिरामध्ये प्रा. जवाहर मोरे यांनी 'हास्यखजिना' हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जगन्नाथ कोळी होते. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. वडजे आर. के., प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, कृष्णा पवार, बंडगर, विद्यार्थिनी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक रुक्मिणी कोळी हिने केले. आभार लक्ष्मी रच्चा हिने मानले तर सूत्रसंचालन आरती कोटा हिने केले.

संचार



# मोबाइलवर बोलत वाहन चालविल्यामुळे २१३८ बळी

शहर संचार

सोलापूर, दि. ५- मोबाइलवर बोलत वाहन चालविल्यामुळे गतवर्षी २१३८ जणांचा आणि मद्यप्राशन करून वाहन चालविल्यामुळे ६१३१ जणांचा अपघातात बळी गेला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष काणे यांनी एका कार्यक्रमतात बोलताना दिली.



सोलापूर : वाहतूक नियम व जनजागृती या विषयावर मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक संतोष काणे. यावेळी डॉ. प्राजक्ता जोशी, सुनील जाधव व अन्य.

राजेंद्र चौकातील ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात 'वाहतूक नियम व जनजागृती' या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्यासपीठावर पोलीस निरीक्षक सुनील जाधव, पोलीस उपनिरीक्षक भुसनूर, सीमा ढाकणे व एस. बी. चवरे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना काणे म्हणाले, वाहनचालकांची चूक, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मोबाइलवर बोलत वाहन चालवणे अशा अनेक कारणांमुळे रस्ते अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. लोकांच्या सुरक्षिततेसाठी वाहतुकीचे नियम व कायदे तयार केले आहेत. वाहतुकीच्या नियमांचे पालन न केल्यामुळे अपघात होतात. यामध्ये अनेकांचा बळी जातो. रस्ते अपघात टाळण्यासाठी लोकांनी वाहतूक नियमांचे व कायद्याचे स्वत:हून पालन करायला हवे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी सुनील जाधव यांनी विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. संजीवनी सादूल यांनी उपयुक्त सूचना मांडल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर. के. वडजे यांनी केले. डॉ. रजनी दळवी यांनी आभार मानले.

सुराज्य
सोलापूर
दि. ७ जानेवारी २०१८ 12



## स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत व्हावे

सोलापूर : महात्मा गांधी यांनी स्वराज्याइतके स्वच्छतेला महत्व दिले होते. स्वच्छता झाली तरच लोकांना आरोग्यदायी जीवन लाभेल त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत बनून गावागावात स्वच्छता निर्माण करावी आणि लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून द्यावे. स्वच्छता दूत व्हावे असे प्रतिपादन सचिन जाधव यांनी केले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे पद्मशाली शिक्षण संस्थेच्या अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या वेळी सचिन जाधव प्रमुख पाहुणे म्हणून स्वच्छ भारत अभियान या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जगन्नाथ कोळी होते. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.रजनी दळवी, प्रा.डॉ. वडजे आर के, प्रा.डॉ.प्राजक्ता जोशी, कृष्णात पवार, बंडगर विद्यार्थीनी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रूक्मीणी कोळी हिने केले.कार्यक्रमाचे आभार लक्ष्मी रच्चा हिने मानल. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरती कोटा यांनी केला.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
रविवार, दि. ७ जानेवारी २०१८ ११

## सोनाली पवारची सचिवपदी निवड

सोलापूर, दि.६ जानेवारी-



ए.आर बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषद सचिवपदी सोनाली पवार हिची सचिवपदी निवड झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी दिली. डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. आर.के वडजे, डॉ. रजनी दळवी यांच्या देखरेखीखाली निवडणूक पार पडली. सोनाली पवार हिचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, अॅड. श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, दिनेश यन्नम यांनी अभिनंदन केले.

सकाळ
सोलापूर, रविवार
७ जानेवारी २०१८
३

# बुर्ला महाविद्यालयाचे कर्देहळ्ळीत शिबिर

सोलापूर, ता. ६ : बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिर कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे आयोजित केले आहे.

शिबिराचे उद्‌घाटन संस्थेचे उपाध्यक्ष श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष पांडुरंग दिड्डी उपस्थित होते. व्यासपीठावर सरपंच जगन्नाथ कोळी, उपसरपंच दीपक सावंत, डॉ. तुकाराम शिंदे यांची उपस्थिती होती. आर. के. वडजे यांनी प्रास्ताविक केले. सोनाली पवार हिने सूत्रसंचालन केले. डॉ. रजनी दळवी यांनी आभार मानले.



सोलापूर : कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्रमसंस्कार शिबिर उद्‌घाटनप्रसंगी पांडुरंग दिड्डी, श्रीनिवास क्यातम, डॉ. राजेंद्र शेंडगे, जगन्नाथ कोळी, दीपक सावंत, डॉ. तुकाराम शिंदे आदी.

या वेळी ग्रामस्थ, प्रा. डॉ. संजय लांडगे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. शिरीष भोसले, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. कमलाकर रुगे व शिबिरार्थी उपस्थित होते.

दिव्य मराठी

सोलापूर. सोमवार, ८ जानेवारी २०१८ | ३

## बुर्ला महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेच्या सचिवपदी पवार



सोलापूर । पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची निवडणूक झाली. तीत सोनाली पवार ही सचिव म्हणून निवडून आली. रूपा चव्हाण, मंजुषा गंपले, तुलसी जाधव हे उमेदवार होते. डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. आर. के. वडजे, डॉ. रजनी दळवी यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली. निवडीनंतर संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सचिव दशरथ गोप, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले आहे.

सुराज्य सोलापूर , दि. ८ जानेवारी २०१८ 9

# स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत व्हावे

सोलापूर/प्रतिनिधी

महात्मा गांधी यांनी स्वराज्याइतके स्वच्छतेला महत्व दिले होते. स्वच्छता झाली तरच लोकांना आरोग्यदायी जीवन लाभेल त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी स्वच्छता दूत बनून गावागावात स्वच्छता निर्माण करावी आणि लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून यावे. असे प्रतिपादन सचिन जाधव यांनी केले.



श्रमसंस्कार शिबिराच्या वेळी मागर्दशन करताना सचिन जाधव, जगन्नाथ कोळी, प्रा डॉ प्राजक्ता जोशी

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळळी येथे पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ऐ.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या वेळी सचिन जाधव प्रमुख पाहुणे म्हणून स्वच्छ भारत अभियान या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयातील शिबीरार्थींनी व ग्रामास्थामध्ये स्वच्छतेचे कार्य अतिशय उत्कृष्टपणे केले असेही उद्गार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

या शिबिरामध्ये प्रा.जवाहर मोरे यांनी हास्यखजिना हा कार्यक्रम सादर केले. शिबीरार्थी व ग्रामस्थ यांना मनमुराद हसविणारा हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जगन्नाथ कोळी होते. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा:डॉ.रजनी दळवी, प्रा.डॉ.वडजे आर के, प्रा.डॉ.प्राजक्ता जोशी, कृष्णात पवार, बंडगर विद्यार्थीनी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रूक्मीणी कोळी हिने केले. कार्यक्रमाचे आभार लक्ष्मी रच्चा हिने मानल. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरती कोटा यांनी केला.

३ पुढारी | सोमवार ८ जानेवारी २०१८



सोलापूर : आविष्कार संशोधन स्पर्धेतील यशस्वीतांसमवेत बुर्ला महाविद्यालयाचे प्राध्यापक दिसत आहेत.

# बुर्लाचे आविष्कार महोत्सवात यश

**सोलापूर : प्रतिनिधी**

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाने सोलापूर विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन महोत्सव २०१७ मध्ये भरीव यश संपादन केले आहे. यामध्ये वाणिज्य विभागातून श्रीनिवास बोगम यांच्या ई-कॉमर्स या विषयावरील संशोधन सादरीकरणास प्रथम क्रमांक मिळाला आहे, तर मानव्यशास्त्र विभागातून खासनदा मुचाले हिच्या 'बराक ओबामा राजकीय भाषण एक मूल्यमापन' या विषयावरील सादरीकरणास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. हा महोत्सव मौजे कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एसकेएन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअर येथे आयोजित केला होता. सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयाने यामध्ये सहभाग नोंदविला होता.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. शिवाजी भांजे, डॉ. ॲनी जॉन, प्रा. रंजना बनसुडे यांचे मार्गदर्शन लाभले होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत

मंगळवार, ९ जानेवारी २०१८

# बुर्ला महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेच्या सचिवपदी पवार

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची निवडणूक झाली. तीत सोनाली पवार ही सचिव म्हणून निवडून आली. रुपा चव्हाण, मंजुषा गंपले, तुलसी जाधव हे उमेदवार होते. डॉ. तुकाराम शिंदे, डॉ. आर. के. वडजे,-डॉ. रजनी दळवी यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली. निवडीनंतर संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सचिव दशरथ गोप, उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले आहे.

३ पुढारी | शुक्रवार १२ जानेवारी २०१८



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात कवी संमेलनाचे उद्‌घाटन करताना प्राचार्य राजेंद्र शेंडगे आदी.

# बुर्ला महिला महाविद्यालयात कवी संमेलन उत्साहात

**सोलापूर : प्रतिनिधी**

बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने कवी संमेलन आयोजित करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते कवी संमेलनाचे उद्‌घाटन झाले.

या संमेलनात देवेंद्र औटी, शोभना सागर, रेणुका बुधाराम, डॉ. कविता मुरुमकर, वंदना कुलकर्णी, डॉ. संजय लांडगे, मारुती कटकधोंड, डॉ. श्रृती वडगबाळकर, निर्मला मठपती, डॉ. अजीज नदाफ यांनी सहभाग घेतला. डॉ. कविता मुरुमकर यांच्या 'बाई असते एक घरंदाज स्त्री, मिळेल त्या अंगणात रंग भरत असते, नसतील रंग तर हळद कुंकू टाकत असते' आणि गोविंद काळे यांच्या 'धरण' या कवितेला श्रोत्यांनी मनापासून दाद दिली.

प्रास्ताविक डॉ. संजय लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कविता मुरुमकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन पल्लवी कोडम यांनी केले.

लोकमत सोलापूर, गुरुवार, दि. १८ जानेवारी २०१८ ३

# आर्थिक साक्षरतेमुळे सुरक्षित जगण्याची हमी: येळीकर

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर: श्रीमंत होण्याची स्वप्ने सर्वांनी पाहावीत, पण त्यासाठी पैसे कमवावेत, अनावश्यक खर्च टाळून बचत करावी. जीवन व आरोग्य सुरक्षा विमा काढावा. आजच्या काळातील हीच आर्थिक साक्षरता आहे. अशा या आर्थिक साक्षरतेमुळे जीवन सुरक्षित व समाधानी जगण्याची हमी मिळते, असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर येळीकर यांनी केले.

ए. आर. बुर्ला महाविद्यालयात अर्थ वाणिज्य मंडळ व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आर्थिक साक्षरता' विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.




ए. आर. बुर्ला महाविद्यालयात 'आर्थिक साक्षरता' या विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. राजशेखर येळीकर, शेजारी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. शंकर राजे आदी.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्राजक्ता जोशी होत्या. व्यासपीठावर प्रा. रंजना बनसुडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. येळीकर म्हणाले, भारतीयांना आर्थिक साक्षरतेसंबंधी पारंपरिक ज्ञान आहे. अंथरुण पाहून पाय पसरावे, या म्हणीतून उत्पन्नाच्या तुलनेत खर्च करावा, हा धडा मिळतो. आज आर्थिक साक्षरतेची कक्षा विस्तारत आहे. यामध्ये पैसा कमावणे, बचत करणे, अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी दैनंदिन खर्चाची नोंद ठेवणे, शेअर्समध्ये पैशाची गुंतवणूक करणे आणि रिव्हर्स मॉर्गेज आदींचा समावेश होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. सूत्रसंचालन रुपा चव्हाण यांनी तर आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. अश्विनी राऊत, प्रा. हिरेमठ, प्रा. नादरगी, विद्यार्थी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
दि. १८ जानेवारी २०१८ 9

# आर्थिक साक्षरतेमुळे सुरक्षित जगण्याची हमी

## : डॉ. चंद्रशेखर येळीकर यांचे प्रतिपादन

सोलापूर/प्रतिनिधी




श्रीमंत होण्याची स्वप्ने सर्वांनी पाहवीत पण त्यासाठी पैसे कमवावेत, अनावश्यक खर्च टाळून बचत करावी,जीवन व आरोग्य सुरक्षा विमा काढावा, आजच्या काळातील हीच आर्थिक साक्षरतेमुळे जीवन सुरक्षित व समाधानी जगण्याची हमी मिळते असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर येळीकर यांनी केले.

अे.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात अर्थ वाणिज्य मंडळ व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता या विषयावार कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी ते अर्थिक साक्षरता या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.प्राजक्ता जोशी होत्या. प्रा.रंजना बनसुडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होत्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शिवानंद भांजे यांनी केले. सुत्रसंचालन रूपा चव्हाण यांनी केले. या वेळी कार्यक्रमास डॉ.टी.एन.शिंदे प्रा.अश्विनी राऊत प्रा.हिरेमठ, प्रा.नादंरगी व विद्यार्थ्यांनी बहुसंख्य उपस्थित होते.

दिव्य सिटी | सोलापूर. शुक्रवार, १९ जानेवारी २०१८ | ५

# आविष्कार संशोधन महोत्सवात सोलापूर विद्यापीठ तिसऱ्या स्थानी




यशस्वितांसमवेत कुलसचिव डॉ. गणेश मंझा, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक बी.पी. पाटील, डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. शिवाजी शिंदे आदी मान्यवर.

प्रतिनिधी । सोलापूर

राहुरी कृषी विद्यापीठात १५ ते १७ जानेवारी दरम्यान झालेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात सोलापूर विद्यापीठाने तिसऱ्या स्थानावर झेप घेऊन बलाढ्य विद्यापीठांसमोर आपल्या गुणवत्तेची व संशोधकीय वृत्तीची चमक सिद्ध केली. या महोत्सवात सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाखांच्या प्रकारात सहभाग घेतला होता.

सोलापूर विद्यापीठाने पारंपरिक विद्यापीठांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरून मुंबई, पुणे पाठोपाठ तिसरा क्रमांक पटकावला. इतर विद्यापीठांच्या मानाने नवीन व केवळ एक जिल्ह्यासाठी असणाऱ्या या विद्यापीठाने या महोत्सवात पाच पारितोषिके पटकावली. त्यातील चार प्रथम क्रमांकाची आहेत.

## यांना पारितोषिके

भाग्यश्री तोडकरी (वालचंद, पदव्युत्तर गट, प्रथम), ज्योती वाघमारे (वालचंद, शिक्षक गट, प्रथम), अनुपमा पवार (विज्ञान महाविद्यालय सांगोला, पदवी गट, द्वितीय), श्रीनिवास बोगम (बुर्ला महिला, पदव्युतर पदवी गट, प्रथम), अनिल शिंदे (कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पदव्युत्तर पदवी गट, प्रथम क्रमांक)

प्रभारी कुलगुरू नितीन करमाळकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. राज्य समन्वयक डॉ. प्रमोद पाब्रेकर यांनी एका जिल्ह्यासाठी असणाऱ्या विद्यापीठाने सर्वच प्रकारात सहभाग नोंदविला व उत्तम यश मिळविले याचे विशेष कौतुक केले.

संचार ४ सोलापूर, शनिवार २० जानेवारी २०१८

# भागभांडवल बाजारात नागरिकांनी गुंतवणूक करावी

शहर संचार

सोलापूर, दि. १९- भारत हा देश जर्मनी व रशिया या देशापेक्षा गुंतवणुकीसाठी फायदेशीर आहे. यामुळे अनेक कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. याचा लोकांनी फायदा करून घ्यावा. भाग भांडवल बाजाराचा अभ्यास करावा आणि जेथे गुंतवणूक केल्यास फायदा होईल, अशा कंपन्यांमध्ये भागभांडवल गुंतवावे, असे आवाहन डॉ. एम. जी. मुल्ला यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळामार्फत 'गुंतवणुकीची विविध माध्यमे' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. शिरीष भोसले, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. सुरेखा बत्तुल,



प्रा. नादरगी आणि प्रा. हिरेमठ उपस्थित होते. डॉ. मुल्ला पुढे म्हणाले, संपत्ती निर्माण करण्याइतपत संपत्तीचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असते. यादृष्टीनेच गुंतवणुकीचा विचार केला जात असतो. गुंतवणूक करताना सुरक्षितता आणि योग्य परतावा मिळण्याची हमी यास प्राधान्य द्यायला हवे. डॉ. जोशी म्हणाल्या की, सर्वांनीच अनावश्यक खर्च टाळून गुंतवणूक करण्याबाबत जागरूक राहिले पाहिजे तरच आपले भविष्य सुरक्षित बनू शकते. प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले.

तरुण भारत
www.tarunbharat.org

दि. २२ जानेवारी २०१८ ११

## अनुसया बुर्ला पुण्यतिथी कार्यक्रम

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-.**

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला यांची २८ वी पुण्यतिथी दि. २३ जानेवारी रोजी साजरी होत आहे. अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे भूषवणार आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष अॅड.श्रीनिवास क्यातम, दशरथ गोप, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
, दि. २४ जानेवारी २०१८
११



# बुर्ला कॉलेजमध्ये वेशभूषा, केशभूषा स्पर्धा

**सोलापूर, दि. २३ जानेवारी-**

बुर्ला महिला महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाकडून वेशभूषा व केशभूषा स्पर्धेचे आयोजन केले होते. वेशभूषा स्पर्धेत रचना कोंडी हिचा प्रथम क्रमांक , गीता भोसले हिचा व्दितीय क्रमांक, आणि नवनीत यलगम, या विद्यार्थीनीचा तृतीय क्रमांक आला आहे. या स्पर्धेत प्रतिभा लोकुर्ते , पूजा कामुर्ती तुलसी जाधव,सोनम काशीद, सौंदर्या मच्छा, वैष्णवी पाटील, सुरभी यलगम, श्रध्दा अलकुंटे, प्रियंका मिठ्ठा, मनिषा कुमरकुंठा, प्रगती पवार या विद्यार्थीनींनी भाग घेतला.

सकाळ
सोलापूर, सोमवार
२९ जानेवारी २०१८
C

## बुर्ला महिला महाविद्यालय

राजेंद्र चौक येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त मल्लिकार्जुन सरगम, विद्यार्थिनी प्रतिनिधी सोनाली पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. टी. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रजनी दळवी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुकाराम शिंदे यांनी आभार मानले. या वेळी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.




सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानाच्या उद्घाटनाप्रसंगी दीप प्रज्वलन करताना वक्त्या डॉ. विजया महाजन. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. प्राजक्ता जोशी व अन्य.

# जोडीदार समजून घेणारा असावा : डॉ. महाजन

शहर संचार

सोलापूर, दि. २८- 'स्थिर जीवन जगण्यासाठी विवाह करणे आवश्यक आहे. या विवाहाच्या अनुषंगाने मुला-मुलींच्या आपला जोडीदार कसा असावा याबाबत प्रचंड अपेक्षा असू शकतात. पण वैवाहिक जीवन सुखी-समाधानी व यशस्वी होण्यासाठी वैवाहिक जीवनातील जोडीदार हा समजून घेणारा असावा लागतो.' असे प्रतिपादन डॉ. विजया महाजन यांनी केले.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा, सोलापूर आणि रोटरी क्लब ऑफ नॉर्थ सोलापूर यांच्यातर्फे 'जोडीदार कसा असावा' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. महाजन बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या डॉ. प्राजक्ता जोशी या होत्या. याप्रसंगी डॉ. मंजूश्री कुलकर्णी, विजयश्री आमले, वीरेंद्र परदेशी, राजपाल जेठीथोर, सुगत गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. रंजना बनसुडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

संचार , शुक्रवार २ फेब्रुवारी २०१८ ११

# 'बुर्ला'मध्ये अर्थशास्त्राचे अधिवेशन

सोलापूर, दि. १- सोलापूर विद्यापीठातर्फे १३ व्या वार्षिक अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन रविवार, ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता राजेंद्र चौक येथील बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

'काळा पैसा- विमुद्रीकरण आणि चलन व्यवस्था' हा या अधिवेशनाचा विषय आहे. याचे उद्घाटन सीपीआय सचिव मंडळाचे महाराष्ट्र प्रदेश सदस्य अजित अभ्यंकर यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम हे राहणार आहेत. या अधिवेशनात शोधनिबंधाचेही सादरीकरण करण्यात येणार आहे.

दिव्य सिटी

सोलापूर, शनिवार, ३ फेब्रुवारी २०१८ | ५

## बुर्ला महाविद्यालयात उद्या अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन

**सोलापूर ।** ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या वतीने सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे १३ वे वार्षिक अधिवेशन रविवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता बुर्ला महाविद्यालयात आयोजित केले आहे. काळा पैसा- विमुद्रीकरण आणि चलनव्यवस्था या विषयावर अधिवेशनात मंथन होईल. कॉ. अजित अभ्यंकर उद्‌घाटक म्हणून तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे असतील. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. संतोष कदम यांच्यासह प्रा. उत्तमराव देशमुख, प्रा. डॉ. राजाराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. अधिवेशनासाठी प्रा. शिरीष भोसले, प्रा. शिवानंद भांजे, प्रा. डॉ.शंकर राजे (९०९६९९२८५९) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# नोटाबंदीच्या निर्णयानंतर काळा पैसा बाहेर आला नाही

## अजित अभ्यंकर यांची केंद्र सरकारवर टीका

शहर संचार

सोलापूर, दि. ५- नोटाबंदीचा निर्णय काळा पैसा बाहेर काढण्यासाठी घेण्यात आला. सामान्य जनतेला या निर्णयाचा त्रास झाला पण काळा पैसा बाहेर आला नाही. अंमलबजावणीची तयारी न करता नोटाबंदीचा घेतलेला निर्णय आणि नंतर काळा पैसा वसुलीबाबत दाखवलेली अनास्था यामुळे काळे पैसेवाले मोकाट सुटले, असे प्रतिपादन 'माकप'च्या राज्य सचिव मंडळाचे सदस्य अजित अभ्यंकर यांनी केले.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठ परिषदेचे १३ वे वार्षिक अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना ते बोलत होते. 'काळा पैसा : विमुद्रीकरण आणि चलन व्यवस्था' हा या अधिवेशनाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. यावेळी वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम उपस्थित होते.

अभ्यंकर पुढे म्हणाले, 'नोटाबंदीच्या निर्णयानंतर सोने खरेदीत मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवण्यात आला. या काळात सोन्याची आयात ४७ टक्क्याने, हिऱ्याची आयात ५३ टक्क्याने आणि चांदीची आयात ९० टक्क्याने वाढली. पण याची निर्यात ४ टक्क्याने कमी झाली. यामुळेच काळा पैसा मोठ्या प्रमाणात पांढरा झाला. या काळात बँकेत जमा झालेला पैसा काळा आहे की, पांढरा हे ठरविणे हे कायद्याचे काम आहे. १९८८ मध्ये बेनामी संपत्तीचा कायदा पास झाला पण त्याचे नियम २०१६ मध्ये बनवले. सरकारकडे बँक खात्यांची सर्व माहिती उपलब्ध आहे, तरीही संशयास्पद खात्यापैकी फक्त ४०० बँक खात्याची चौकशी करण्यात आली. प्रशासकीय पातळीवर काळ्या पैशाबाबत काही हालचाल नसल्याचे सांगितले जाते. यावरून



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या अधिवेशनात प्रा. अजित अभ्यंकर यांनी 'काळा पैसा विमुद्रीकरण आणि चलन व्यवस्था' या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने केले. यावेळी प्राचार्य राजेंद्र शेंडगे, प्रा. बी. एस. हरकूड व अन्य.

सरकार काळ्या पैशाबाबत किती गंभीर आहे हे दिसून येते. काळा पैसा दडपण्यासाठीच एलबीटी आणि पन्नास हजारावरील सोने खरेदीसाठी पॅनकार्ड सक्तीचे यास विरोध करण्यात आला होता. एफआयडीआर व बँकाची थकित कर्जे वसूल करण्यासाठी सामान्य जनतेच्या बँकेतील व्यवहारासाठी कसे पैसे घेतले जात आहेत. यावरही त्यांनी भाष्य केले.

यावेळी कै. चंद्रकांत भानुमते यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जीवन गौरव पुरस्कार प्रा. जी. एस. हारकूड यांना देण्यात आला. या अधिवेशनात तीस शोधनिबंध सादर झाले.

शेंडगे म्हणाले, आज देशासमोर काळा पैसा, गरिबी, बेकारी आणि दारिद्र्य यासारखे गंभीर प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी बुध्दिवादी मंडळींनी समाजात जाऊन काम केले पाहिजे आणि राज्यकर्त्यांनी मतभेद बाजूला ठेवून यासाठी धोरण आखले पाहिजे.'

पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम शिंदे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उत्तमराव हुंडेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले तर आभार प्रा. शिरीष भोसले यांनी मानले.

५ पुढारी | सोलापूर, शनिवार १० फेब्रुवारी २०१८

# महिलांचा समाजात सन्मान व्हावा : म्हात्रे

सोलापूर : प्रतिनिधी

महिला निसर्गाचा चमत्कार आहे, परंतु पुरुषी व्यवस्थेने तिला अनेक बंधनात जखडून ठेवले, पण तिने तक्रार केली नाही. समर्पित भावनेने वातीसारखी जळत राहिली. पुरुषासाठी झिजत राहिली. आज संधी मिळताच शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. अशा या महिलांचा कुटुंबात व समाजात सन्मान झाला पहिजे, असे प्रतिपादन मुंबई येथील प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केला होता. त्यावेळी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर श्रीनिवास क्यातम, श्रीधर चिट्याल, प्रसाद श्रीराम, प्राचार्य शेंडगे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्र हा जिजाबाई, अहिल्याबाई आणि सावित्रीबाई अशा थोर महिलांचा वारसा सांगणारा प्रदेश आहे. खेड्यात पुरुष शेतकरी आत्महत्या करत असताना महिला मात्र आत्महत्येचा विचार न करता आपल्यासमोरील बिकट परिस्थितीचा धैर्याने सामना करत आहेत. सूत्रसंचालन डॉ. दळवी यांनी, तर आभार डॉ. जॉन यांनी मानले.

सकाळ
सोलापूर, शनिवार
१० फेब्रुवारी २०१८
३
C

# कुटुंब, समाजात व्हावा महिलांचा सन्मान

## कवी अरुण म्हांत्रे; 'ए. आर. बुर्ला'मध्ये पारितोषिक वितरण

सोलापूर, ता. ९ : महिला निसर्गाचा चमत्कार आहे. समर्पित भावनेने ती वातीसारखी जळत राहिली. पुरुषासाठी झिजत राहिली. आज संधी मिळताच शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. अशा या महिलांचा कुटुंबात व समाजात सन्मान झाला पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई येथील कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

राजेंद्र चौक येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला होता. त्या वेळी श्री. म्हात्रे बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, विश्वस्त प्रसाद श्रीराम व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे उपस्थित होते. प्राचार्य शेंडगे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. डॉ. तुकाराम शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या वेळी प्राचार्य शेंडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिंदे, डॉ. संजय लांडगे, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. आर. के. वडजे यांच्यासह सचिन चौधरी, सुनील मोरे, सुप्रिया शिंदे, कविता मुरूमकर, गुलरेज मड्डी व विजय म्हमाणे तसेच 'मिस बुर्ला' शिवबाई हेगडे आदींचा सत्कार करण्यात आला. डॉ. दळवी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जॉन यांनी आभार मानले. या वेळी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

५ पुढारी | सोलापूर, शनिवार
१० फेब्रुवारी २०१८

# महिलांचा समाजात सन्मान व्हावा : म्हात्रे

सोलापूर : प्रतिनिधी

महिला निसर्गाचा चमत्कार आहे, परंतु पुरुषी व्यवस्थेने तिला अनेक बंधनात जखडून ठेवले, पण तिने तक्रार केली नाही. समर्पित भावनेने वातीसारखी जळत राहिली. पुरुषासाठी झिजत राहिली. आज संधी मिळताच शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. अशा या महिलांचा कुटुंबात व समाजात सन्मान झाला पहिजे, असे प्रतिपादन मुंबई येथील प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केला होता. त्यावेळी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी पांडुरंग दिड्डी होते. व्यासपीठावर श्रीनिवास क्यातम, श्रीधर चिट्याल, प्रसाद श्रीराम, प्राचार्य शेंडगे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्र हा जिजाबाई, अहिल्याबाई आणि सावित्रीबाई अशा थोर महिलांचा वारसा सांगणारा प्रदेश आहे. खेड्यात पुरुष शेतकरी आत्महत्या करत असताना महिला मात्र आत्महत्येचा विचार न करता आपल्यासमोरील बिकट परिस्थितीचा धैयनि सामना करत आहेत. सूत्रसंचालन डॉ. दळवी यांनी, तर आभार डॉ. जॉन यांनी मानले.

सकाळ
सोलापूर, शनिवार
१० फेब्रुवारी २०१८
३
C

# कुटुंब, समाजात व्हावा महिलांचा सन्मान

## कवी अरुण म्हात्रे; 'ए. आर. बुर्ला'मध्ये पारितोषिक वितरण

सोलापूर, ता. ९ : महिला निसर्गाचा चमत्कार आहे. समर्पित भावनेने ती वातीसारखी जळत राहिली. पुरुषासाठी झिजत राहिली. आज संधी मिळताच शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. अशा या महिलांचा कुटुंबात व समाजात सन्मान झाला पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई येथील कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

राजेंद्र चौक येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला होता. त्या वेळी श्री. म्हात्रे बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, विश्वस्त प्रसाद श्रीराम व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे उपस्थित होते. प्राचार्य शेंडगे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. डॉ. तुकाराम शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या वेळी प्राचार्य शेंडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिंदे, डॉ. संजय लांडगे, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शंकर राजे, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. आर. के. वडजे यांच्यासह सचिन चौधरी, सुनील मोरे, सुप्रिया शिंदे, कविता मुरूमकर, गुलरेज मड्डी व विजय म्हमाणे तसेच 'मिस बुर्ला' शिवबाई हेगडे आदींचा सत्कार करण्यात आला. डॉ. दळवी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जॉन यांनी आभार मानले. या वेळी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महिलांचा सन्मान व्हावा : म्हात्रे



पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी कवी अरुण म्हात्रे, पांडुरंग दिड्डी, ॲड. श्रीनिवास क्यातम, श्रीधर चिट्याल, प्रसाद श्रीराम व मान्यवर.

✔ सोलापूर/प्रतिनिधी

'महिला निसर्गाचा चमत्कार आहे. परंतु, पुरुषी व्यवस्थेने तिला अनेक बंधनात जखडून ठेवले. पण, तिने तक्रार केली नाही. समर्पित भावनेने वातीसारखी जळत राहिली. पुरुषासाठी झिजत राहिली आणि आज संधी मिळताच शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू लागली. अशा या महिलांचा कुटुंबात व समाजात सन्मान झाला पाहिजे', असे प्रतिपादन मुंबई येथील प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा २८वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केला होता. त्यावेळी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते. उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव श्रीधर चिट्याल, विश्वस्त प्रसाद श्रीराम आणि प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे उपस्थित होते.

म्हात्रे पुढे म्हणाले की, 'महाराष्ट्र हा जिजाबाई, अहिल्याबाई आणि सावित्रीबाई अशा थोर महिलांचा वारसा सांगणारा प्रदेश आहे. आजच्या महिला हा वारसा सक्षमपणे पुढे चालवत आहेत. शहरात एकाच वेळी घरातील आणि बाहेरील जबाबदारी पार पाडत आहेत.'

यावेळी शैक्षणिक पारितोषिकाचे वाचन डॉ. ॲनी जॉन आणि प्रा. श्रीनिवास गुंडेली, राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक पारितोषिकाचे वाचन डॉ. आर. के. वडजे आणि क्रीडा पारितोषिकाचे वाचन डॉ. रजनी दळवी यांनी केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचा डी. लिट. पदवी प्राप्त झाल्याबद्दल, इंग्रजी अभ्यास मंडळाच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल, सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ. तुकाराम शिंदे, महाकवी वामनदादा कर्डक काव्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डॉ. संजय लांडगे, एम. कॉम कम्युनिकेशन ही पदवी प्राप्त केल्याबद्दल प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शंकर राजै, डॉ. टी. एन. शिंदे यांचा अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल आणि डॉ. आर. के. वडजे यांचा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच सचिन चौधरी, सुनील मोरे, सुप्रिया शिंदे, कविता मुरुमकर, गुलरेज मड्डी आणि विजय म्हमाणे या संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांचा पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. शैक्षणिक सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्या विद्यार्थिनींना मिस बुर्ला' हा पुरस्कार दिला जातो. यंदा हा मान शिवबाई हेगडे या विद्यार्थिनीला मिळाला. यावेळी ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. ॲनी जॉन यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुर्ला महिला महाविद्यालयातील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

**शहर संचार**

सोलापूर, दि. २६- ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी विवेकानंद केंद्राच्या सोलापूर शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

या ग्रंथप्रदर्शनात स्वामी विवेकानंदांच्या जीवन व कार्यावर आधारित इंग्रजी व मराठी भाषेतील ग्रंथ, आध्यात्मिक विकास, ताण-तणावांचे व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, उपनिषदे आणि विविध धार्मिक ग्रंथांचा समावेश होता.

या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. सविता मल्लाडे, स्वामी विवेकानंद केंद्राचे सदस्य हृतिक कुर्ले, केदार कलशेट्टी, शेखर निंगदळी उपस्थित होते.

## संचार

४ सोलापूर, गुरुवार १ मार्च २०१८

### बुर्ला महिला महाविद्यालय

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. मराठी भाषा समृध्दीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरज असल्याचे प्राचार्य डॉ. नरेंद्र काटीकर यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. संजय लांडगे, प्रा. पल्लवी कोडक, प्रा.डॉ. मयूरा जाधव, रोहिणी घंटे, प्रा.डॉ. कविता मुरूमकर, प्रा.डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. सुरेखा बत्तुल आदी उपस्थित होते.

## सकाळ

सोलापूर, गुरुवार
१ मार्च २०१८
३
C

### बुर्ला महाविद्यालयात मराठी दिन

सोलापूर, ता. २८ : ए. आर. बुर्ला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. नरेंद्र काटीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. राजेंद्र शेंडगे अध्यक्षस्थानी होते. या वेळी डॉ. संजय लांडगे, डॉ. पल्लवी कोडक, डॉ. मयुरा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

मंगळवार दि. ६ मार्च २०१८ 12

# युवकांनी चांगल्या सवयी बाळगाव्यात : डॉ. शेंडगे

सोलापूर : सध्याच्या काळात समाज माध्यमं आणि समाजात घडणाऱ्यां विघातक घटना यामुळे युवकांना अभ्यासात एकाग्र होणे अतिशय कठीण आहे. त्यामुळे अशा वातावरणापासून लांब राहत चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. व बी.कॉम भाग तीनच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. त्यावेली ते बोलत होते. मंचावर डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शिरीष भोसले, डॉ. तुकाराम शिंदे उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

मंगळवार दि. ६ मार्च २०१८ 12

## युवकांनी चांगल्या सवयी बाळगाव्यात : डॉ. शेंडगे

सोलापूर : सध्याच्या काळात समाज माध्यमं आणि समाजात घडणाऱ्या विघातक घटना यामुळे युवकांना अभ्यासात एकाग्र होणे अतिशय कठीण आहे. त्यामुळे अशा वातावरणापासून लांब राहत चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. व बी.कॉम भाग तीनच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. मंचावर डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शिरीष भोसले, डॉ. तुकाराम शिंदे उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
दि. ७ मार्च २०१८

११

## बुर्ला महाविद्यालयात निरोप समारंभ

सोलापूर, दि. ६ मार्च -

सध्याच्या काळात समाज माध्यमं आणि समाजात घडणाऱ्या विघातक घटना यामुळे युवकांना अभ्यासात एकाग्र होणे अवघड होत आहे. तेव्हा युवकांनी अशा वातावरणापासून दूर रहावे. चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांनी केले. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. व बी.कॉम. भाग-३ वर्गाचा निरोप समारंभ आयोजित केला होता. व्यासपीठावर डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ.संजय लांडगे, डॉ.ॲनी जॉन, डॉ.टी.एन.शिंदे, डॉ.रजनी दळवी, डॉ.शिरीष भोसले उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत
बुधवार, दिनांक ७ मार्च २०१८

## चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात : प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे

सोलापूर : सध्याच्या काळात समाजमाध्यमे आणि समाजात घडणाऱ्या विघातक घटनामुळे युवकांना अभ्यासात एकाग्र होणे अवघड होत आहे. तेव्हा युवकांनी अशा वातावरणापासून दूर राहावे, चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात. यामुळे युवकांना आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करता येईल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी येथे केले. ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. व बी. कॉम. भाग तीन वर्गाचा निरोप समारंभ झाला. त्यात डॉ. शेंडगे मार्गदर्शन करीत होते. यावेळी डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. टी. एन. शिंदे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शिरीष भोसले, डॉ. तुकाराम शिंदे उपस्थित होते.

पुढारी बुधवार ७ मार्च २०१८

१ पुढारी सो
११



सोलापूर : विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शेंडगे.

# महिलांनी वैचारिक गुलामगिरीतून बाहेर पडावे : डॉ. राजेंद्र शेंडगे

**सोलापूर : प्रतिनिधी**

आजच्या काळात महिला मुक्तच आहेत. त्यांना समाजात समतेने वागवले पाहिजे. हे खरे असले तरी महिला स्वतःला कौटुंबिक जबाबदारीत जास्त गुंतवून घेतात. स्त्रीत्वामध्येच अडकून पडतात. पारंपरिक मानसिकतेत गुंतून राहतात. कुटुंब, समाज काय म्हणेल याचा विचार करतात. महिलांची ही स्वतःची वैचारिक गुलामगिरीच इतरांना त्यांच्यावर अन्याय करण्याला कारणीभूत ठरते. म्हणूनच महिलांनी या स्वतःच्या वैचारिक गुलामगिरीतून बाहेर पडले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिलादिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. रजनी दळवी व डॉ. तुकाराम शिंदे उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. शेंडगे म्हणाले की, स्त्री आईच्या रुपात भावणारी असते. ती एका ठराविक मर्यादेपलीकडे जाऊन इतरांचा द्वेष करत नाही. समाजातील इतर घटक याचा गैरफायदा घेताना दिसतात. आज बदलत्या काळात महिलांनी आपली पारपंरिक मानसिकता बदलली पाहिजे. तिने स्वतःला सिद्ध केले आहे. महिलांनी आज समतेचा आग्रह धरला पाहिजे आणि स्वतःला दुय्यम मानणे बंद केले पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक कार्य करण्यात पुढाकार घेतला पाहिजे.

प्रास्ताविक डॉ. टी.एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचलन प्रगती पोगूल हिने केले, तर आभार संजना सरवदे हिने मानले. कार्यक्रमास डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. शंकर राजे, प्रा. अश्विनी राऊत, प्रा. गौरी भोसले, प्रा. जाधव उपस्थित होते.

५ पुढारी सोलापूर, बुधवार ७ मार्च २०१८



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे.

# युवकांनी चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात : डॉ. राजेंद्र शेंडगे

**सोलापूर (प्रतिनिधी) :** सध्याच्या काळात समाजमाध्यमे आणि समाजात घडणाऱ्या विघातक घटना यामुळे युवकांना अभ्यासात एकाग्र होणे अवघड होत आहे. तेव्हा युवकांनी अशा वातावरणापासून दूर राहावे. चांगल्या सवयी अंगी बाळगाव्यात. यामुळे युवकांना आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करता येईल आणि समाज व कुटुंबातील स्वास्थ्य टिकून राहील, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. व बी.कॉम भाग ३ वर्षांचा निरोप समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. संजय लांडगे, डॉ. ॲनी जॉन, डॉ. टी.एन. शिंदे, डॉ. रजनी दळवी, डॉ. शिरीष भोसले आणि डॉ. तुकाराम शिंदे उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, जीवनात काही मिळवायचे असेल तर त्यासाठी कष्ट लागतात. चांगल्या कामासाठी झोकून देऊन काम करावे लागते. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा लागतो. समाधानाने जगण्याची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असू शकते. अनावश्यक गोष्टींचा हव्यास न धरता समाधानाने जगले पाहिजे तरच उत्तम जीवन जगलो असे म्हणता येईल. प्रास्ताविक मंजुषा गंपले हिने, तर सूत्रसंचालन संजना सरवदे हिने केले. आभार श्रृती निंबाळकर हिने मानले.

संचार सोमवार १२ मार्च २०१८ ७

# स्पर्धा परीक्षेतील यशासाठी चौफेर अभ्यासाची गरज

सोलापूर, दि. ११- आज विद्यार्थी स्पर्धा परीक्षेकडे मोठ्या संख्येने वळत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी चौफेर अभ्यास करण्याची गरज आहे. इतरांपेक्षा वेगळे वाचण्याची सवय विद्यार्थ्यांनी स्वतःला लावावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. टी. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शेंडगे पुढे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेची तयारी करताना स्वतःला चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. वृत्तपत्राचे वाचन करताना अग्रलेख क्रीडा व राजकीय बातम्यांचे वाचनही केले पाहिजे.

यावेळी डॉ. शिंदे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांगे यांनी केले. इतिहास विभागाकडून घेण्यात आलेल्या मोडी व ब्राम्ही लिपी वर्गातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरीषा कंदीकटला यांनी केले तर आभार प्रा. श्रीनिवास इंदापुरे यांनी मानले.

संचार मंगळवार १३ मार्च २०१८ ३

## बुर्ला महिला महाविद्यालय

राजेंद्र चौकातील ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. महिलांनी स्वतःच्या वैचारिक गुलामगिरीतून बाहेर पडावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी दिले. यावेळी अश्विनी कांबळे, संजना सरवदे, प्रगती पोगूल, लक्ष्मी पाटील, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसोडे, डॉ. शंकर राजे, प्रा. अश्विनी राऊत, प्रा. गौरी भोसले यावेळी उपस्थित होते.

सकाळ
सोलापूर, सोमवार
२६ मार्च २०१८
C

# प्रा. शिरीष भोसले यांना पीएचडी

सोलापूर, ता. २५ : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. शिरीष भोसले यांना गुलबर्गा विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. 'ए स्टडी ऑन प्रॉब्लेम अँड प्रॉस्पेट ऑफ टेक्स्टाईल इंडस्ट्रीज इन महाराष्ट्र वुईथ रेफरन्स टू सोलापूर सिटी' हा त्यांचा पीएचडी संशोधनाचा विषय होता. त्यांना आळंद येथील ए. व्ही. पाटील डिग्री कॉलेजचे डॉ. बी. पी. बुळ्ळा यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. ३ मे २०१८ 9

## अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालय

राजेंद्र चौक येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राध्यापक डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. भांजे एस.बी, प्रा.डॉ.भोसले एस.एन., प्रा.डॉ.रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. बनसुडे आर.व्ही., प्रा.डी.अशोक एक्कलदेवी, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. मल्लाडे एस., प्रा.डॉ.वडजे आर.के., प्रा.डॉ.शिंदे टी.व्ही., प्रा श्रीनिवास गुंडेली यांच्यासह संजीवनी सादूल, शिवाजी चिंता, अनिल सग्गम, सत्यनारायण गजेली, प्रभाकर धोत्रे, महेश यागरे, संतोष मालतूमकर, उमा कुडक्याल आदी उपस्थित होते.

## नागेश करजगी ऑर्किड स्कूल

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये महाराष्ट्र राज्याचा ५८ वा वर्धापन दिन व जागतिक



सकाळ

सोलापूर, गुरुवार ३ मे २०१८

३

C

## ए. आर. बुर्ला महाविद्यालय

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. अॅनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. एस. बी. भांजे, प्रा. डॉ. एस. एन. भोसले, प्रा. डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. आर. व्ही. बनसुडे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. शंकर, राजे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. एस. एस. मल्लाडे, प्रा. डॉ. आर. के. वडजे, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे आदी उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
गुरूवार, दि. ३ मे २०१८ ११



बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद

## बुर्ला महिला महाविद्यालय

अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र ना. शेंडगे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. भांजे एस. बी. प्रा. डॉ. भोसले एस. एन. प्रा. डॉ. रजनी दळवी, डॉ. संजय लांडगे, प्रा. बनसुडे आर. व्ही. प्रा. डॉ. अशोक एकलदेवी, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. मल्लाडे, प्रा. डॉ. वडजे आर. के. प्रा. डॉ. शिंदे टी. व्ही. प्रा. श्रीनिवास गुंडेली, संजीवनी सादूल , शिवाजी चिंता , अनिल सग्गम, सत्यनारायण गजे, प्रभाकर धोत्रे, महेश घागरे, संतोष मालतूमकर, उमा कुडक्याल आदी कान्यवर उपस्थत होते.

# शिक्षण क्षेत्रातील बदल बेरोजगारी संपुष्टात आणतील

## प्राचार्य डॉ. शेंडगे यांचे मत

**शहर संचार**

▶ सोलापूर, दि. २२- उच्च शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या काळात मोठे बदल येऊ घातले आहे. हे बदल बेरोजगारीमुळे मेटाकुटीस आलेल्या तरुणांना दिलासा देतील. या बदलामुळे रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध होतील, बाजार पेठेतील मागणीनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण मिळेल. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील आगामी बदल बेरोजगारी संपुष्टात आणतील, असे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात करिअर गाइडन्स ब्युरो आणि कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यातर्फे आयोजित रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शेंडगे बोलत होते. याप्रसंगी डॉ. शिवानंद भांजे, डॉ. एक्कलदेवी, डॉ. शिरीष भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. शेंडगे पुढे म्हणाले, देशातील उद्योजक हे रोजगार उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे साधन आहेत. मात्र त्यांच्या उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक असणारे ज्ञान व कौशल्य आजच्या तरुणांकडे मिळत नाही. हीच सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील मोठी उणीव आहे. परंतु येत्या काळात ही उणीव दूर होईल.या कार्यक्रमास कामिनी गांधी, आव्हाड यांच्यासह महाराष्ट्रातील २१ उद्योग कंपन्यांचे प्रतिनिधी मुलाखत घेण्यासाठी आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दळवी यांनी केले तर देवळे यांनी आभार मानले.




▶ सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे. यावेळी डॉ.शिवानंद भांजे, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. शिरीष भोसले व अन्य.

१ पुढारी | सोलापूर, सोमवार २५ जून २०१८

# शिक्षण क्षेत्रात होणारे बदल बेरोजगारी संपुष्टात आणतील : प्राचार्य शेंडगे

**सोलापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या काळात मोठे बदल येऊ घातले आहेत. हे बदल बेरोजगारीमुळे मेटाकुटीस आलेल्या तरुणांना दिलासा देतील. या बदलामुळे रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध होतील. बाजारपेठेतील मागणीनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण मिळेल. शिक्षण क्षेत्रातील या बदलामुळे बेरोजगारी संपुष्टात येईल, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.



सोलापूर : रोजगार मेळाव्याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे. व्यासपीठार माळी, प्रा. डॉ. शिवानंद भांजे आदी.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात करिअर गाईडन्स ब्युरो आणि कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा आयोजित केला होता. त्याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

व्यासपीठावर डॉ. शिवानंद भांजे, डॉ. अशोक एक्कलदेवी व डॉ. शिरीष भोसले आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शेंडगे पुढे म्हणाले की, देशातील उद्योजक हे रोजगार उपलब्ध करून देणारे महत्त्वाचे साधन आहेत. पण त्यांच्या उद्योगांच्या विकासासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य असलेले तरुण मिळत नाहीत.

सकाळ

सोलापूर, मंगळवार
२६ जून २०१८

# राष्ट्रभाषा परीक्षेचा शंभर टक्के निकाल

सोलापूर, ता. २५ : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा राष्ट्रभाषा पंडित परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष अॅड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. प्राजक्ता जोशी यांनी अभिनंदन केले.

संचार सोलापूर, बुधवार १८ जुलै २०१८ ७

# जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करावे : शेंडगे

शहर संचार

सोलापूर, दि. १७- जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम केले पाहिजेत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील बीसीए विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

डॉ. शेंडगे पुढे म्हणाले, आधुनिक युगात अनुकरण करण्याचे प्रमाण वाढत आहे. अनुकरण करणे हे आपण जिथे वावरतो तेथील वातावरणाला शोभणारे आणि हित जपणारे असावे लागते. जीवनात यश मिळाल्यानंतरही न थांबता पुढे संशोधनावर भर दिला पाहिजे. समाज कोणत्या समस्यांमुळे त्रस्त आहे. यावर संशोधन करून उपाय शोधले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक एक्कलदेवी यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी मादास हिने केले तर आभार रचना कोंडी हिने मानले.

५ सकाळ सोलापूर, बुधवार, १८ जुलै २०१८

# जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येयाप्रती निष्ठा हवी

## प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांचे मत

सोलापूर, ता. १७ : 'जीवन हे मौजमजा, करमणूक करण्यासाठी नसते. जीवन आनंदात जाण्यासाठी विद्यार्थीदशेतच ध्येय निश्चित करावे. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यावरच यश मिळते. जीवनाची वाटचाल करताना ध्येयाप्रती निष्ठा ठेवावी तरच जीवनात यश मिळते,' असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बी. सी. ए. विभागामार्फत स्वागत समारंभ आयोजित केला होता. त्याप्रसंगी विद्यार्थिनींना त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी व्यासपीठावर प्राध्यापक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शेंडगे म्हणाले की, 'आधुनिक युगात अनुकरण करण्याचे प्रमाण वाढत आहे. अनुकरण करताना आपले हित जपणारे असावे. जीवनात यश मिळाल्यानंतर न थांबता पुढे संशोधनावर भर द्यावा. समाज कोणत्या समस्येमुळे त्रस्त आहे त्यावर संशोधनातून उपाय शोधले पाहिजे.'

प्रास्ताविक डॉ. अशोक एक्कलदेवी यांनी केले. पल्लवी मादास हिने सूत्रसंचालन केले. रचना कोंडी हिने आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व बी. सी. ए. विभागातील विद्यार्थिनी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. १८ जुलै २०१८ 5

# यशस्वी होण्यासाठी ध्येयाप्रती निष्ठा हवी : प्रा.डॉ.शेंडगे

सोलापूर/प्रतिनिधी

जीवन हे केवळ मौजमजा, करमणूक करणे यासाठी नसते. जीवन आनंदात जाण्यासाठी विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे, यशासाठी जवळचा रस्ता कधीच नसतो. प्रदीर्घ वाटचाल व प्रयत्नाची पराकाष्ठा केल्यावरच यश मिळते. जीवनाची वाटचाल या मार्गाने करताना ध्येयाप्रती निष्ठा ठेवावी लागते तरच जीवनात यश मिळते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ओ.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात बी.सी.ए विभागामार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी प्रास्ताविक डॉ.अशोक एक्कलदेवी यांनी कले. सूत्रसंचालन पल्लवी मादास, आभार रचना कोंडी हिने मानले.

३ पुढारी | गुरुवार १९ जुलै २०१८

# यशस्वी होण्यासाठी निष्ठा हवी : शेंडगे

सोलापूर : प्रतिनिधी

जीवन हे केवळ मौजमजा, करमणूक करणे यासाठी नसते. जीवन आनंदात जाण्यासाठी विद्यार्थी दशेतच ध्येय निश्चित केले पाहिजे. यशासाठी जवळचा रस्ता कधीच नसतो. प्रदीर्घ वाटचाल व प्रयत्नाची पराकाष्टा केल्यावरच यश मिळते. जीवनाची वाटचाल या मार्गाने करताना ध्येयाप्रती निष्ठा ठेवावी लागते तरच जीवनात यश मिळते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शेंडगे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात बीसीए विभागामार्फत स्वागत समारंभ आयोजित केला होता. त्याप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. शेंडगे पुढे म्हणाले की, आधुनिक युगात अनुकरण करण्याचे प्रमाण वाढत आहे. अनुकरण करणे ही एक जबाबदारीच असते. ते करताना ते आपणास व आपण जेथे वावरतो तेथील वातावरणाला शोभणारे आणि आपले हित जपणारे असावे लागते. समाज कोणत्या समस्येमुळे त्रस्त आहे, त्यावर संशोधनातून उपाय शोधले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. अशोक एक्कलदेवी, तर सूत्रसंचालन पल्लवी मादास हिने केले. आभार रचना कोंडी हिने मानले.

संचार



# नव मूल्यांकन पध्दतीत समाधानावर राहील भर

## प्रा. वाघमारे यांची माहिती

शहर संचार

▶ सोलापूर, दि. ५- पुढील काळात नॅककडून महाविद्यालयांचे मूल्यांकन नवीन पध्दतीनुसार होणार असून नवीन पध्दत विद्यार्थी शिक्षणाबाबत समाधानी आहे का या भोवती केंद्रित आहे हे विचारात घेऊनच नवीन उपक्रम राबवावे लागणार आहेत, असे मत प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले.

येथील अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्टाफ अॅकॅडमीच्यावतीने 'नॅकची नवीन मूल्यांकन प्रक्रिया व तक्रारी' या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. वाघमारे पुढे म्हणाले की, राष्ट्राची जडणघडण स्थानिक ते जागतिकस्तरावर नावीन्यपूर्ण कल्पनांची देवाण-घेवाण मूल्यांची जपणूक, विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य आणि उत्तमाकडून सर्वोत्तमाकडे जाणे ही उच्च शिक्षणाची मूलभूत तत्त्वे आहेत.

ही तत्त्वे प्रत्यक्ष साध्य करण्यासाठी महाविद्यालये काय प्रयत्न करत आहेत. हेच तपासण्याचे काम नॅक नवीन मूल्यांकन पध्दतीनुसार करणार आहे. या नवीन पध्दतीनुसार देखाव्यापेक्षा प्रत्यक्ष काय प्रयत्न होत आहेत. हे पाहिले जाणार आहे. तसेच चुकीची माहिती कळविल्यास महाविद्यालयाच्या १२ ब व २ फ या दर्जावर परिणाम होणार आहे.

प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी केले. डॉ. आर. के. वडजे यांनी आभार मानले.

# नॅकबाबत विचारांची देवाणघेवाण व्हावी : शेंडगे

सोलापूर : प्रतिनिधी

स्टाफ अॅकॅडमीतून बौद्धिक मेजवानी मिळते. या व्यासपीठावर नाविन्यपूर्ण विषयाची मांडणी केली जाते. यामुळे ज्ञानात भर पडते. सध्या नॅकची मूल्यांकन पद्धत आमुलाग्र बदलत आहे. अशा नॅकच्या नवीन मूल्यांकन पद्धतीबाबत स्टाफ अॅकॅडमीतून चर्चा झाली पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्टाफ अॅकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राचार्य शेंडगे पुढे म्हणाले की, कोणतीही व्यवस्था कायम नसते. त्यामध्ये काळानुरुप बदल होत असतात. हा बदल त्या-त्या व्यवस्थेतील लोकांनी तात्काळ आत्मसात केला पाहिजे. नॅककडून महाविद्यालयाचे होणाऱ्या मूल्यांकन पद्धतीतही असेच बदल होत आहेत. असे बदल महाविद्यालयीन स्तरावर तात्काळ स्वीकारले पाहिजेत.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन स्टाफ अॅकॅडमी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. संजय लांडगे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. आर.के. वडजे यांनी मानले.

बुर्ला महाविद्यालय

# 'रोल नं. १८' चित्रपटाचा प्रोमो उत्साहात

शहर संचार

सोलापूर, दि. ५- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महाविद्यालयात 'रोल नं. १८' या मराठी चित्रपटाचा प्रोमो सादर करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी या चित्रपटातील काही प्रसंगाचे सादरीकरण करण्यात आले. हा सिनेमा सोलापूरमधील टीमने बनवला आहे.

या सिनेमाचे चित्रीकरण सोलापूर व कोकण परिसरात झाले आहे. सहकुटुंब पाहावा असा हा सिनेमा आहे. सोलापूरची बोली भाषा व वेगवेगळ्या वयातील प्रेम हा या चित्रपटाचा विषय आहे.



सोलापूर : रोल नं. १८ या मराठी चित्रपटाच्या प्रोमो प्रसंगी रोहिणी माने हिने मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, सुभाष यादव, काशीनाथ गंजी, प्रा.डॉ. रजनी दळवी व अन्य.

सर्वच कलाकारांनी खूप मेहनत घेतली आहे.

सुभाष यादव व रोहिणी माने हे या सिनेमातील मुख्य कलाकार आहेत. या दोघांच्या सहजसुंदर अभिनयाने हा सिनेमा उंचीवर पोहोचला आहे, अशी माहिती या सिनेमाचे लेखक दिग्दर्शक काशीनाथ गंजी यांनी दिली. याप्रसंगी प्रमुख कलाकार सुभाष यादव, रोहिणी माने, या चित्रपटाचे मार्गदर्शक विठ्ठल बडगंची, निर्माता दिनेश म्याना, रिलिजिंग पार्टनर शंकर फलमारी, कास्टिंग डायरेक्टर सुमीत फुलमामडी, सहकलाकार राजू झुंजा, यश सिंदगी, तेजस मल्लाडे व गायिका सुप्रिया सोरटे आदी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. रजनी दळवी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

३ पुढारी | मंगळवार ७ ऑगस्ट २०१८

# नॅकच्या नवीन मूल्यांकनाची तयारी करावी : वाघमारे

**सोलापूर : प्रतिनिधी**

पुढील काळात नॅककडून महाविद्यालयाचे मूल्यांकन नवीन पध्दतीनुसार होणार आहे. नवीन पध्दत महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षणाबाबत समाधानी आहे का, याभोवती केंद्रीत आहे. हे विचारात घेऊनच विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षणाबाबत समाधानी आहे का, याभोवती केंद्रीत आहे. हे विचारात घेऊनच विद्यार्थ्यांच्या अपेक्षा व मागणी विचारात घेऊन नवीन उपक्रम राबवावे लागणार आहेत. ही नवी पध्दती विचारात घेऊनच नॅक मूल्यांकनाची तयारी करावी लागणार आहे, असे मत प्रा.डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्टाफ ॲकॅडमीच्यावतीने प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे यांची नॅकची नवीन मूल्यांकन प्रक्रिया व तयारी याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना प्रा. डॉ. वाघमारे म्हणाले की, राष्ट्राची जडणघडण, जागतिक ते स्थानिक स्तरावर नाविन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण, मूल्यांची जपवणूक, विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञान हाताळण्याचे कौशल्य आणि उत्तमाकडून सर्वो त्तमाकडे जाणे ही उच्च शिक्षणाची मूलभूत तत्त्वे आहेत. ही तत्त्वे प्रत्यक्ष साध्य करण्यासाठी महाविद्यालये काय प्रयत्न करत आहेत. हेच तपासण्याचे काम नॅक नवीन मूल्यांकन पध्दतीनुसार करणार आहे. या नवीन पध्दतीनुसार देखाव्यापेक्षा प्रत्यक्ष काय प्रयत्न होत आहेत. हे पाहिले जाणार आहे. तसेच चुकीची माहिती कळविल्यास महाविद्यालयाच्या १२ ब आणि २ फ या दर्जावर परिणाम होणार आहे.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन स्टाफ ॲकॅडमी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. आर.के. वडजे यांनी मानले.

A.R.B.M. Solapur (stamp)

संचार
४ सोलापूर, शुक्रवार १० ऑगस्ट २०१८



सोलापूर : विद्यापीठाच्या वर्धापनदिनी बुर्ला महिला महाविद्यालयात प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापनदिन साजरा

शहर संचार

सोलापूर, दि. ९- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाचा १४ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विद्यापीठाचे गीत वाजविण्यात आले. या प्रसंगी डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. संजय लांडगे, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. पी. आर. वाघमारे, प्रा. श्रीनिवास गुंडेली, प्रा. डॉ. आर. के. वडजे, प्रा. नादरगी आदी उपस्थित होते.

सकाळ
सोलापूर, शुक्रवार
१० ऑगस्ट २०१८
२
C

# बुर्ला महाविद्यालयात विद्यापीठाचा वर्धापनदिन

सोलापूर, ता. ९ : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाचा १४वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. संजय लांडगे, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेश बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. पी. आर. वाघमारे, प्रा. श्रीनिवास गुंडेली, प्रा. डॉ. आर. के. वडजे आदी उपस्थित होते.

दिव्य सिटी

सोलापूर, शनिवार, ११ ऑगस्ट २०१८ | ५

## बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापनदिन साजरा

सोलापूर । पद्मशाली शिक्षण संस्थेच्या ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाचा चौदावा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात झाला. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ गीत वाजवण्यात आले. यावेळी डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. संजय लांडगे, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. पी. आर. वाघमारे, प्रा. श्रीनिवास गुंडेली, प्रा. डॉ. आर. के. वडजे आदी उपस्थित होते.

५ पुढारी | सोलापूर, सोमवार १३ ऑगस्ट २०१८

## ग्राहकांनी खरेदीबाबत जागरुक असावे : डॉ. राजेंद्र शेंडगे

**सोलापूर (प्रतिनिधी) :** ग्राहक म्हणून भारतीय समाज किती जागरुक आहे हा चिंतनाचा विषय आहे. बाजारपेठेतील वस्तू व सेवांची गुणवत्ता तसेच शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या वस्तूंचे गुणधर्म पाहणे आवश्यक असते. अशावेळी ग्राहकांनी जागरुक असावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडग यांनी केले. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळ आणि भारतीय ग्राहक सल्लागार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वस्तूतील घटक व त्या घटकातील कोणते पदार्थ आरोग्यास अपायकारक आहेत याची माहिती नसते. बाजारपेठेत उपभोगासाठी वस्तूंची खरेदी करताना जागरुकता असावी लागते. त्यासाठी व्यावहारिक ज्ञान जाणीवपूर्वक मिळविणे गरजेचे आहे. अज्ञानामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच खरेदी विषयाची जागरुकता येण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी या कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमात मिलन मिस्त्री व प्राची मयेकर यांनी ग्राहकांविषयी जागरुकता या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
६
शुक्रवार, दिनांक १७ ऑगस्ट २०१८

## अ. आर. बुर्ला महिला महाविद्यालय

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात ७२ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे विश्वस्त लक्ष्मीनारायण कमटम, व्यंकटेश आकेन, लक्ष्मीकांत गड्डम उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी स्वातंत्र्यदिनाविषयी महत्त्व व मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत
शनिवार, दि. १८ ऑगस्ट २०१८ २

# कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी कविता मुरुमकर

लोकमत न्यूज नेटवर्क



**सोलापूर** : जगप्रसिद्ध अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेल्या फर्जापूर येथे राष्ट्रीय कविता महोत्सवाचे आयोजन केले असून, या महोत्सवाच्या अध्यक्षपदी येथील प्रा. डॉ. कविता मुरुमकर यांची निवड झाली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील फर्जापूर येथे हा दोन दिवसीय महोत्सव उद्यापासून सुरु होत आहे. रंगनाथराव काळे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. प्रा. डॉ. मुरुमकर या बुर्ला महाविद्यालयात मराठी विभागात अध्यापन करीत आहेत. 'मी सावित्री ज्योतीराव', 'भैरवी' या कादंबरी आणि 'मी राधा', 'तुझीच कविता' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या साहित्य लेखनास वेगवेगळ्या संस्थांचे ११ पुरस्कार मिळाले आहेत. 'बाई समजून घेताना' आणि 'मराठी कवितेतील मिथक' ही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. याशिवाय त्यांनी वर्तमानपत्रांमध्ये विपूल लेखन केले आहे. त्यांच्या लेखन कार्यामुळे त्यांची या महोत्सवाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

सोलापूर
तरुण भारत
दि. १८ ऑगस्ट २०१८ ११

## बुर्ला महिला महाविद्यालय

बुर्ला महिला महाविद्यालयात ७२ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. श्रीनिवास क्यातम , प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, लक्ष्मीनारायण कमटम, व्यंकटेश आकेन, लक्ष्मीकांत गड्डम यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले. डॉ. शंकर राजे यांनी आभार मानले.

संचार

२ सोलापूर, रविवार १९ ऑगस्ट २०१८

# राष्ट्रीय कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. मुरूमकर

▶ सोलापूर, दि. १८- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. कविता मुरूमकर यांची राष्ट्रीय कविता महोसवाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.



उर्मी वाङ्मयीन नियतकालिकाच्यावतीने जगप्रसिध्द अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेले फर्जापूर जिल्हा औरंगबाद येथे आयोजित महोत्सवात शनिवारी प्रारंभ झाला असून उद्या (रविवारी) समारोप होणार आहे. प्रा. डॉ. मुरूमकर यांचे 'मी सावित्री ज्योतिराव', 'भैरवी' या कादंबरी आणि 'मी राधा', 'तुझीच कविता' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या साहित्यलेखनास वेगवेगळ्या संस्थांचे ११ पुरस्कार मिळाले आहेत. 'बाई समजून घेताना' आणि 'मराठी कवितेतील मिथक' ही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. प्रा. डॉ. मुरूमकर यांनी कवयित्री व लेखिका म्हणून जे दमदार लिखाण केले आहे. त्यामुळेच त्यांची राष्ट्रीय कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.

प्रा. डॉ. मुरूमकर यांच्या या निवडीबाबत संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींनी अभिनंदन केले.

# उद्योगातील यशासाठी ग्राहक व चारित्र्य जपा

शहर संचार

सोलापूर, दि. १८ - उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करून योग्य तिथे गुंतवणुकीसह काळाबरोबर चालले पाहिजे. संघटन, पारदर्शकता व सर्वांबरोबर सौजन्यपूर्ण वागणूक ठेवली पाहिजे आणि ग्राहक व चारित्र्य जपले पाहिजे, असे प्रतिपादन चव्हाण उद्योग समूहाचे प्रमुख शिवप्रकाश चव्हाण यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी 'चव्हाण उद्योग समूहाची वाटचाल' या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना चव्हाण उद्योग समूहाचे प्रमुख शिवप्रकाश चव्हाण. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

चव्हाण पुढे म्हणाले, सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था टेक्स्टाइल, साखर कारखाने आणि विडी उद्योग यावर अवलंबून आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या धोरणामुळे सोलापूरमध्ये इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला प्रोत्साहन मिळाले. तेव्हाच व्हिडिओकॉनची डिलरशीप घेऊन उद्योग व्यवसायात पाऊल ठेवले. ग्राहकांना पटवून देण्याची हातोटी, आपल्या वस्तू विकण्याची चिकाटी, खाते भक्कम ठेवण्याची लखोटी आणि चारित्र्य व ग्राहकांना सांभाळण्याची सचोटी यामुळे व्हिडिओकॉन, कायनॅटिक, हिरो होंडा, मारूती सुझुकी, टाटा कमर्शियल आणि रॉयल इन्फील्ड आदी कंपनीची डिलरशीप मिळाली. आज दुचाकी वाहनांपासून वीस चाकीपर्यंतच्या सर्व वाहनाची विक्री चव्हाण उद्योग समूहातून होत आहे. हा उद्योग व्यवसाय सांभाळताना ग्राहकांनी उद्योगसमूहात प्रवेश केल्यानंतर तो आनंदात नाचत बाहेर जाईल, अशी सेवा देण्याची आम्ही भूमिका स्वीकारली म्हणूनच दिवसेंदिवस उद्योगाची भरभराट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. शेंडगे यांनी उद्योग व्यवसायात नियोजन आणि धाडस यामुळे यश मिळते. पण मिळालेले यश टिकविण्यासाठी सचोटी व प्रामाणिकपणा महत्त्वाचा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्रीनिवास गुंडेली यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. पुष्पलता राचर्ला यांनी केले. आभार डॉ. शिरीष भोसले यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. रंजना बनसुडे, डॉ. रंजना दळवी आणि प्रा. डॉ. शंकर राजे यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
दि. १९ ऑगस्ट २०१८ ११

# बुर्ला महाविद्यालयात फिल्म क्लबचा शुभारंभ




**सोलापूर, दि. १८ ऑगस्ट-**

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात भाषा संवादिनी मंडळाकडून फिल्म क्लब सुरू करण्यात आला आहे. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. सुरेखा बतुल, प्रा. डॉ. शिरीष भोसले, डॉ. आर. के. वडजे आदी उपस्थित होते.

मराठी चित्रपटसृष्टी, बॉलीवूड आणि यूरोपियन देशात अनेक चित्रपट आणि मालिका तयार होतात. यामध्ये अनेक कलाकृती असतात. दिग्दर्शकाचे दिग्दर्शन, विषय मांडणी, संगीत, कलाकाराच्या अभिनयातील संवेदनशीलता व वास्तवता, व्यक्तीरेखा, विविध छटा हे विषय अभ्यासाचे असतात. याचे ज्ञान घेतल्यास दिग्दर्शक जन्माला येतो, असे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय लांडगे तर डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी आभार मानले.

# ग्राहकांनी खरेदीबाबत जागरूकता बाळगावी

शहर संचार

सोलापूर, दि. १९- ग्राहक म्हणून भारतीय समाज किती जागरूक आहे, हा चिंतनाचा विषय आहे. बाजार पेठेतील वस्तू व सेवांचा गुणवत्ता तसेच शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या वस्तूंचे गुणधर्म पाहणे आवश्यक असते. अशावेळी ग्राहकांनी जागरूकता बाळगावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

येथील अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळ आणि भारतीय ग्राहक सल्लागार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी मीलन मिस्त्री, प्राची मयेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शेंडगे म्हणाले की, वस्तुतील घटक व त्या घटकातील कोणते पदार्थ आरोग्यास अपायकारक आहेत. याची ग्राहकांना माहिती नसते. बाजार पेठेत उपभोसाठी वस्तूंची खरेदी करताना जागरूकता असावी लागते. त्यासाठी व्यावहारिक ज्ञान जाणीवपूर्वक मिळविणे गरजेचे आहे. अज्ञानामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच खरेदी विषयाची जागरूकता येण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी मिस्त्री आणि मयेकर यांनीही ग्राहकांविषयीची जागरूकता या विषयावर मार्गदर्शन केले.



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत प्रा. डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी मार्गदर्शन केले.

५ पुढारी | सोलापूर, मंगळवार २१ ऑगस्ट २०१८

# राष्ट्रीय कविता महोत्सव अध्यक्षपदी प्रा. डॉ. कविता मुरुमकर



**सोलापूर (प्रतिनिधी) :** बुर्ला महिला महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. कविता मुरुमकर यांची राष्ट्रीय कविता महोत्सव अध्यक्षपदी निवड झाली आहे. उर्मी वाङ्मयीन नियतकालिकाच्यावतीने अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेले फर्जापूर, जिल्हा औरंगाबाद येथे हा राष्ट्रीय कविता महोत्सव होत आहे. रंगनाथराव काळे या महोत्सवाचे उद्‌घाटक आहेत. प्रा.डॉ. मुरुमकर यांचे 'मी सावित्री ज्योतिराव', 'भैरवी' या कादंबरी आणि 'मी राधा', 'तुझीच कविता' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या साहित्य लेखनास वेगवेगळ्या संस्थांचे ११ पुरस्कार मिळाले आहेत. 'बाई समजून घेताना' आणि 'मराठी कवितेतील मिथक' ही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांच्या साहित्य लेखनाची दखल घेऊनच ही निवड करण्यात आली आहे. प्रा. डॉ. मुरुमकर यांच्या निवडीने त्यांचे बुर्ला महिला महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन होत आहे.

सोलापूर
तरुण भारत

१० मंगळवार, दि. २८ ऑगस्ट २०१८

# पारंपरिक जीवनातून बाहेर पडा : खटके

## बुर्ला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**
स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत येणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ ३ टक्के आहे. उर्वरित ९७ टक्के महिला पारंपारिक जीवन स्विकारतात. लग्न, नवरा, मुलं आणि संसार यामध्ये अडकवतात. माझ्यामुळेच तुमचा संसार झाला. मी म्हणूनच टिकले अस सतत म्हणत बसतात. अशा पारंपरिक जीवनातून महिलांनी बाहेर पडले पाहिजे आणि स्पर्धा परिक्षेतून प्रशासकीय सेवेत आले पाहिजे आणि स्वतः बरोबर समाजाचेही हित साधले पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर ट्रेझरी विभागातील वित्त व लेखाधिकारी सुर्यकांत खटके यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत स्पर्धा परिक्षेची पूर्वतयारी या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ते विद्यार्थीनींना मार्गदर्शन करत होते. व्यासपीठावर डॉ.शिवानंद भांजे व कुचन प्रशालेचे उपमुख्याधापक धर्मसाळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.टी. एन.शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.स्वाती घाटुळे यांनी केले तर उपस्थितीतांचे आभार डॉ.शंकर राजे यांनी मानले. सदर कार्यक्रमास प्रा.नादरगी, प्रा.अश्विनी राऊत, स्पर्धा परिक्षेतून यशस्वी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी यशवंत धत्तुरे आणि कनकी व महाविद्यालयातील विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# प्रशासकीय सेवेत येणाऱ्या महिलांचे [illegible]माण केवळ ३ टक्के

## वित्त व लेखाधिक[illegible]री सूर्यकांत खटके यांची खंत



▶ सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात सूर्यकांत खटके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवानंद भांजे, डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

शहर संचार

▶ सोलापूर, दि. २८- स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत येणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ तीन टक्के आहे. उर्वरित ९७ टक्के महिला पारंपरिक जीवन स्वीकारतात. महिलांनी आता पारंपरिक जोखडातून बाहेर पडले पाहिजे आणि स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत आले पाहिजे, असे प्रतिपादन वित्त व लेखाधिकारी सूर्यकांत खटके यांनी केले आहे.

येथील बुर्ला महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानात खटके बोलत होते. स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी डॉ. शिवानंद भांजे, डॉ. राजेंद्र शेंडगे, कुचन प्रशालेचे उपमुख्याध्यापक धर्मसाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. टी. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

खटके पुढे म्हणाले की, महिला अबला आहेत. असा गैरसमज सर्वत्र निर्माण केला गेला आहे. प्रशासकीय सेवेतील तीन टक्के महिलांनी हा गैरसमज दूर केला आहे. महिलाही पुरुषाइतक्याच सक्षम आहे. हे त्यांनी दाखवून दिले आहे. यामध्ये मनीषा म्हैसकर, दीपाली काळे, वैशाली कुलकर्णी आणि शिल्पा करमळकर या महिलांचा आवर्जून उल्लेख केला जातो. जीवनात काही तरी करून दाखविण्यासाठी आपण जेव्हा स्वप्न पाहतो. तेव्हा समाज आपल्याला नावेच ठेवत असतो. त्याकडे आपण दुर्लक्ष केले पाहिजे. स्वत:वर विश्वास ठेवला पाहिजे. नातेसंबंधातील सकारात्मकता जपायला हवे. पैशासाठी प्रशासकीय सेवेत न येता नाव आणि प्रतिष्ठा कमविण्याच्या निश्चयाने प्रयत्न केले पाहिजे. महिलांनी स्वत:बरोबर समाजाचेही हित साधले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटोळे यांनी केले तर आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले.

# कलेच्या विविध अंगांचा अभ्यास होणे महत्त्वाचे

शहर संचार

सोलापूर, दि. ३०- जगामध्ये अनेक प्रतिभाशाली दिग्दर्शक, कलाकार आहेत. त्यांनी चित्रपट, नाटकासारख्या हजारो अजरामर कलाकृती निर्माण केल्या आहेत. अशा कलेच्या विविध अंगांचा अभ्यास फिल्म क्लबमधून व्हावा, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केली.

येथील बुर्ला महिला महाविद्यालयात भाषा संवादिनीतर्फे स्थापन करण्यात आलेल्या फिल्म क्लबच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. शेंडगे बोलत होते.

यावेळी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, ॲनी जॉन, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. सुरेखा बतुल, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. आर. के. वडजे आदी उपस्थित होते.

शेंडगे पुढे म्हणाले की, मराठी चित्रपटसृष्टी, बॉलिवूड, हॉलिवूड आणि युरोपियन देशात अनेक चित्रपट आणि मालिका तयार होतात.



सोलापूर : भाषा संवादिनीतर्फे आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, ॲनी जॉन, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे व अन्य.

यामध्ये अनेक कलात्मक कृती असतात. अशा कलाकृतींमध्ये अनेक बारकावे असतात. यामधील दिग्दर्शन, विषयाची मांडणी, संगीत, अभिनयातील संवेदनशीलता व वास्तवता हे विषय अभ्यासाचे असतात. यातून कला शिकायला मिळते.

आपल्याकडे अशा कलाकृतींचा आस्वाद घेण्याची तयारी व आवड निर्माण झाली पाहिजे. यामुळे आपल्या कलेविषयीच्या ज्ञानात भर पडते, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी मानले.

३ पुढारी | शुक्रवार ३१ ऑगस्ट २०१८

# उद्योगातील यशासाठी चारित्र्य जपले पाहिजे

## शिवप्रकाश चव्हाण यांचे प्रतिपादन



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात शिवप्रकाश चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

**सोलापूर : प्रतिनिधी**

उद्योग व व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित केले पाहिजे. योग्य तेथे गुंतवणूक केली पाहिजे. काळाबरोबर चालले पाहिजे. संघटन, पारदर्शकता व सर्वांबरोबर सौजन्यपूर्ण वागणूक ठेवली पाहिजे आणि ग्राहक व चारित्र्य जपले पाहिजे, असे प्रतिपादन चव्हाण उद्योग समूहाचे प्रमुख शिवप्रकाश चव्हाण यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी 'चव्हाण उद्योग समूहाची वाटचाल' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर प्रा. गुंडेली, डॉ. भोसले यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना चव्हाण म्हणाले की, सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था टेक्स्टाईल, साखर कारखाने आणि विडी उद्योग यावर अवलंबून आहे. माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांच्या धोरणामुळे सोलापूरमध्ये इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला प्रोत्साहन मिळाले. तेव्हाच व्हिडीओकॉनची डिलरशीप घेऊन उद्योग व्यवसायात पाऊल ठेवले. ग्राहकांना सांभाळण्याची सचोटी यामुळे व्हिडीओकॉन, कायनॅटिक, हिरो होंडा, मारुती सुझुकी, टाटा कमर्शिअल आणि रॉयल इन्फिल्ड इ. कंपनीची डीलरशीप मिळाली. आज दुचाकी वाहनांपासून वीसचाकीपर्यंतच्या वाहनांची विक्री चव्हाण उद्योग समूहातून होत आहे. हा उद्योग व्यवसाय सांभाळताना ग्राहकांनी उद्योग समूहात प्रवेश केल्यानंतर तो आनंदात नाचत बाहेर जाईल, अशी सेवा देण्याची आम्ही भूमिका स्वीकारली म्हणूनच दिवसेंदिवस उद्योगाची भरभराट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक डॉ. शिवानंद भांजे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्रीनिवास गुंडेली यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. पुष्पलता राचर्ला यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. शिरीष भोसले यांनी मानले.

३ पुढारी | गुरुवार ३० ऑगस्ट २०१८



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयात मार्गदर्शन करताना खटके.

# महिलांनी पारंपरिक जीवनातून बाहेर पडावे : सूर्यकांत खटके

**सोलापूर (प्रतिनिधी) :** स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत येणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ ३ टक्के आहे. पारंपरिक जीवनातून महिलांनी बाहेर पडले पाहिजे आणि स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय सेवेत आले पाहिजे आणि स्वतःबरोबर समाजाचेही हित साधले पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर ट्रेझरी विभागातील वित्त व लेखाधिकारी सूर्यकांत खटके यांनी केले. बुर्ला महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर डॉ. शिवानंद भांजे व कुचन प्रशालेचे उपमुख्याध्यापक धर्मसाळे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. टी.एन. शिंदे, तर सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटुळे यांनी केले.

दिव्य मराठी . सोमवार, १० सप्टेंबर २०१८ | ३

# तंत्रज्ञानाच्या वापरामुळे इंग्रजी ही लोकांची भाषा बनतेय : क्यातम

सोलापूर | इंग्रजी भाषा केवळ माध्यम नाही तर ती संस्कृती बनत आहे. लोकांची भाषा बनत आहे. लोक दैनंदिन जीवनात इंग्रजी भाषेचा वापर करू लागले आहेत. इंग्रजी लोकांची भाषा बनण्यात तंत्रज्ञानाचा वाटा मोठा आहे. व्हॉटस ॲप, फेसबुक व इतर समाजमाध्यमाच्या वापरामुळे इंग्रजी भाषा घराघरांत पोहोचली आहे, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी केले. ए. आर. बुर्ला आणि सोलापूर विद्यापीठ यांच्या वतीने बी.एम भाग ३ या वर्गाच्या आवश्यक इंग्रजी या विषयावर विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्राजक्ता जोशी होत्या. पंचप्पा वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.

संचार बुधवार १२ सप्टेंबर २०१८ ७

# विद्यार्थ्यांचे परिवर्तन हेच शिक्षकांचे खरे समाधान

शहर संचार

▶ सोलापूर, दि. ११- विद्यार्थ्यांच्या जीवनातील परिवर्तन, त्याला मिळणारे यश यातून शिक्षकाला समाधान मिळते. शिक्षक काळाचे आव्हान स्वीकारुन विद्यार्थ्यांवर संस्कार करत असतो. राष्ट्राची जडणघडण या दृष्टीने विद्यार्थ्यांचा शिक्षकांच्या या प्रयत्नाला प्रतिसाद आवश्यक असतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

येथील बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित शिक्षक सत्कार समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. शेंडगे बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. शेंडगे पुढे म्हणाले की, आज जगात धार्मिक राष्ट्रवाद फोफावत आहे. त्यामुळे सर्वत्र अस्वस्थता पसरत आहे. अशा काळात विद्यार्थ्यांनी विवेकाची कास धरली पाहिजे. तंत्रज्ञानाचा केवळ मनोरंजनासाठी उपयोग न करता ज्ञान वाढविण्यासाठी केला पाहिजे. कष्टाचा मार्ग त्रासदायक असेल, परंतु या मार्गाने मिळणारे यश टिकाव स्वरुपाचे असते म्हणून विद्यार्थ्यांनी कष्टातूनच यश संपादन केले पाहिजे.

प्रा. सुरेखा बत्तुल व प्रा. उमाशंकर नादरगी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मंजूषा गंपले यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजना सरवदे यांनी केले तर आभार सोनाली शिंदे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत दि. ११ सप्टेंबर २०१८ ७



# बुर्ला महिला महाविद्यालयात शिक्षकांचा सत्कार

सोलापूर, दि. १० सप्टेंबर -

बुर्ला महिला महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले. व्यासपीठावर प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शंकर राजे आणि डॉ. टी.एन. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. भुवनेश्वरी सामलेटी, रुचिता मादगुंडी, लावण्या आडेपु, माहेश्वरी रापर्ती, पूनम गायकवाड, समरीन मुजावर यांनी मनोगत व्यक्त केले.

संचार | ४ | सोलापूर, गुरुवार १३ सप्टेंबर २०१८

# सौंदर्य प्रसाधन उद्योगात रोजगाराच्या मोठ्या संधी

## 'बुर्ला'मध्ये ब्युटीपार्लर अभ्यासक्रमाचे उद्घाटन संपन्न

शहर संचार

सोलापूर, दि. १२- सुंदर दिसावे असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी खूप धडपडही केली जाते. यामुळेच महिलांच्या सौंदर्य प्रसाधनाचा उद्योग चांगलाच विस्तारला आहे. अलंकार असो की कॉस्मेटिक महिलांच्या सौंदर्य प्रसाधन उद्योगात महिलांना रोजगाराच्या मोठ्या संधी आज निर्माण झाल्या आहेत, असे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले.

राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व साज ब्युटीपार्लर यांच्यातर्फे आयोजित बेसीक ब्युटीपार्लर व फॅशन डिझायनिंग अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयात ब्युटीपार्लर अभ्यासक्रमाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, सविता येदूर, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी व अन्य.

याप्रसंगी ब्युटीपार्लर अभ्यासक्रमाच्या प्रमुख श्वेता लाडे, फॅशन डिझायनिंगच्या सविता येदूर, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. ॲनी जॉन आर्दीची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. तसेच मान्यवरांचा सत्कार केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजूषा गंपले यांनी केले. तुलशी जाधव यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

15

संचार रविवार १६ सप्टेंबर २०१८ ७



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सुरैय्या शेख यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी व अन्य.

# हिंदी जागतिक भाषा बनण्याच्या वाटेवर

शहर संचार

सोलापूर, दि. १५- हिंदी भाषेचा जगात झपाट्याने प्रसार होत आहे. त्यामुळे आता भाषेची अडचण दूर होत आहे. अमेरिकेसारख्या देशातील ४२ विद्यापीठातून हिंदी भाषा शिकविली जात आहे. चीनमध्येही हिंदी भाषा शिकविली जात आहे. हिंदी भाषेच्या या प्रसारामुळे हिंदी जागतिक भाषा बनण्याच्या वाटेवर आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. सुरैय्या शेख यांनी केले.

येथील बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भाषा दिन व साक्षरता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. शेख बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे होते.

शेख पुढे म्हणाल्या की, हिंदी भाषेत थोर साहित्यिक व कवी होऊन गेले आहेत. परंतु आज हिंदी केवळ साहित्याची भाषा राहिली नाही तर लोकांची जगण्याची भाषा बनली आहे. हिंदी एका दिवसापुरती बोलण्याची भाषा नाही तर तिचा दैनंदिन जीवनातील वापर वाढला आहे. महात्मा गांधी यांनीही हिंदी भाषेचे महत्त्व आधोरेखित केले होते. साहेस्ता नदाफ, मुबीना शेख यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. शेंडगे म्हणाले की, समाज असो वा देशाची व्यवस्था यामधील व्यंग दाखविण्याचे काम हिंदी भाषेने केले आहे. मिर्झा गालिब यांनी गझलेतून मानवी जीवनातील विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. अशा साहित्याच्या वाचनामुळे जीवन जगण्याचे मार्गदर्शन मिळते.

प्रास्ताविक प्रा. प्राजक्ता जोशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर.के. वडजे यांनी केले तर आभार प्रा. रंजना बनसोडे यांनी मानले.

३ पुढारी सोमवार १७ सप्टेंबर २०१८

# हिंदी जागतिक भाषा बनण्याच्या वाटेवर : शेख

सोलापूर : प्रतिनिधी

भारत हा देश जगातील मोठी बाजारपेठ आहे. अशा बाजारपेठेबरोबर व्यापार करण्यासाठी जगातील अनेक देश इच्छुक आहेत. यामध्ये भाषेची अडचण मोठी होती, पण हिंदी भाषेचा जगात जो प्रसार होत आहे, त्यामुळे ही अडचण दूर होत आहे. अमेरिकेसारख्या देशातील ४२ विद्यापीठातून हिंदी भाषा शिकली जात आहे. चीनमध्येही हिंदी भाषा शिकली जात आहे. हिंदी भाषेच्या या प्रसारामुळे हिंदी भाषा जागतिक भाषा बनण्याच्या मार्गावर आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. सुरैय्या शेख यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भाषा दिन व साक्षरता दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी त्या मार्गदर्शन करताना बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. पुढे बोलताना डॉ. शेख म्हणाल्या की, हिंदी भाषेत अनेक थोर साहित्यिक व कवि होऊन गेले आहेत. पण आज हिंदी केवळ साहित्याची भाषा राहिली नाही, तर लोकांच्या जगण्याची भाषा बनली आहे.

हिंदी एकदिवसापुरती बोलण्याची भाषा राहिली नाही, तर तिचा दैनंदिन जीवनातील वापर वाढला आहे. महात्मा गांधी यांनी हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले आहे की, स्वातंत्र्य व हिंदी भाषा यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली तर मी हिंदी भाषेची निवड करेन. कारण हिंदी भाषाच देशाला स्वातंत्र्य मिळवून देईल, अशी हिंदी भाषा ही भारतीय लोकांची जीवन पद्धत बनली आहे. स्पर्धा परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी संजीवनी बनली आहे. याप्रसंगी साहेस्ता नदाफ आणि मुबिना शेख या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. तर दिव्या गणपा बी.ए. भाग-१ या विद्यार्थिनीने हिंदी भाषेतील पुस्तके ग्रंथालयास भेट दिली.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, समाज असो, देशाची व्यवस्था असो यामधील व्यंग दाखविण्याचे काम हिंदी भाषेने केले आहे. मिर्झा गालिब यांनी गझलमधून दाखवून दिले. अशा या हिंदी भाषेचा वापर सर्वत्र होत आहे. प्रास्ताविक प्रा.डॉ. प्राजक्ता जोशी यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.डॉ. आर.के. वडजे यांनी केले. आभार प्रा. रंजना बनसुडे यांनी मानले. समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भाषा दिन व साक्षरता दिन कार्यक्रमाप्रसंगी दीपप्रज्वलन करताना सोलापूर विद्यापीठ व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. सुरैय्या शेख, प्रा.डॉ. आर.के. वडजे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. जोशी, प्रा. बनसुडे.

१ पुढारी | सोमवार १७ सप्टेंबर २०१८

# सौंदर्यप्रसाधन उद्योगात रोजगाराच्या संधी : डॉ. शेंडगे

**सोलापूर : प्रतिनिधी**

सुंदर दिसावे असे प्रत्येकालाच वाटते. त्यासाठी खूप धडपड केली जाते. यामुळेच महिलांच्या सौंदर्यप्रसाधनाचा उद्योग चांगलाच विस्तारत आहे. मग तो उद्योग अलंकाराचा असो कॉस्मेटिकचा असो. या उद्योगांच्या अनुषंगानेच ब्युटी पार्लर आणि फॅशन डिझायनिंगला चांगले दिवस आले आहेत. सेवा क्षेत्रातील महिलांचा हा महत्त्वाचा उद्योग आहे. अशा महिलांच्या उद्योगात रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.



**सोलापूर : बेसिक ब्युटी पार्लर आणि फॅशन डिझायनिंग अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, सविता येदूर, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी आणि प्रा. ॲनी जॉन आदी.**

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि साझ ब्युटी पार्लर यांच्या संयुक्त विद्यमाने बेसिक ब्युटी पार्लर आणि फॅशन डिझायनिंग अभ्यासक्रमाचा उद्घाटन समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होते. व्यासपीठावर ब्युटी पार्लर अभ्यासक्रमाच्या प्रमुख श्वेता लाडे आणि फॅशन डिझायनिंग अभ्यासक्रमाच्या प्रमुख सविता येदूर, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी आणि प्रा. ॲड. ॲनी जॉन आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. शेंडगे म्हणाले की, जगण्यासाठीचा मानवाचा संघर्ष पूर्वीपासून चालू आहे. आजही करावा लागतोय. महिलांचे विश्व मोठे आहे. महिलांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी मोठे उद्योग विकसित झाले आहेत. त्यासाठी विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. हे विचारात घेऊनच, आजच्या काळात महिलांनी मानसिकता बदलली पाहिजे. पण अशावेळी केवळ कौशल्यपूर्ण शिक्षण घेणे पुरसे नाही. तर घेतलेल्या या शिक्षणातून अर्थप्राप्ती कशी होईल, हे विचारात घेतले पाहिजे. त्यासाठी पडेल तेवढे कष्ट घेतले पाहिजेत. तरच आर्थिक सुबत्ता येईल. प्रास्ताविक प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. सूत्रसंचालन मंजुषा गंपले हिने केले. तर आभार तुलसी जाधव हिने मानले.

# आनंदी जगण्यासाठी जिवंतपणा हवा : लेले

**सोलापूर : प्रतिनिधी**

जीवनात चढ-उतार असतात. यश-अपयश जीवनाचा भाग असतो. आयुष्यातील प्रत्येक व्यक्ती वा क्षण आपला मार्गदर्शक असतो. जीवनात अपयश आले तरी उसळी मारुन वर आले पाहिजे. जीवनातील आनंद वेचण्यासाठी जिवंतपणा, जिव्हाळा, जिज्ञासा व जिद्द असली पाहिजे, असे मत ठाणे येथील धनश्री लेले यांनी मांडले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'आनंदी जीवन जगताना' या विषयावर धनश्री लेले यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी त्या विद्यार्थिनींसमोर बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष व्यंकटेश बिटला, पुंडलिक पगडीमल, लता चन्ना आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना लेले म्हणाल्या की, मानवी जीवन खूप सुंदर आहे, पण आपल्याकडे मनाचा जिवंतपणा पाहिजे. तरच आपण झाडाचं वाळलेले पानही गळून पडताना कौतुकाने पाहू शकतो. असा जिवंतपणा मनाला उभारी तर देतोच पण जगण्याचं भानही देतो. हे माझं काम आहे, त्यासाठी मी १०० टक्के देईन, या विचाराने केलेले कोणतेही काम उत्तमच होते. जिज्ञासेतूनच एडिसनने विजेच्या दिव्याचा शोध लावला अशी जिज्ञासा आपल्याकडे हवी. प्रास्ताविक डॉ. टी.एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रजनी दळवी यांनी केले.

संचार सोलापूर, मंगळवार १८ सप्टेंबर २०१८ ७

# आनंदी जगण्यासाठी जिवंतपणा आवश्यक : लेले




▶ सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात धनश्री लेले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पांडुरंग दिड्डी, डॉ. राजेंद्र शेंडगे, व्यंकटेश बिटला, पुंडलिक पगडीमल, लता चन्ना व अन्य.

शहर संचार

▶ सोलापूर, दि. १७- जीवनात चढ-उतार असतात. यश अपयश जीवनाचा भाग असतो. आयुष्यातील प्रत्येक व्यक्ती वा, क्षण आपला मार्गदर्शक असतो. जीवनात अपयश आले तरी उसळीमारुन वर आले पाहिजे. जीवनातील आनंद वेचण्यासाठी जिवंतपणा आवश्यक आहे, असे मत ठाणे येथील धनश्री लेले यांनी व्यक्त केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यासकेंद्र व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. 'आनंदी जीवन जगताना' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी पांडुरंग दिड्डी हे होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, रोटरी क्लबचे अध्यक्ष व्यंकटेश बिटला. पुंडलिक पगडीमल, लता चन्ना आदी उपस्थित होते.

लेले पुढे म्हणाल्या की, मानवी जीवन खूप सुंदर आहे, पण आपल्याकडे मनाचा जीवंतपणा असला पाहिजे. तरच आपण झाडाचे वाळलेले पानही गळून पडताना कौतुकाने पाहू शकतो, असा जिवंतपणा मनाला उभारी तर देतोच पण जगण्याचे भानही देतो. हे माझे काम आहे. ते मी शंभर टक्के करेन, या विचाराने केलेले कोणतेही काम उत्तमच होते. जाणून घेण्याच्या जिज्ञासेतूनच एडीसनने विजेच्या दिव्याचा शोध लावला, अशी जिज्ञासा आपल्याकडेही हवी. जिद्दी माणसाला ध्येयापर्यंत पोहोचवतो. जिद्दीमुळेच जीवनात सकारात्मकता निर्माण होते. त्यातूनच आनंदी जगण्याची ऊर्जा मिळते. प्रारंभी प्रास्ताविक डॉ. टी. एन. शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजनी दळवी यांनी केले तर आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले.

दैनिक दिव्य मराठी | शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८

# रुसाअंतर्गत दहा महाविद्यालयांना प्रत्येकी दोन कोटी अनुदान मंजूर

प्रतिनिधी | सोलापूर

सोलापूर विद्यापीठ संलग्नित तब्बल दहा महाविद्यालयांना प्रत्येकी दोन कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, रुसा या स्कीमद्वारे हे अनुदान मिळेल. पायाभूत सुविधेसाठी महाविद्यालयांना अनुदान, अशी रुसाची योजना आहे. या अंतर्गत हे प्रस्ताव पाठवण्यात आले होते. एकाच जिल्ह्याच्या विद्यापीठातील एकूण दहा महाविद्यालयांना अनुदान प्राप्त होणे सोलापूर विद्यापीठाचे मोठे यश आहे.

विद्यापीठातील रुसा विभागाने एक कार्यशाळा आयोजित केली होती. रुसाचे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. विजय जोशी, अक्षय कदम यांनी मार्गदर्शन केले होते. ही कार्यशाळा महाविद्यालयांना हे अनुदान मिळवण्यासाठी मदतीची ठरली. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी मार्गदर्शन केले. शैक्षणिक संशोधन आणि विकास विभागाचे डॉ. व्ही. बी. पाटील यांचे नियोजन व प्रयत्न या कामी आले. रुसा विभागाचे विशेष कार्यासन अधिकारी डॉ. विकास पाटील यांनी रुसा कार्यालय मुंबई येथे पूरक नियोजन केले.

## अनुदानास प्राप्त ठरलेली दहा महाविद्यालये

- डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स
- ए. आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय
- शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते,
- एच. एन. कॉलेज ऑफ कॉमर्स
- संगमेश्वर महाविद्यालय
- दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय
- सोशल आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज
- डी. बी. एफ. आर्टस् अँड सायन्स कॉलेज
- वालचंद आर्टस् अँड सायन्स कॉलेज
- छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय

सुराज्य सोलापूर रविवार, दि. २३ सप्टेंबर २०१८ 4

# संस्थेचे भविष्य दशरथ गोप यांच्या हाती सुरक्षित : ॲड. क्यातम




महाविद्यालयाचे प्रमुख दशरथ गोप यांच्या वाढदिवसानिमीत्त आयोजित कार्यक्रमात बोलताना ॲड श्रीनिवास क्यातम, यावेळी व्यासपीठावर पांडुरंग दिड्डी, श्रीधर चिट्याल,दिनेश यन्नम,दशरथ गोप आदी.

सोलापूर/प्रतिनिधी

पद्मशाली शिक्षण संस्था ही नामांकित शिक्षण संस्था आहे. या संस्थेत पूर्व भागातील मुलामुलींच्या बालवाडीपासून ते उच्च महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था झाली आहे. अशा शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी दशरथ गोप २५ वर्षांपासून रात्रंदिवस परिश्रम घेत आहेत. यामुळेच आज पद्मशाली शिक्षण संस्थेला ऊर्जितावस्था आली आहे. संस्था योग्य दिशेने वाटचाल करु लागली आहे. गोप यांच्या विद्यार्थीकेंद्रीत धोरणामुळे संस्थेचे भविष्य उज्ज्वल आहे आणि त्यांच्या हाती संस्थेचे भविष्य सुरक्षित आहे,' असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ऐ. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर वादविवाद स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी होते.

यावेळी संस्थेचे सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, दशरथ गोप, समितीचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त मल्लिकार्जुन सरगम, ॲड. श्रीनिवास कटकूर, नागनाथ गंजी, संगीता इंदापुरे, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली, मच्छा आदी उपस्थित होते. यावेळी पांडुरंग दिड्डी व काशीनाथ गड्डम यांनी विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# गोप यांच्या वाढदिनानिमित्त वादविवाद स्पर्धा

सोलापूर, दि. २२- पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील व महिला महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते झाले.

या वादविवाद स्पर्धेत कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, भू. म. पुल्ली कनिष्ठ महाविद्यालय, रामकृष्णपंत बेत रात्र महाविद्यालय आणि ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयतील विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. प्लॅस्टिक बंदी, आंतरजातीय विवाह, सोशल मीडियाचा वापर आणि बदलती जीवनशैली हे वादविवाद स्पर्धेतील विषय होते.




**सोलापूर : दशरथ गोप यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी हे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

या कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, गोप गौरव समितीचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त मल्लिकार्जुन सरगम, अ‍ॅड. श्रीनिवास कटकूर, नागनाथ गंजी, संगीता इंदापुरे, रमेश विडप, विजयकुमार गुल्लापल्ली आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रजनी दंळवी यांनी केले तर मधुकर गवळी यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
. २७ सप्टेंबर २०१८
११



## ग्रामीण भागातील व्यथा जाणून घ्याः डॉ. शिंदे

सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-

रासेयोव्दारे समाजात, देशात देशप्रेम व समाजसेवेचे बीज रुजले जावे, युवकांनी समाजातील अज्ञान दूर करून तेथील समस्या ग्रामीण भागातील व्यथा जाणून घेणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ. तुकाराम शिंदे यांनी व्यक्त केले. बुर्ला महिला महाविद्यालयात रासेयो विभागाच्यावतीने म. गांधी जयंती पंधरवडा व रासेयो दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. राजेंद्र वडे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. सुरेख बत्तुल, प्रा. डां. रजनी दळवी आदी उपस्थित होते.

दिव्य सिटी . रविवार, १४ ऑक्टोबर २०१८ | ६

# 'सहजीवनाचा उत्तम आदर्श म्हणजे बा-बापू'

## अनुराधा मोहीन यांचे मत, बुर्ला महाविद्यालयात झाले व्याख्यान

प्रतिनिधी | सोलापूर

महात्मा गांधी यांचे जीवन सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचा आदर्श सर्वांनी आचरणात आणण्यासारखाच होता आणि आहे. महात्मा गांधी यांचे स्त्री-पुरुष सहजीवनाबाबतचे आदर्श स्त्री- पुरुषांच्या उपयोगी आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात स्त्री-पुरुषांमध्ये येणारा दुरावा दूर होण्यासाठी महात्मा गांधीजी, कस्तुरबा गांधी यांच्या सहजीवनाचे उदाहरण संजीवनीसारखे ठरेल, असे प्रतिपादन अनुराधा मोहिनी (सेवाग्राम वर्धा) यांनी केले.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज बोरामणी प्राणीमित्र विलास शिवलाल सर्वोदय ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिण्यात आलेल्या महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती महोत्सवानिमित्त बा - बापू सर्वोदय व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर माजी आमदार निर्मला ठोकळ, प्रा. डॉ. आर. के. वडजे, प्रा. डॉ. शंकर राजे, डॉ. उमाकांत चनशेट्टी उपस्थित होते.

डॉ उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. आर. के. वडजे यांनी सूत्रसंचालन केले.

10

सोलापूर तरुण भारत दि. २९ ऑक्टोबर २०१८ ११



# बुर्ला महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि.२८ ऑक्टोबर-**

बुर्ला महिला महाविद्याने सोलापूर विद्यापिठाच्या युवा महोत्सवात भरीव यश संपादन केले आहे.

युवा महोत्सवात सहभाग नोंदवताना महाविद्यालयातर्फे सादर करण्यात आलेल्या लघुनाटिकेला तृतीय क्रमांक मिळाला तर एकांकिकेसाठी प्रगती पवार या कलाकार विद्यार्थिनीला सहभाग नोंदविल्याचे बक्षिस महाविद्यालयास प्राप्त झाले आहे. प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, व प्रा. डॉ. रजनी दळवी, आतिष पाटोळे यांचे युवा महोत्सवातील सहभागी कलाकार विद्यार्थीनींना मार्गदर्शन लाभले होते.

महाविद्यालयाच्या युवा महोत्सवातील या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पांडूरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व सर्व विश्वस्त, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

संचार

४ सोलापूर, बुधवार २८ नोव्हेंबर २०१८

## बुर्ला महिला महाविद्यालय

राजेंद्र चौकातील ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात संविधान, शहीद दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले. देशाची अखंडता आणि सामाजिक एकता टिकविण्याच्या दृष्टीने भारतीय संविधानाचे महत्त्व मोठे असल्याचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी सांगितले. यावेळी प्रा. रंजना बनसुडे, प्रा.डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा.डॉ. अॅनी जॉन, शिरीष भोसले, रजनी दळवी, तुकाराम शिंदे आदी उपस्थित होते.

संचार | १० | सोलापूर, सोमवार १ जानेवारी २०१८

# अत्याचाराविरुद्ध मुला-मुलींनी निर्भीडपणे पुढे यावे : डॉ. बोंदार्डे



**कर्देहळ्ळी : येथे बुर्ला महिला महाविद्यालयाच्यावतीने आयोजित श्रमसंस्कार शिबिरात प्रा. डॉ. अश्विन बोंदार्डे यांचा प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी सत्कार केला. याप्रसंगी प्रा. उमेश कुंटे व अन्य.**

संचार प्रतिनिधी

**सोलापूर, दि. ३१-** समाजातील विविध घटकांद्वारे आज मुला-मुलींवर अत्याचार होत आहेत. अशा अत्याचाराविरुद्ध मुला-मुलींनी निर्भीडपणे पुढे येऊन तक्रार द्यावी, असे आवाहन प्रा. डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी केले.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने कर्देहळ्ळी (ता. द. सोलापूर) येथे आयोजित केलेल्या श्रमसंस्कार शिबिरात डॉ. बोंदार्डे बोलत होते. यावेळी प्रा. नितीन थोरात, प्रा. उमेश कुंटे, सरपंच जगन्नाथ कोळी, जिल्हा परिविक्षा अधिकारी आर. एस. खरात, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. सुरेखा बत्तुल, नरसिंह पौळ, कृष्णात कोळी आदी उपस्थित होते.

डॉ. बोंदार्डे पुढे म्हणाले, बाल हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला जगण्याचा अधिकार आहे. मात्र, त्यांचे अधिकार डावलण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. याविरुद्ध प्रबोधनाची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रा. कुंटे यांनीही महिलांवरील कौटुंबिक अत्याचार या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक पल्लवी रासमल हिने तर सूत्रसंचालन पूजा नवगिरे हिने केले. आभार अन्नपूर्णा गिराम हिने मानले.

सुराज्य सोलापूर, दि. ०७ जानेवारी २०१९ 5

# लगट करणाऱ्या पुरुषांची कानउघाडणी करावी : पो.नि. शिरगिरे

सोलापूर : 'लाखात एखादा पुरुष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरुष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कानउघाडणी करावी. यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाही, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक वंदन शिरगिरे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस उन्नत दिनानिमित्त महिलांची कायदेविषयक जनजागृती हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी त्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.

शिरगिरे पुढे म्हणाल्या, महिलांनी स्वत:वर ओढवणारा वाईट प्रसंग टाळण्यासाठी स्वत:च काही उपाय केले पाहिजेत. जिथे कोणीच नाही अशा ठिकाणी जाण्याचे टाळलेच पाहिजे. खरे तर पोलिसांना गुन्हेगारांनी घाबरले पाहिजे, नागरिकांनी नाही. म्हणूनच एखाद्या पुरुषाकडून लज्जा वाटेल म्हणजे आपल्याला अपमान वाटणे, राग येणे रडू येणे असे कृत्य होत असेल तर तत्काळ महिलांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ महाडिक यांनी नागरिकांनी कधीही आवाज द्यावा. पोलीस तत्काळ त्यांच्या मदतीला येतील, असे सांगून म्हणाले, मोबाईल हॅकरचा धोका वाढला आहे. यामुळे अनोळखी व्यक्तीच्या हाती मोबाईल देऊ नये, अनावश्यक ॲप घेऊ नयेत, एटीएम कार्ड, क्रेडिट कार्डचा सांभाळून वापर करावा, शादी डॉट कॉम, डेटिंग साईट, व्हॉटस्ॲप, फेसबूक व इतर सोशल साईटवर अनोळखी व्यक्तींशी संपर्क ठेवू नये. अन्यथा केवळ आर्थिकच नाही तर जीवनभराची फसवणूक होऊ शकते. याचवेळी ॲड. सत्यनारायण माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले.




प्रास्ताविक पो.नि. अमोद भुजबळ यांनी केले तर, सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले.कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.




# महिलांनी पुरुषांची कानउघाडणी करावी

## पो नि. शिरगीरे यांचे मत

**सोलापूर, दि. ७ जानेवारी**

लाखात एखादा पुरुष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरुष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कानउघाडणी करावी. यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाहीत असे प्रतिपादन पोलिस निरिक्षक वंदना शिरगीरे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यम ने पोलिस उन्नत दिनानिमित्त म हिलांची कायदेविषयक जनजागृती ही कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी त्या विद्यार्थीनींना म र्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.

याप्रसंगी पो. उपनिरिक्षक श्रीनाथ महाडिक यांनीही म नोगत व्यक्त केले. याचवेळी अॅड. सत्यनारायण माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस निरिक्षक अमोद भुजबळ यांनी केले. सुत्रसंचालन व प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले. सदर कार्यक्रमास म हाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थीनी उपस्थित होते.

संचार | २ | सोलापूर, मंगळवार ८ जानेवारी २०१९

# संरक्षणाच्या कायद्याबाबत महिलांनी जागरूक राहावे

शहर संचार

**सोलापूर,** दि. ७- एखाद्या पुरुषाकडून महिलांना लज्जा वाटेत असा प्रसंग घडत असेल तर महिलांनी तत्काळ पोलिसांकडे तक्रार केली पाहिजे. संरक्षणाच्या कायद्याबाबत महिलांनी सदैव जागरूक राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक वंदना शिरगिरे यांनी केले.

येथील अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस उन्नत दिनानिमित्त 'महिलांची कायदेविषयक जनजागृती' या विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ महाडिक, ॲड. सत्यनारायण माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिरगिरे पुढे म्हणाल्या की, लाखात एखादा पुरूष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरूष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कान उघाडणी करावी. त्यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाहीत. महाडिक म्हणाले की, नागरिकांनी कधीही आवाज द्यावा. पोलीस तत्काळ त्यांच्या मदतीला येतील. मोबाइल हॅकरचा धोका वाढला आहे. त्यामुळे अनोळखी व्यक्तीच्या हाती मोबाइल देऊ नये. अनावश्यक ॲप घेऊ नयेत. एटीएम कार्ड, क्रेडीट कार्डचा सांभाळून वापर करावा. शादी डॉट कॉम, डेटिंग साइट, व्हॉटस्ॲप, फेसबुक व इतर सोशल साइटवर अनोळखी व्यक्तीशी संपर्क ठेवू नये, अन्यथा केवळ आर्थिक नाही तर जीवनभराची फसवणूक होऊ शकते.

ॲड. माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक अमोद भुजबळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले.




**सोलापूर : महिलांची कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात पोलीस निरीक्षक वंदना शिरगिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्रीनाथ महाडिक, अमोद भुजबळ, डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.**

सकाळ
सोलापूर, बुधवार, १६ जानेवारी २०१९ ४

# एआर बुर्ला महिला महाविद्यालयाचे संस्कार परीक्षेत यश

**सोलापूर, ता. १५ :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाने गांधी विचार संस्कार परीक्षेत यश संपादन केले.

जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनच्या वतीने ही परीक्षा घेण्यात आली. त्यात स्वाती बिटला हिने जिल्हास्तरीय परीक्षेत प्रथम तर मंजूषा गंपले हिने तृतीय क्रमांक मिळविला. प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

संचार
बुधवार १६ जानेवारी २०१९ ५

# बुर्ला महाविद्यालयाचे संस्कार परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १५-** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गांधी विचार संस्कार परीक्षेत यश मिळविले.

जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे ही परीक्षा घेण्यात आली होती. त्यामध्ये बुर्ला महाविद्यालयातील बी.कॉम भाग-१ च्या स्वाती बिटला हिने प्रथम तर मंजूषा गंपले हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले.

पुढारी ३ शनिवार, २६ जानेवारी २०१९

# महिलांच्या पाठीशी पुरुषांनी ठामपणे उभे राहावे : डॉ. कोकरे



**सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकांत कोकरे. यावेळी उपस्थित मान्यवर.**

**सोलापूर :** स्त्रियांच्या यशासाठी पुरुषांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, त्याचबरोबर समाजाने स्त्रियांचा आदर केला पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत कोकरे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात अनुसयाबाई बुर्ला यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. कोकरे बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, श्रीनिवास आकेन, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, नरेश श्रीराम, शशिकला आकेन, इंदिरा रच्चा, सुवर्णा येमूल, डॉ. आर. के. वडजे, डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. शिरीष भोसले आदी उपस्थित होते.

तरुण भारत
www.tarunbharat.org
११
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महा
गुरुवार, ३१ जानेवारी २०१९

# शिक्षणातील ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करावा

## प्राचार्या डॉ. किर्ती पांडे



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-** विद्यापीठ स्तरावर जे अभ्यासक्रम तयार केले जातात ते व्यवहारात उपयोगी ठरणारे असतात. विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम पण विषयाच्या पलिकडे जावून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी ज्या विषयाचे ज्ञान आत्मसात केलेले असते. त्याचा व्यवहारामध्ये उपयोग करावा असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्राचार्या डॉ. किर्ती पांडे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात बी. कॉम. भाग ३ व बी.ए. भाग ३ च्या सुधारीत अभ्यासक्रमावर आधारीत विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे अध्यक्षस्थानी होते. पुढे बोलताना डॉ. किर्ती पांडे म्हणाल्या की, अभ्यासक्रम हे केवळ परीक्षेपुरते मर्यादित राहू नयेत. विद्यार्थ्यांनी समाजात जावून ज्ञान आत्मसात करावे. विद्यार्थ्यांनी अशा पध्दतीने अभ्यास करण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत बी. कॉम व बी.ए. भाग ३ सुधारित अभ्यासक्रमावर चर्चा झाली. कार्यशाळेत सोलापूर विद्यापिठ कार्यक्षेत्रातील विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी आणि विविध संज्ञा समजावून सांगण्यासाठी अशा कार्यशाळांचा उपयोग होतो. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवानंद भांजे यांनी केले.

सकाळ सोलापूर, रविवार, २४ फेब्रुवारी २०१९ ३

# ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी विवेकानंद केंद्र यांच्या वतीने ग्रंथप्रदर्शन पार पडले. त्याचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. डॉ. शंकर राजे, स्वामी विवेकानंद केंद्राचे सदस्य ऋत्विक कुर्ले, केदार कलशेट्टी, शेखर निंगदळ्ळी आदी उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील इंग्रजी व मराठी ग्रंथ, ताणतणावाचे व्यवस्थापन, गीता, व्यक्तिमत्त्व विकास आदी विषयांवरील पुस्तकांचा या ग्रंथप्रदर्शनात समावेश करण्यात आला होता.

# कुंभार यांना जीवनगौरव तर अणवेकर यांना इतिहास संशोधक पुरस्कार जाहीर



आनंद कुंभार नितीन अणवेकर

सोलापूर : विद्यार्थी इतिहास परिषदेच्यावतीने इतिहास विषयात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आनंद कुंभार यांना जीवनगौरव, तर शिलालेख, शिल्प संवर्धन केल्याबद्दल नितीन अणवेकर यांना इतिहास संशोधन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मंगळवार, २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यार्थी इतिहास परिषदेचे राज्यस्तरीय सोळावे अधिवेशन होणार आहे. या कार्यक्रमामध्ये पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. अधिवेशनास लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. वसंतराव वनसुडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, इतिहास संशोधिका डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, प्रा. एम. एम. मस्के उपस्थित राहणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली करावीत : बनसुडे

## आनंद कुंभार व अणवेकर यांचा सन्मान

शहर संचार

सोलापूर, दि. २७- आयुष्यभर इतिहासाचे संशोधन करून नवीन पैलू उजेडात आणणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार हे सोलापूरचे भूषण आहेत, तर नितीन अणवेकर यांनी शिल्प व शिलालेख संवर्धन करून मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली केली पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. वसंतराव बनसुडे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यार्थी इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, समन्वयक डॉ. टी. एन. शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार यांना जीवनगौरव तर नितीन अणवेकर यांना इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. शेंडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नवनवीन शोध घेण्याची वृत्ती ठेवली पाहिजे. त्यामुळे संशोधनातील अभिरूची जास्त मोहक होते. दर्जेदार संशोधन केल्याने समाज परिवर्तनास चालना दिली पाहिजे.

कुंभार म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या जीवन गौरव पुरस्कारामुळे जीवन कृतकृत्य झाले आहे. यापुढेही इतिहास विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करून इतिहास अभ्यासास गती प्राप्त करून देईन. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र वडजे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटुळे यांनी केले. परिषदेचे अध्यक्ष निकिता शितोळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास राज्यभरातील १७० प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनात ४७ शोधनिबंधांचे विद्यार्थ्यांनी वाचन केले.



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयातील विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशनात आनंद कुंभार यांना जीवनगौरव तर नितीन अणवेकरांना इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी डॉ. वसंतराव बनसुडे, डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. के. एम. जमादार आदी

पुरोगामी विचाराचे एकमत गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१९

▶प्रा. डॉ. बनसुडे यांचे प्रतिपादन ▶इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन

# विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली करावीत



**प्रतिनिधी / सोलापूर :**
आयुष्यभर इतिहासाचे संशोधन करुन नवीन पैलू उजेडात आणणारे इतिहास संशोधक आनंद कुंभार हे सोलापूरचे भूषण आहेत. तर नितीन अणवेकर यांनी शिल्प व शालालेख संवर्धन करुन योगदान दिले आहे. म्हणून त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली केली पाहिजेत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. वसंतराव बनसुडे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यार्थी इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते. यावेळी शुभारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, समन्वयक डॉ. टी. एन. शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार यांना जीवन गौरव तर नितीन अणवेकर यांनी इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ते पुढे म्हणाले की, इतिहास मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. इतिहासाची पाळेमुळे भूतकाळात रुतलेली असतात. त्याचा वेध घेतला पाहिजे आणि संशोधन गतीमान होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र वडजे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटुळे यांनी केले. आभार परिषदेच्या अध्यक्षा निकीता शितोळे यांनी मानले.

कार्यक्रमास डॉ. जयश्री कुलकर्णी उस्मानाबाद, डॉ. शीला स्वामी मुरुम, डॉ. शहाजहान शेख औसा, डॉ. देशमुख तुळजापूर, प्रा. लक्ष्मी रेड्डी, डॉ. ज्योती सुरवसे, प्रा. सुमन केंद्रे, डॉ. युवराज सुरवसे, प्रा. बिरुनगे, डॉ. साईनाथ कबाडे यांच्यासह राज्यभरातील १७० प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनात ४७ शोधनिबंधाचे विद्यार्थ्यांनी वाचन केले.

लोकमत

दि. २८ फेब्रुवारी २०१९ २

## इतिहास परिषदेसाठी दोघांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित इतिहास परिषदेसाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात निकिता शितोळे, अमृता गांगुर्डे, सोनाली शिंगे, कोमल भोसले, शारदा कसबे, तेजस्विनी धुळम, अश्विनी क्षीरसागर यांची निवड करण्यात आली. अधिवेशन यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. टी.एन. शिंदे, डॉ. स्वाती घाटुळे हे प्रयत्न करीत आहेत.

## ह. दे. प्रशालेतील विद्यार्थ्यांना निरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुढारी ५ सोलापूर, शनिवार, १३ मे २०२३

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचालकपदी प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांची नियुक्ती



**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचालकपदी कुलगुरूंनी नेमणूक केली आहे. प्रा. डॉ. वडजे २०११ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांनी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, केंद्र व राज्यशासनाच्या विविध योजना व विविध विषयांवर प्रबोधन कार्यक्रम आदी उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून दत्तक खेडे कर्देहळ्ळी येथे ग्रामस्थांचे प्रबोधन आणि गावासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. त्यांच्या या कामाची योग्य दखल घेत त्यांना विद्यापीठाकडून व इतर संस्थांकडून उत्कृष्ट कार्यक्रम अधिकाऱ्याचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांच्या या यशाचे काशिनाथ गड्डम, प्रा. श्रीनिवास कोंडी, दशरथ गोप, संगीता इंदापुरे, नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले आहे.

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. १९ एप्रिल २०२३ 3

# बुर्ला महिला महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची डॉ. कोटणीस स्मारकास भेट

✔ सोलापूर :पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थिनींनी जागतिक वारसा दिनानिमित्त भैय्या चौकातील डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारकास भेट देऊन डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे चीनमधील वैद्यकीय योगदान जाणून घेतले. या भेटीप्रसंगीं इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. स्वाती यादुले, प्रा. विकास शिंगे उपस्थित होते. महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ आणि प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी कौतुक केले.

संचार
सोलापूर, बुधवार, १२ एप्रिल २०२३ ५

# विवेकवाहिनीमुळे बौध्दिक निर्भयता

सोलापूर, दि. ११- युवकांनी विवेकवाहिनीमध्ये सहभागी होऊन बौध्दिक निर्भयता अंगी बाळगली पाहिजे, असे प्रतिपादन अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या निशा भोसले यांनी केले.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विवेकवाहिनी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'विवेकी विचार- काळाची गरज' याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ. अस्मिता बालगावकर, आर. डी. गायकवाड शंकुतला सूर्यवंशी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. टी. एन. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर राजे यांनी केले. आभार प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.

पुढारी ३
सोलापूर, बुधवार, १२ एप्रिल २०२३



सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात महात्मा फुले यांना अभिवादन करताना प्राध्यापक.

# बुर्ला महिला महाविद्यालयात फुले जयंती

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. नी. जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. सविता मल्लाडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संचार
४ सोलापूर, शनिवार, ८ एप्रिल २०२३



सोलापूर : ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात भगवान महावीर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. शिरीष भोसले व अन्य.

# बुर्ला महाविद्यालयात महावीर जयंती साजरी

शहर संचार

सोलापूर, दि. ७ - राजेंद्र चौकातील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात जैन धर्माचे संस्थापक वर्धमान महावीर यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भगवान महावीर यांचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांचे कार्य सर्व समाजासाठी दिशादर्शक आहे. सध्याच्या तरुणपिढीने त्यांच्या या कार्याचे अनुकरण करावे, असे आवाहन डॉ. शेंडगे यांनी केले.

कार्यक्रमास प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. रंजना बनसोडे, प्रा. डॉ. कविता मुरूमकर आदी उपस्थित होते.

## बुर्ला महिला महाविद्यालयाचे यश

**सोलापूर :** जळगाव येथील गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे घेतलेल्या गांधी विचार संस्कार परीक्षेत पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाने यश मिळविले. भाग्यश्री सुतार पदवी विभागामध्ये जिल्ह्यात प्रथम, लक्ष्मी रापर्ती पदव्युत्तर विभागात विभागून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. दरेप्पा बत्ताले, प्रा. रईसा पठाण यांनी अभिनंदन केले.

## बुर्ला महाविद्यालयात महिला दिन साजरा

**सोलापूर :** ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित महिलादिनाच्या कार्यक्रमात प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांचे व्याख्यान झाले. यावेळी प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. रजनी दळवी, मंजरीन मासुलदार, वैष्णवी कनकी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. स्वाती घाटुळे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत www.tarunbharat.org

कला साहित्य संस्कृती

शुक्रवार, १० मार्च २०२३ । ५

# ज्येष्ठ कवि राजेंद्र शेंडगे

सोलापुरी काव्यपंरपरेतील, ज्येष्ठ कवि डॉ. राजेंद्र शेंडगे हे सुध्दा त्यांचे योगदान देऊन आहेत. कवि राजेंद्र यांचा जन्म हा सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यामधील आसंगी या गावी आई सौ.संपदा आणि वडील श्री.नारायणराव शेंडगे यांच्या घरी दिनांक १५ नोव्हेंबर १९६१ रोजी झाली. कवि राजेंद्र यांचे वडील नारायणराव शेंडगे हे कृषीखात्यात पर्यवेक्षक म्हणून नोकरीस होते. ते सरकारी नोकरीत असल्याने त्यांची घरची आर्थिक परिस्थिती ही चांगलीच होती. त्यामुळे त्यांचे कुटुंबीय खाऊन पिऊन सुखी होते. आज कविंचे वडील हयात नाहीत पण त्यांना आईची छत्रछाया अजूनही आहे. याचा त्यांना मनस्वी आनंद आहे असे कवि डॉ. राजेंद्र शेंडगे सर हे अभिमानाने सांगतात. त्यांचे बालपणी अत्यंत संपन्नावस्थेत गेले.



कवि राजेंद्र यांचे बालपण ते तारुण्याचा कालखंड हा खूपच चांगला, अनुभवाने समृध्द करणारा होता. त्यांचे मूळ गावी आणि आजोळी दोन्ही घरी पाटीलकी असल्याने जमीन, जुमला आणि संपन्नता चांगली होती. कवि सकट हे दोन बहिणी, एक भाऊ यांची उन्हाळी, दिवाळीची सुट्टी ही एक तर आजोळी अथवा त्यांचे मूळ गावी मजेत जायची. आंब्याच्या मोठ्या बागा, करवंदांची जाळी, बारमाही पाण्याने तुडूंब भरुन वाहणारा ओढा, त्यातील माझे, खेकडे पकडण्यातील मजा, गावातील सर्व मुले ही भावंडे, खेळण, एकमेंकाच्या घरी जाणे-येणे, मनसोक्त खेळणे यामुळे लहानवयातच कविवर एक संस्कार होऊन जीवनाला आकार, अनुभव संपन्नता यायला सुरुवात झाली. कवि राजेंद्र यांना, स्वातंत्र्य सैनिक असलेल्या त्यांच्या आजोबांकडून बालपणी देशप्रेमाचे तसेच म.गांधी, पं.नेहरु, विनोबा भावे, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक यांचे विचार ऐकायला मिळाले. त्यांचे आजोबा हे तत्कालीन शे.का.प. तसेच मार्क्सवादी विचारांचे होते. त्यांच्या नावाने आजही गावी व्याख्यानमाला सुरु आहे. एकूणच कवि राजेंद्र हे त्यांचे बालपण, हे त्यांच्या आयुष्याचा पाया रचणारे ठरले असे मानतात.



सोलापुरी काव्य परंपरा...

● गिरीश दिवाकर दुनाखे
९६२३२३१४६३

कवि राजेंद्र यांचे शिक्षण हे एम.कॉम. पी.एच.डी.पर्यंत झालेले असून प्राथमिक शिक्षण सरकारी शाळेत तर माध्यमिक शिक्षण हे राजे रामराव विद्यामंदिर येथे झाले. माध्यमिक शिक्षण घेताना कविवर शिस्तीचे, अभ्यास करण्याचे, खेळण्याचे असे सर्व प्रकारचे चांगले संस्कार झाले. त्याच काळात शाळेमध्ये नाटक, अभिनय, वाचन, लेखन या सर्व बाबींसाठी अतिशय पोषक असे वातावरण असल्याने त्याचा अत्यंत चांगला असा परिणाम त्यांच्या आयुष्याच्या जडण-घडणीच्या काळात झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण जत येथील राजे रामराव महाविद्यालयात झाले व ते पदवीधर झाले. कॉलेज जीवनामध्ये अभ्यासासोबत खेळालाही जास्त प्रेरणा मिळाली त्यामुळे तिथे क्रिकेट, फूटबॉल, बॅडमींटन आदी खेळांचा आनंद मनसोक्त लुटता आला.

कवि राजेंद्र यांना बालवयात वाचन आवडही निर्माण झाली होती कारण त्यांचे घरातच वाचनाला पोषक वातावरण होते. मुख्यत: आई, वडिलांना वाचनाची आवड होती. त्यांचे वडील तर एक पुस्तक एक दिवसात वाचून पूर्ण करत असत. यामुळे कवि राजेंद्र यांना प्रेरणा मिळाली ते जत येथील सार्वजनिक वाचनालयात जाऊन वर्तमानपत्रे, नियतकालिके वाचून लागले त्याचा छंदच त्यांना लागून गेला. वयोमानानुसार त्यांचे वाचन वाढत गेले. त्यातील प्रगल्भता वाढली. त्याचे परिणाम स्वरुप कवि राजेंद्र यांनी इयत्ता अकरावीपासून लिखाणास सुरुवात केली. त्यांनी प्राथमिक अवस्थेत काही बालकथा लिहील्या आणि त्या 'आनंद' सारख्या त्या वेळच्या बालसाहित्यासाठी प्रसिध्द असलेल्या मासिकात प्रसिध्दही झाल्या. कवि राजेंद्र यांना महाविद्यालयीन काळात अध्यापन करणारे डॉ. स.ग.यादव, प्रांचार्य संपतराव जाधव यांच्यामुळे साहित्य वाचनाची गोडी जास्त वृध्दींगत होत गेली. सत्यकथा. ललीत, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, सा.स्वराज्य यांचे ते वाचक झाले. त्यामळे तत्कालीन लोकप्रिय लेखक, साहित्यिकांचे साहित्य मुळापासून वाचायला मिळाले. एकेका लेखकाचे संपूर्ण साहित्य सलगपणे वाचून पूर्ण करायची सवय त्यावेळी लागली. वेगळं, दर्जेदार, असं साहित्य वाचनाचा चोखंदळपणा तेव्हापासूनच कविच्या अंगात भिनून गेला. त्या दरम्यानच कवि राजेंद्र शेंडगे यांनी सांगलीच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या चिंतामणराव कॉमर्स कॉलेजमधून एम.कॉम.चे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या साहित्य लेखनाला कॉलेजचे प्राध्यापक काही पुस्तके, घरचे वातावरण यांनी टॉनिकच दिले जणू. कवि राजेंद्र यांनी त्या दरम्यान शिवाजी विद्यापीठातून टेक्सटाईल विषयातील पी.एच.डी संपादन केली.

कवि राजेंद्र यांनी १९८४ साली एम.कॉम होताच लगेचच ७ ऑगस्ट १९८४ पासून खानापूर जि.सांगलीच्या श्री.संपतराव माने महाविद्यालय येथे नोकरीस प्रारंभ केला. १९९० मध्ये ते श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालय येथे नंतर १९९१ मध्ये दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी येथे बदली झाली. १९९३ ते १९९७ सालापर्यंत श्रीमती ए.आर.पाटील महिला महाविद्यालय इचलकरंजी येथे नोकरी केली. १९९७ ते १९९९ मीनलबेन मेहता कॉलेज पाचगणी ता.महाबळेश्वर येथे प्राध्यापक म्हणून काम केले. १५ जुलै १९९९ पासून (पान १० वर)

(पान ५ वरुन)

अनेक विविध उपक्रम राबवले आहेत.दोन कवितेच्या ओळी देऊन पुढील दोन ओळी लिहिण्यास उद्युक्त केले आहे.किंवा छोटी कथा तयार करण्यास सांगितले आहे.यातून मुलांची आकलन शक्ती वाढते. विचार,चिंतन करण्याची आणि आव्हान स्वीकारण्याची सवय लागते. शिक्षकाची भूमिका मुलांचा पाया पक्का करणे हा आहे. आणि त्यांनी तेच करण्याचा प्रयत्न केला आहे.कवयित्री आशा पाटील यांचे शाळकरी मुलांवर जसे प्रेम आहे.तसे जीवनावर प्रेम करणारी देखील कवयित्री आहे.त्या म्हणतात माणसाला अडचणी येतात च पण त्यावर मात करून पुढे जावे, जसे पाणी खडकाला भेदून पुढे जाते तसे आपल्यातही सामर्थ्य असावे . त्यांनी आपल्या साहित्यातून मुलांसाठी अनमोल।कार्य केले आहे.हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांकरिताच्या इयत्ता सातवी सुलभ भारती मध्ये समाविष्ट आहे.साम टी व्ही वर ऍंड मॅंड शोमध्ये शाळेतील चार विद्यार्थ्यांकडून जाहिरातीचे सादरीकरण करून घेतले.आदर्श बाल व प्राथमिक मंदिर पंढरपूर शाळेतील विद्यार्थ्यांचा सोलापूर आकाशवाणी केंद्रावर रविवारच्या बाल सभा कार्यक्रमात विविध कलागुणांचा कलागुण सादरीकरणाचा कार्यक्रम सादर आणि त्यामध्ये दोन एकांकीचे सादरीकरण देखील केले आहे.सकाळ वृत्तपत्रांकडून आंतरशालेय जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन कार्यक्रमात राष्ट्रीय एकात्मता हे नाटक विद्यार्थ्यांकडून लिहून सादर करून घेतले.सोलापूर आकाशवाणीवर बालदिनानिमित्त बालकांच्या कार्यक्रमाचे।आयोजन करून त्यात आशा पाटील यांनी आठ एकांकिका सादर केल्या. किशोर मासिकात रकमा ही कथा प्रकाशित,आणि जीवन शिक्षण या शैक्षणिक मासिकात आत्मविश्वासाचे बळ हा लेख प्रकाशित कवयित्री आशा पाटील यांची आजपर्यंत एकूण १६ पुस्तक प्रकाशितआहेत.त्यामध्ये बाल साहित्याचे कविता संग्रह, कथा संग्रह, किशोर वयीन मुलांसाठी कथासंग्रह,आणि इतरही साहित्य लेखन प्रकार शब्दबध्द केला आहे. त्यांना आजपर्यंत त्यांच्या साहित्यकृतीस अतिशय सन्मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पाखरं पुस्तकास बालकुमार साहित्य मंच उदगीरचा उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार ,शेवंताबाई पुस्तकास डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा यांचेकडून उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार एकून ३० पुरस्कार प्राप्त झाले आहेत.त्यांच्यात पुढील लेखनास शुभेच्छा..

सकाळ
सोलापूर, सोमवार, १३ फेब्रुवारी २०२३

## 'बुर्ला'च्या स्किल इंडिया युनिटला मानांकन

**सोलापूर :** येथील ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात केंद्र सरकारचे स्किल इंडिया युनिटला केंद्र सरकारच्या स्किल इंडिया कडून फोर स्टार मानांकन प्राप्त झाले आहे. या युनिटमध्ये सध्या पाच कोर्सेस सुरु आहेत. या अभ्यासक्रमाचा लाभ ५४० विद्यार्थिनींना मिळत आहे. महाविद्यालयातील सोयी सुविधा विद्यार्थिनींचा कौशल्य विकास व वक्तशीरपणा विचारात घेऊन हे मानांकन देण्यात आले आहे. महाविद्यालयातील या उपक्रमासाठी प्रा. डॉ. रजनी दळवी, स्कील इंडियाच्या समन्वयक सोनाली साळुंखे, संदीप साखरे, संतोष पाटील, सचिन लवंगे, केदार हणमगोंडा यांचे सहकार्य लाभले.  महाविद्यालयात हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्रा. डॉ. रजनी दळवी, आयसीच्या समन्वयक प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. अशोक एक्कलदेवी, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी,  सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ सोलापूर, शनिवार, ७ जानेवारी २०२३

# डॉ. स्वाती घाटुळे-चौगुले यांना सावित्रीची लेक पुरस्कार प्रदान

▶ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ६ : प्रा. डॉ. स्वाती घाटुळे-चौगुले यांना लोकशाहीर जनकल्याण सेवा समिती, दिल्ली या संस्थेचा सावित्रीची लेक हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी हरियानाचे प्रसिद्ध उद्योगपती कुलविंदर सिंग, लोकसेवा जनकल्याण समितीच्या अध्यक्षा प्रतिभा सोळसे, महासचिव विक्रम सोळसे, सर्व पदाधिकारी, विविध राज्यांतून आलेले मान्यवर व पुरस्कारार्थी उपस्थित होते.



सोलापूर : डॉ. स्वाती घाटुळे-चौगुले यांना सावित्रीची लेक पुरस्कार प्रदान करताना अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, उद्योगपती कुलविंदर सिंग आदी.

या संस्थेच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, राजकीय, प्रशासकीय, महिला सबलीकरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. डॉ. घाटुळे-चौगुले यांच्या यशाबद्दल ए. आर. बुर्ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, अध्यक्ष काशिनाथ गड्डम, श्रीनिवास कोंडी, संगीता इंदापुरे, सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. या पुरस्कारामुळे प्रा. घाटुळे-चौगुले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

लोकमत सोलापूर, शुक्रवार, दि. ६ जानेवारी २०२३ २

# कर्देहळ्ळी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थेच्या सहसचिव संगीता इंदापुरे, सरपंच नागेश शिंदे, उपसरपंच अशोक माने, माजी सरपंच जगन्नाथ कोळी, तंटामुक्ती समितीचे प्रमुख शाहूराज पौळ, कार्यक्रम अधिकारी डॉ. ॲनी जॉन आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले. आभार प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी मानले.

सुराज्य सोलापूर
बुधवार, दि. २८ डिसेंबर २०२२ 3

# बुर्ला महाविद्यालयाचे आजपासून शिबीर

✓ सोलापूर : येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त विशेष श्रमसंस्कार शिबीर कर्देहळ्ळी, (ता. द.सोलापूर) येथे आयोजित केले आहे. हे शिबीर बुधवार दि. २८ डिसेंबर ते मंगळवार दि. ०३ जानेवारी या कालावधीत होणार आहे. या शिबीराचे उद्घाटन २८ डिसेंबर रोजी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

सोलापूर **तरुण भारत** ८

www.tarunbharat.org

आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बुधवार, २८ डिसेंबर २०२२

# बुर्ला कॉलेजचे कर्देहळ्ळीत आजपासून श्रमसंस्कार शिबीर

तभा वृत्तसेवा,

सोलापूर, दि. २७ डिसेंबर- ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विशेष श्रमसंस्कार शिबिराचे कर्देहळ्ळी (दक्षिण सोलापूर) येथे बुधवार, दि. २८ डिसेंबर २०२२ ते मंगळवार, दि. ३ जानेवारी २०२३ या कालावधीत होणार आहे.

'युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास' हे या शिबीराचे घोषवाक्य आहे. या शिबिराचे उद्घाटन दि. २८ रोजी उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष काशिनाथ गड्डम, सरपंच नागेश शिंदे, उपसरपंच अशोक माने, म्हाळप्पा सुरवसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**सकाळ** सोलापूर, बुधवार, ४ जानेवारी २०२३



**कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) :** येथे ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयाच्या रासेयोच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना पोलिस उपनिरीक्षक म्हाळप्पा सुरवसे.

## जनजागृतीत 'रासेयो'चे योगदान : सुरवसे

सोलापूर : खेड्यातील स्वच्छता, हरित गाव, साक्षरता व आरोग्य जागृती यामधील राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक म्हाळप्पा सुरवसे यांनी केले. कर्देहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेच्या सहसचिव संगीता इंदापुरे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच नागेश शिंदे, उपसरपंच अशोक माने, माजी सरपंच जगन्नाथ कोळी, शाहूराज पौळ आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. ॲनी जॉन आदी उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले. आभार डॉ. रजनी दळवी यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. शिरीष भोसले, डॉ. शिवानंद भांजे, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, डॉ. अशोक एक्कलदेवी, टी. एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे उपस्थित होते.

# बुर्ला महाविद्यालयात नेहरू जयंती साजरी

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. नी. जॉन, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. शिवानंद भांजे तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेर कर्मचारी उपस्थित होते.

सुराज्य
सोलापूर

सोमवार, दि. १४ नोव्हेंबर २०२२

# शेंडगे यांची करिअर कट्टाच्या जिल्हा प्रसारकपदी निवड

✔ सुराज्य/सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांची करिअर कट्टा उपक्रमाच्या जिल्हा प्रसारकपदी निवड झाली आहे. करिअर कट्टा हा उपक्रम महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्याकडून राबविण्यात येत आहे. युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम करिअर कट्टाच्या माध्यमातून राबविण्यात येतात. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या निवडीचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्राध्यापक श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ, प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



तरुण भारत

१ सोमवार, १७ ऑक्टोबर २०२२

संक्षिप्त वृत्त...

## प्राचार्य डॉ. शेंडगे यांची बिनविरोध निवड

सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर - बुर्ला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांची विद्यापीठा अधिसभेर (प्राचार्य) बिनविरोध निवड झाली आहे. तसेच प्रा. गिरीष भोसले अधिसभेवर निवडून आले आहेत. प्रा. डॉ. शिवानंद भांजे



यांची अकांऊटन्सी मंडळावर अविरोध निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, संगीता इंदापुरे, नागनाथ गंजी यांनी अभिनंदन केले.

पुण्य नगरी २
सोमवार,२२ ऑगस्ट २०२२

# 'विद्यार्थ्यांनी वाचनाबरोबर जीवनानुभवाने समृध्द व्हावे'

**सोलापूर / प्रतिनिधी**

एकीकडे तंत्रज्ञानाद्वारे जग मुठीत आणले आहे. आधुनिक तंत्राने प्रगती झाली असली तरी अस्सल आणि कसदार हरवत चालले आहे. महाविद्यालयात अनेक उपक्रमात सहभागी होताना विद्यार्थ्यांनी वाचनाबरोबरच जीवनानुभवाने समृध्द व्हावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे यांनी केले.

संगमेश्वर महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील यशस्वीतांना पारितोषिक वितरण करताना ते पुढे म्हणाले, पिढी बरबादीची कारणे शोधून वाचन, लेखन, मनन करताना जीवनाचा आनंद आपण घेतला पाहिजे. पाश्चात्त्य विद्यापीठांतही कोणती संशोधने आहेत; याचाही धांडोळा घेता घेता स्वतःचा शोध महाविद्यालयीन जीवनात घेतला पाहिजे. संध्या निंबाळ, ऐश्वर्या हावळे, सिध्दलिंग हासुरे, दिव्या घागरे, स्नेहा उपासे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पाचवे तर अंबिका हुल्ले, इरफान तांबोळी, साक्षी शिंदे, सुहासिनी डोके,



संगमेश्वर महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेतील यशस्वीतांना पारितोषिक वितरण बोलताना प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे, मल्लिनाथ साखरे, प्रा. अशोक निंबर्गी, प्रा.तानाजी घाडगे आदी.

अंजली भोई, अभिषेक बर्वे, मेधा देशमुख, प्रीती कोळी, ज्योती कोळी, कोमल चंदुकर या विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, प्रा. अशोक निंबर्गी, प्रा.तानाजी घाडगे, प्रा.रंगसिद्ध पाटील, प्रा.बसय्या हणमगाव, प्रा.शहाजी माने, प्रा.शंकर कोमुलवार, प्रा.विश्वनाथ कक्कळमेली, प्रा.हर्षवर्धन पाटील, प्रा.डॉ.श्रीदेवी पाटील, प्रा.संतोष पवार आदी उपस्थित होते. प्रा. डॉ.गणेश मुडेगावकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा.दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.सायबण्णा निम्बर्गी यांनी आभार मानले.

# अर्थशास्त्र समजण्यासाठी आकृत्यांची रांगोळी उपयुक्त

## बुर्ला महाविद्यालयात झाली स्पर्धा

**शहर संचार**

सोलापूर, दि. ६- पैसा जीवनातील महत्वाचा घटक आहे. पण त्याचे अर्थशास्त्र समजून घेणे गुंतागुंतीचे असते. अर्थशास्त्राचे विश्लेषण करण्यासाठी आकृत्यांचा उपयोग होतो. अशा आकृत्यांच्या रांगोळ्या अर्थशास्त्र समजण्यास उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महाविद्यालयातील अर्थ वाणिज्य मंडळाच्यावतीने आयोजित अर्थशास्त्रीय आकृत्यांच्या रांगोळी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. शेंडगे बोलत होते.

कार्यक्रमास वाणिज्य विभागप्रमुख शिवानंद भांजे, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. शिरीष भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेत ४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत कृष्णवेणी बिंगी व शैलजा गट्टी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. कांचन सायबोळू हिने द्वितीय क्रमांक तर पल्लवी कोंडी व अंकिता रापेल्ली हिने तृतीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. अरूणा कोडम, प्रा. नांदर्गी यांनी काम पाहिले. यावेळी प्रा.डॉ. भांजे, प्रा. शंकर राजे, प्रा. रंजना बनसुडे यांनी मार्गदर्शन केले.

पुढारी
शनिवार, ४ जून २०२२

# ए. आर. बुर्ला महाविद्यालयात वार्षिक अंकाचे प्रकाशन

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या 'पद्मप्रतिमा' या वार्षिक अंकाचे प्रकाशन संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त गणेश गुज्जा व संस्थेचे माजी सचिव अविनाश कोंडा यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. 'पद्मप्रतिमा' या वर्षिक अंकात विद्यार्थिनींच्या विविध विषयांवरील लेखनाचा समावेश असतो. या वार्षिक अंकाची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या 'सृजनरंग' नियतकालिक स्पर्धेसाठी नोंदणी केली जाते. या प्रकाशन सोहळ्यास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सुराज्य सोलापूर शुक्रवार, दि. ०३ जून २०२२ 3

## बुर्ला महिला महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी निवृत्त

सुराज्य/सोलापूर : ए. आर. बुर्ला महि महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्राजक्ता जोशी ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या. यानिमित्त त्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, विश्वस्त गणेश गुज्जा, विजय गुल्लापल्ली आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचा सहकुटूंब सत्कार करण्यात आला.

दै. तरुण भारत



## संक्षिप्त वृत्त

### प्रा.डॉ. प्राजक्ता जोशी सेवानिवृत्त

सोलापूर, दि. १ जून -

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा निरोप समारंभात सत्कार करण्यात आला. पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्री.श्रीनिवास कोंडी, नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, गणेश गुज्जा, विजय गुल्लापल्ली, अविनाश कोंडा आदी उपस्थित होते. डॉ.प्राजक्ता जोशी यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा. डॉ. नी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. तुकाराम शिंदे, संजीवनी सादुल, ऐश्वर्या गोली, विदयाजिंदम, संध्या सरवदे उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा. डॉ. रजनी दळवी तर आभार प्रा. सुरेखा बत्तुल यांनी मानले.

### बुर्ला कॉलेजच्या पद्मप्रतिमा अंकाचे प्रकाशन

सोलापूर, दि. १ जून -

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयाच्या पद्मप्रतिमा वार्षिक अंकाचे प्रकाशन संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे खजिनदार नागनाथ गंजी, गणेश गुज्जा, अविनाश कोंडा यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी संस्थेचे प्रा.डॉ.प्राजक्ता जोशी, प्रा.डॉ.नी जॉन व प्रा.डॉ.टी.एन.शिंदे उपस्थित होते.

तरुण भारत
९ | शनिवार, १४ मे २०२२

## ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचे यश

सोलापूर, दि. १३ मे- ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गांधी विचार संस्कार परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगांव यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या या परीक्षेत द्वितीय वर्ष परीक्षेत दीपिका संतोष कोंडा (बी.ए. भाग-२) प्रथम, तृतीय वर्षे परीक्षेत किरण धानय्या स्वामी (बी.ए. भाग-२) प्रथम, प्रथम वर्षे परीक्षेत वैष्णवी अंबादास पुराणिक (बी.कॉम.भाग-१) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, संगीता इंदापुरे, नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राजक्ता जोशी व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## बुर्ला महिला महाविद्यालयात राजर्षी स्मृती कार्यक्रम

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम पार पडला. प्रारंभी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे करण्यात आले. त्यानंतर १०० सेंकद स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमप्रसंगी प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. रंजना बनसुडे, सौ. सविता मल्लाडे, प्रा. नादरगी, प्रा. गायत्री बेनगिरी, प्रा. मोनिका आडम, आदी उपस्थित होते.



## अनुवादासंबंधी स्वतंत्र विद्यापीठाची गरज : डॉ. चव्हाण

सोलापूर : येणाऱ्या काळात अनुवाद हा विषय शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून पुढे येईल. तेव्हा अनुवादासंबंधी स्वतंत्र विदयापीठ स्थापन करणे गरजेचे होईल असे प्रतिपादन डॉ. अर्जुन चव्हाण यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयक्यूएसी व हिंदी विभाग यांच्याकडून एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. याप्रसंगी ते आपल्या बीजभाषणात 'अनुवादाचे महत्त्व' या विषयावर बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर चर्चासत्राच्या संयोजिका डॉ. प्राजक्ता जोशी, आयक्यूएसीच्या समन्वयक डॉ. ॲनी जॉन यांची उपस्थिती होती. भाषेत होणारे अनुवाद दर्जेदार नसतात. उत्तम अनुवादासाठी त्या भाषेच्या शब्दातील भाव महत्त्वाचा आहे. अनुवाद हा लेखकाच्यां भावना आणि अभिव्यक्तीला अंतर्भूत करणारा पाहिजे असे डॉ. चव्हाण यांनी सांगितले.

संचार, सोमवार, ९ मे २०२२ ११

राष्ट्रीय चर्चासत्र

# अनुवादासाठी स्वतंत्र विद्यापीठाची गरज

शहर संचार

सोलापूर, दि. ८- अनुवाद म्हणजे एका हृदयाला दुसऱ्या हृदयाशी जोडणे आहे. हा संवाद म्हणजे एका हृदयाची दुसऱ्या हृदयापर्यंत पोहोचण्याची हाक आहे. येणाऱ्या काळात अनुवाद हा विषय शैक्षणिक क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून पुढे येईल. तेव्हा अनुवादासंबंधी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे माजी हिंदी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी केले.



सोलापूर : बुर्ला महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना डॉ. अर्जुन चव्हाण, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात आयक्यूएसी व हिंदी विभाग यांच्यावतीने आयोजित एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात 'अनुवादाचे महत्त्व' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर चर्चासत्राच्या संयोजिका डॉ. प्राजक्ता जोशी, आयक्यूएसीच्या समन्वयक डॉ.नी जॉन आदी उपस्थित होते. डॉ. चव्हाण म्हणाले की, गुगल हे अनुवादाचे अजिबात उत्तम साधन नाही. मराठी व हिंदी भाषेतून इंग्रजी भाषेत होणारे अनुवाद दर्जेदार नसतात. उत्तम अनुवादासाठी त्या भाषेच्या शब्दातील भाव लक्षात घेणे आवश्यक असते. अनुवादासाठी भाषेच्या ज्ञानाबरोबरच त्या-त्या प्रदेशाची सामाजिक, सांस्कृतिक घटकांची माहिती असणे आवश्यक असते, असे सांगून अनुवाद हा लेखकाच्या भावना आणि अभिव्यक्तीला अंतर्भूत करणारा पाहिजे. चुकीचा अनुवाद झाल्यास त्यास गंभीर शिक्षा होऊ शकते. यामुळे अनुवादकाची साहित्याविषयी भूमिका तटस्थ पाहिजे. अलीकडे रोजगाराची उत्तम संधी म्हणून आपल्याला अनुवाद या क्षेत्राकडे पाहण्याची गरज आहे असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. प्राजक्ता जोशी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर.के वडजे यांनी केले. आभार डॉ.रजनी दळवी यांनी मानले.

सकाळ सोलापूर, शनिवार, ७ मे २०२२ २



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात चर्चासत्राचे उद्घाटन करताना काशिनाथ गड्डम, श्रीनिवास कोंडी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. प्राजक्ता जोशी आदी.

# हिंदी भाषेच्या प्रसारासाठी एकदिवसीय चर्चासत्र

## ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर ता. ६ : हिंदी भाषेच्या प्रसारासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग झाला पाहिजे. त्याचबरोबर देशी व विदेशी भाषेतील साहित्याचे हिंदी भाषेत मोठ्या प्रमाणात भाषांतर झाले पाहिजे. यामुळे या भाषेतील ज्ञान सर्वांपर्यंत पोचेल, असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ गड्डम यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात व हिंदी विभागाकडून एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. के. वडजे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रजनी दळवी यांनी आभार मानले.

सकाळ सोलापूर, बुधवार, ४ मे २०२२ २

# हिंदी राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्या 'बुर्ला'मध्ये आयोजन

## आयक्यूसी व महाविद्यालयातर्फे आयोजन

सोलापूर, ता. ३ : येथील ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयक्यूसी व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (ता. ५) हिंदी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन संस्थाध्यक्ष काशिनाथ गड्डम यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी उपस्थित राहतील. चर्चासत्राचे बीजभाषण दिल्ली येथील हिंदीचे साहित्यिक डॉ. भगवानदास मोरवाल हे करतील. पहिल्या सत्रात शिवाजी विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण हे 'अनुवादाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी डॉ. एम. डी. शिंदे हे राहतील. दुसऱ्या सत्रात डॉ. सातप्पा चव्हाण हे 'माहिती तंत्रज्ञान व हिंदी' या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गिरीश काशिदे हे राहतील.

चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव दशरथ गोप व सहसचिवा संगीता इंदापुरे उपस्थित राहतील. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे भूषवणार आहेत.

सकाळ सोलापूर, बुधवार, ४ मे २०२२ ३



सोलापूर : येथील बुर्ला महाविद्यालयात ध्वजवंदनप्रसंगी प्रा. राजेंद्र शेंडगे, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनी जॉन, प्रा. शिवानंद भांजे आदी.

## बुर्ला महिला महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए . आर . बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ . प्राजक्ता जोशी, प्रा . डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. रंजना बनसोडे, सविता मल्लाडे, प्रा. श्री. नादरगी, प्रा. गायत्री बेनगिरी, प्रा.मोनिका आडम, प्रा. भाग्यश्री पाटील, प्रा.सोनकांबळे, व्यंकटेश गाजूल, संजीवनी सादूल, शिवाजी चिंता, अनिल सग्गम, महेश घागरे, संतोष मालतुमकर, रमाकांत म्हैसूर, मिनाक्षी कुडक्याल आदी उपस्थित होते.

## एकत्व सोशल ग्रुपच्या वतीने शिरखुर्मा किट वाटप

**सोलापूर :** एकत्व सोशल ग्रुपच्यावतीने गरजू लोकांना रमजान ईद निमित्त कपडे व शिरखुर्मा वाटप करण्यात आले. यावेळी आदिनाथ चराटे, प्रशां पाटील, सौरभ जोशी, आदित्य माशाळ, अमर बसवंती, संतोष पाटील, संतोष धाकपाडे, सुरेश क्षीरसागर, दीपक करकी उपस्थित होते.

## 'बुर्ला'मध्ये राजा रविवर्मा यांच्या चित्रांचे प्रदर्शन

**सोलापूर :** राजा रविवर्मा हे जगविख्यात चित्रकार होते. त्यांच्या चित्रकलेला राजदरबाराकडून मोठी मागणी होती. त्यांची चित्रकला आजही अजरामर आहे. त्यांनी ज्या देवदेवतांची चित्रे काढली, तिच चित्रे ही जनमानसाच्या देवतेच्या प्रतिमा झाल्या. अशा या जगविख्यात चित्रकाराच्या चित्रकलेचा वारसा जतन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ . राजेंद्र शेंडगे यांनी केले. '' पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए .आर.बुर्ला महिला महाविद्यालयात जगविख्यात चित्रकार राजा रविवर्मा यांच्या निवडक चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयातील इतिहास विभाग व इतिहास संशोधक श्री.नितीन अणवेकर वस्तुसंग्रहालय यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार राजा रविवर्मा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या निवडक चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. याप्रसंगी नितीन अणवेकर यांनी राजा रविवर्मा यांच्याबाबत माहिती दिली. या चित्रप्रदर्शनास अक्कलकोट येथील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . राजेंद्रसिंह लोखंडे आणि प्रा . मल्लिनाथ अंजुनगीकर आणि डॉ . श्रीकांत येळेगावकर यांनी या चित्रप्रदर्शनास आवर्जून भेट दिली. प्रदर्शनला महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी विद्यार्थिनीनी भरभरून प्रतिसाद दिला.

सकाळ
सोलापूर, शुक्रवार, २९ एप्रिल २०२२
४

अवती भवती



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील कार्यक्रमाप्रसंगी वृक्षलागवड करताना महेंद्र घागरे व इतर मान्यवर.

## पर्यावरण समतोल राखण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

सोलापूर : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन त्याचे संगोपन करता येते. यातून दुष्काळावर मात करता येते, असे प्रतिपादन हरित मित्र परिवारचे अध्यक्ष महेंद्र घागरे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील आय.क्यू .ए. सी विभाग आणि पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष लागवडीत युवतींची भूमिका या विषयावर पर्यावरण विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र शेंडगे होते. महेंद्र घागरे म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परीचय टी.व्ही. शिंदे यांनी करुन दिला. तर आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सुरेखा बत्तुल, प्रा.सोनकांबळे, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सकाळ
सोलापूर, शुक्रवार, २९ एप्रिल २०२२
४

अवती भवती



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील कार्यक्रमाप्रसंगी वृक्षलागवड करताना महेंद्र घागरे व इतर मान्यवर.

# पर्यावरण समतोल राखण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

सोलापूर : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन त्याचे संगोपन करता येते. यातून दुष्काळावर मात करता येते, असे प्रतिपादन हरित मित्र परिवारचे अध्यक्ष महेंद्र घागरे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील आय.क्यू .ए. सी विभाग आणि पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष लागवडीत युवतींची भूमिका या विषयावर पर्यावरण विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यलयाचे प्राचार्य राजेंद्र शेंडगे होते. महेंद्र घागरे म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परीचय टी.व्ही. शिंदे यांनी करुन दिला. तर आभार डॉ. शंकर राजे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सुरेखा बत्तुल, प्रा.सोनकांबळे, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## संक्षिप्त



सोलापूर : कार्यशाळेत वृक्षारोपण करताना महेंद्र घागरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्यासह मान्यवर.

# पर्यावरणाच्या समतोलासाठी पुढाकाराची गरज : महेंद्र घागरे

**सोलापूर :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन त्याचे संगोपन करता येते. यातून दुष्काळावर मात करता येते. यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पुण्याच्या हरितमित्र परिवाराचे अध्यक्ष महेंद्र घागरे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील आयक्यूएसी विभाग आणि पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने 'वृक्ष लागवडीत युवतींची भूमिका' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. यावेळी ते बोलत होते. अध्यस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. महेंद्र घागरे म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. सध्या लागवड केलेले झाड आपल्यासाठी नसते तर पुढील पिढीसाठी उपयोगी असते. महाराष्ट्र शासनाने पर्यावरण रक्षण व वृक्षसंवर्धनासाठी 'हरित सेना' स्थापन केली आहे. यावेळी विद्यार्थिनींना काही बियाणांचे वाटपही केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी केले. आभार प्रा. डॉ. शंकर राजे यांनी मानले. यावेळी प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. सोनकांबळे, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
९ | गुरुवार, २८ एप्रिल २०२२

## बुर्ला कॉलेजमध्ये पर्यावरण व्याख्यान

सोलापूर : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करता येते. यातून दुष्काळावर मात करता येते असे प्रतिपादन मा.श्री.महेंद्र घागरे (अध्यक्ष हरित मित्र परिवार, पुणे) पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात वृक्ष लागवडीत युवतींची भूमिका या विषयावर पर्यावरण विषयक कार्यशाळेचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. राजेंद्र शेंडगे होते. महेंद्र घागरे म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे.

## बुर्ला महिला महाविद्यालयात कार्यक्रम

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान महावीर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. अॅनी जॉन, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. टी.एन. शिंदे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. डॉ. टी.व्ही. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. डॉ. स्वाती घटोळे, प्रा. डॉ. साईनाथ कबाडे, प्रा. भाग्यश्री पाटील, प्रा. सोनवले, प्रा. विनोद लंकेश्वर उपस्थित होते.

सकाळ

सोलापूर, शुक्रवार, १५ एप्रिल २०२२

५

# अभ्यास व मांडणीला वक्तृत्व स्पर्धेमध्ये महत्त्व : प्राचार्य डॉ. शेंडगे

**सोलापूर, ता. १४ :** कोणत्याही कलेसाठी रियाजाची गरज असते. योग्य पद्धतीने विषयाचे आकलन करून त्यांची योग्य मांडणी करण्यास वक्तृत्व कलेत महत्त्व आहे, असे मत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी व्यक्त केले.

येथील ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व समाज कल्याण विभागाच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार' या विषयावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेप्रसंगी प्राचार्य डॉ. शेंडगे बोलत होते. ते पुढे म्हणाले, वक्तृत्व कलेसाठी त्याची भाषा ही शुद्ध असावी लागते. सखोल अभ्यास व सभाधीटपणा अंगी यावा लागतो. वक्तृत्व हे चांगले असल्यास त्यांचा परिणाम समूहात उमटतो.

वक्तृत्व स्पर्धेत एकूण १५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यामध्ये प्रथम वर्षाराणी वसेकर, द्वितीय संध्या सरवदे तर तृतीय क्रमांक विद्या जिंदम यांनी मिळवला. या स्पर्धेत प्रा. डॉ. विनोद लंकेश्वर, प्रा. डॉ. स्मिता ढावरे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. संयोजन प्रा. डॉ. शंकर राजे व प्रा. डॉ. टी. एन. शिंदे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. कविता मुरूमकर, प्रा. डॉ. विनोद लंकेश्वर, प्रा. भाग्यश्री पाटील आदी उपस्थित होते.

संचार सोलापूर, बुधवार, ६ एप्रिल २०२२ ११

# बुर्लामध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप

**सोलापूर, दि.५-** राजेंद्र चौकातील ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील आयक्यूएसी आणि रिसर्च प्रोग्राम कमिटी यांच्यातर्फे पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांसाठी आयोजित तीस दिवसीय ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप करण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन शिक्षणतज्ज्ञ तथा माजी प्राचार्य डॉ.ह. ना. जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे हे होते. यामध्ये संशोधनाची ओळख, संशोधनाचे टप्पे, संशोधनाचे प्रकार व संशोधन पद्धती तंत्र आणि प्रकार, संख्याशास्त्रीय पद्धत, संशोधनाचे तत्त्वज्ञान, प्रकाशनाची मूल्ये, साहित्य चौर्य व शैक्षणिक अखंडता तसेच संशोधनाची साधने, बौद्धिक संपदा हक्क, शोध निबंधलेखन आदी संशोधनाच्या विविध विषयांवर तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने झाली. यात जवळपास शंभर विद्यार्थी सहभागी झाले होते.

# बुर्ला कॉलेजच्या नियतकालिकेस पुरस्कार

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाच्या 'पद्मप्रतिमा' नियतकालिकेतील विद्यार्थिनींच्या लेखनास ११ पारितोषिके प्राप्त झाली आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या 'सृजनरंग' नियतकालिक स्पर्धेसाठी याची नोंदणी केली होती. या स्पर्धेतील मराठी विभागातून तुलसी येमूलच्या विनोदी लेखास प्रथम क्रमांक, भावना आमंची हिच्या अर्थकारणावरील लेखास प्रथम, प्रियंका देवळेच्या व्यक्ती चित्रास तृत्तीय, विद्या बिरु हिने घेतलेल्या मुलाखतीस तृत्तीय क्रमांक मिळाला. हिंदी विभागातून लक्ष्मी रापर्तीच्या लेखास तृत्तीय, इंग्रजी विभागातून लावण्या बुधारामच्या कवितेस प्रथम, उमा हेगडेच्या अर्थकारणावरील लेखास तृत्तीय, वृषाली परचंडेच्या व्यंगचित्रास तृत्तीय, सामाजिकशास्त्र विभागतून स्वप्नाली गुजरच्या लेखास तृत्तीय, पर्यावरणशास्त्र विभागातून लक्ष्मी रापर्तीच्या लेखास तृत्तीय आणि वाणिज्य विभागातील मिसबा शेखच्या लेखास तृत्तीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप यांनी अभिनंदन केले.

तरुण भारत
१ | गुरुवार, ३१ मार्च २०२२

## बुर्ला कॉलेजमध्ये गड्डम यांना श्रध्दांजली

सोलापूर दि. ३० मार्च-

ए.आर.बुर्ला महिला महाविदयालयात संस्थेचे विश्वस्त लक्ष्मीकांत गड्डम यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. शिंदे टि.एन., डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. नी जॉन, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. अशोक यक्कलदेवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. वाघमारे पी. आर., प्रा. शंकर राजे, रंजना बनसुडे रमाकांत म्हैसूर उपस्थित होते

संचार ,मंगळवार, १५ मार्च २०२२ ११

शहर संचार

# 'बुर्ला'च्या श्रमसंस्कार शिबिराचा उद्या कर्देहळ्ळी येथे समारोप

## सात दिवसात राबविले विविध उपक्रम

▶ सोलापूर,दि.१४ -येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा १६ मार्चला सकाळी दहा वाजता समारोप केला जाणार आहे.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. या शिबिराचे १० ते १६ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पर्यावरण संरक्षणात युवकांची भूमिका, जगणं आनंदाचे, राष्ट्राच्या विकासात महिलांचे योगदान, महिला व युवती मेळावा, रक्तदान शिबिर आदी उपक्रम राबविण्यात आले असून महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या विशेष श्रमदानातून ग्रामस्वच्छता करून वृक्षारोपणही करण्यात आले आहे. तसेच गावात जनजागृतीपर कार्यक्रमही घेण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.आर. के. वडजे, प्रा.डॉ. ॲनी जॉन यांच्यासह अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

शनिवार,५ मार्च २०२२

पुण्य नगरी २

# श्रुतिका कुसेकर हिची निवड

**सोलापूर / प्रतिनिधी**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात बी.ए.भाग-२ मध्ये शिकत असलेल्या श्रुतिका कुसेकर हिची राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मिक शिबीरासाठी निवड झाली. ३ ते ९ मार्च २०२२ या कालावधीत कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे हे शिबीर होत आहे. संस्थाध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सरचिटणीस दशरथ गोप, सहचिटणीस संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. आर. जे. वडजे, डॉ. ॲनी जॉन आदींनी तिचे अभिनंदन केले.





**सोलापूर : ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिनानिमित्त कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे व पदाधिकारी.**

## भाषा अभिव्यक्तीचे साधन : प्रा. डॉ. शोभणे

**सोलापूर :** कोणतीही व्यक्ती आपल्या मातृभाषेतूनच सहजपणे व्यक्त होत असते. मराठी भाषा ही सातत्याने प्रवाहित होत असते. मराठी भाषेबद्दल अभिमान बाळगणे गरजेचे आहे. परंतु, आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी ही व्यावहारिक भाषा म्हणून ओळखली जाते. ती भाषासुद्धा आत्मसात केली पाहिजे, असे प्रतिपादन साहित्यिक प्रा. डॉ. रवींद्र शोभणे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने प्रसिद्ध मराठी कवी वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीदिनी मराठी भाषा गौरवदिनानिमित्त प्रा. डॉ. रवींद्र शोभणे यांचे 'भाषा आणि संस्कृती' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. ते म्हणाले की, मराठी साहित्याची महानता ओळखण्यासाठी आणि त्याचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. मराठी भाषेला दोन हजार वर्षांपूर्वीची परंपरा असून ज्ञानपीठकार वि.वा. शिरवाडकर यांच्या साहित्यावरच आजच्या साहित्यिकांची पिढी उभी आहे. यानिमित्ताने वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. काव्यवाचन स्पर्धा व भित्तीपत्रकाचे प्रकाशन झाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, जगामध्ये ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य आवश्यक आहे. या संवादकौशल्यावरच विद्यार्थ्यांचे भवितव्य व यश अवलंबून आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात. प्रास्ताविक प्रा. डॉ. कविता मुरुमकर यांनी केले. आभार प्रा. विनोद लंकेश्वर यांनी मानले.

संचार
मंगळवार, १ मार्च २०२२ ५

## श्रुतिका कुसेकर हिची राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड



सोलापूर, दि. २८- पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील बी.ए. भाग एक मधील विद्यार्थिनी श्रुतिका कुसेकर हिची राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड झाली आहे.

हे शिबिर ३ ते ९ मार्च रोजी कलबुरगी येथे आयोजित करण्यात आले आहे. या निवडीबद्दल कुसेकरचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, संगीता इंदापुरे, नागनाथ गंजी, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. आर. के. वडजे, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

४ पुढारी MY सोलापूर बुधवार, २ मार्च २०२२

## कुसेकरची राष्ट्रीय सेवा योजनेसाठी निवड



सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील श्रुतिका कुसेकर (बी.ए. भाग - २) या विद्यार्थिनीची राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड झाली आहे. ३ ते ९ मार्च याकालावधीत हे शिबिर गुलबर्गा विद्यापीठ गुलबर्गा येथे आयोजित केले आहे. श्रुतिका कुसेकर या विद्यार्थिनीचे संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, डॉ. वडजे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

, मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२ शहर-जिल्हा पुढारी ३

## बुर्ला महाविद्यालयात शिवजयंती साजरी

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमानिमित्त प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते छत्रपतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.प्राजक्ता जोशी, डॉ. ॲनीजॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. शिरीष भोसले, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. जी. एन. शिंदे, डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. शंकर राज, प्रा. डॉ. रंजनी दळवी, रंजना बनसोडे, सविता मल्लाडे, डॉ. स्वाती घटूळे, गायत्री बेनगिरी आदी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ

सोलापूर, रविवार, २० फेब्रुवारी २०२२ ३

## बुर्ला महाविद्यालय

सोलापूरः बुर्ला महाविद्यालयात प्राचार्य ड़ॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. ऑनी जॉन, प्रा. सुरेखा बत्तुल, डॉ. शिवानंद भांजे, डॉ. शिरीष भोसले, डॉ. अशोक एक्कलदेवी, डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, डॉ. शंकर राज, डॉ. रजनी दळवी, प्रा. रंजना बनसोडे, प्रा. सविता मल्लाडे, डॉ. स्वाती घटूळे, प्रा. गायत्री बेनगिरी, प्रा. आडम, प्रा. सानवले यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले.

संक्षिप्त



सोलापूर : ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील कार्यक्रमाप्रसंगी दीप प्रज्वलन करताना चंद्रिका चव्हाण. यावेळी डॉ. शिरीष भोसले, डॉ. शिवानंद भांजे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. डॉ. शंकर राजे आदी.

# महिलांना उद्योगात मोठ्या प्रमाणावर संधी : उद्योजिका चंद्रिका चव्हाण

**सोलापूर :** महिलांनी उद्योग व्यवसायातील संधी प्राप्त करण्यासाठी मनातील सर्व प्रकारचा न्यूनगंड सोडून दिला पाहिजे. समाज काय म्हणेल ही पारंपरिक मानसिकता सोडून दिली पाहिजे. मनाच्या घुसमटीतून बाहेर पडले पाहिजे. मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजे. महिलांनी हे बदल आत्मसात केले, तर उद्योग व्यवसायात अनेक संधी महिलांची वाट पाहत आहेत, असे प्रतिपादन उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा चंद्रिका चव्हाण यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात अर्थ-वाणिज्य मंडळाकडून 'उद्योगातील महिलांची संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. यावेळी आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. शिरीष भोसले, डॉ. शिवानंद भांजे, प्रा. रंजना बनसुडे, प्रा. उमाशंकर नादरगी, प्रा. डॉ. शंकर राजे, डॉ. तुकाराम शिंदे, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, डॉ. रजनी दळवी, डॉ. टी.एन. शिंदे उपस्थित होते.

चव्हाण म्हणाल्या की, गरीब किंवा महिला म्हणून जन्माला येणे हा काही गुन्हा नाही, तर गरिबीतच राहणे हा गुन्हा आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज नसते. अगदी एक हजार रुपये असतील तरी उद्योग सुरू करता येतो. कोणताही व्यवसाय करताना प्रथम लाजणे बाजूला ठेवले पाहिजे. स्वत:मधील कौशल्याचा शोध घेऊन त्याचा विकास केला पाहिजे. समाजाच्या बदलत्या गरजा विचारात घेऊन कोणताही व्यवसाय उद्योग करता येतो. पण यासाठी महिलांकडे जिद्द, चिकाटी, व्यावसायिक व उद्योगप्रिय दृष्टिकोन हवा.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, महिलांनी भीती न बाळगता मनातील विचार मोकळेपणाने मांडले पाहिजेत. महिलांमध्ये विचार मांडण्याचे आणि व्यक्त होण्याचे धाडस आले, तर महिला अनेक क्षेत्रांत चमकतील आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतील.

पुढारी ५ १५ फेब्रुवारी २०२२

# बुर्ला महिला महाविद्यालयाची निवड

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाची 'करिअर कट्टा विभागीय स्पर्धा २०२१-२२' अंतर्गत पारितोषिकासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती-तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' हा उपक्रम घेण्यात आला होता. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील २०० विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत. करिअर वर्धापनदिनानिमित्त २५ फेब्रुवारी रोजी फिरोज शहा मेहता हॉल, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सन्मान सोहळा आयोजित केला आहे. या यशाबाबत संस्थाध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी यांनी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. अशोक एक्कलदेवी यांच्यासह प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

सकाळ

सोलापूर, शुक्रवार, २१ जानेवारी २०२२ ३

# मानवाला केंद्रभूत ठेवून संशोधन व्हावे : प्रा. डॉ.संजय गायकवाड

सोलापूर, ता. २० 'संशोधन हे समाजाला उपयोगी पडणारे औद्योगिक क्रांतीनंतरचा काळ हा सुवर्णयुगाचा मानला जातो. मानवकेंद्रीत संशोधनामुळे सामाजिक शास्त्राचा दर्जा मिळू शकतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ.संजय गायकवाड यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र विभागाच्या ऑनलाइन उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजेंद्र शेंडगे होते. ते पुढे म्हणाले की, संशोधन हे प्रामुख्याने अद्वितीय असावे. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुरेखा बत्तुल यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. टी.एन. शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिरिष भोसले, प्रा.डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

सकाळ

सोलापूर, शुक्रवार, १४ जानेवारी २०२२ २

## बुर्ला महाविद्यालयातर्फे अभिवादन

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद व चार हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. अशोक एक्कलदेवी, प्रा. डॉ. टी. वही. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. रंजना बनसोडे, तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharat.org
शुक्रवार, २४ डिसेंबर २०२१
१०



ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धा निवड चाचणी पार पडली.

# बुर्ला महाविद्यालयात योगासन स्पर्धा निवड चाचणी

**सोलापूर दि. २३ डिसेंबर-**

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धा निवड चाचणी पार पडली. उद्घाटन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुरेश लांडगे, डॉ. मुश्ताक शेख, डॉ.आनंद निंबाळकर, प्रा. एम. बी. पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सुरेश लांडगे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. यावेळी प्राध्यापक, जयंत गाजूल उपस्थित होते

पुण्य नगरी २ | पुणे - शनिवार,४ डिसेंबर २०२१

# बुर्ला महिला महाविद्यालयातील शिबिरात ४२ जणांचे रक्तदान

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इरप्पण्णा बोल्ली रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ४२ जणांनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते, श्री मार्कंडेय चॅरिटेबल ॲन्ड मेडिकल ट्रस्टचे अशोक इंदापुरे, संजीव चिप्पा, श्रीरेखा गुंडेटी, प्रभावती दोंतुल, अजय रिकमल्ले, प्रियांका चिप्पा, देवकी मुशन यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजेंद्र वडजे, प्रा. डॉ. ॲनी जॉन यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर. गुरुवार, २ डिसेंबर २०२१ | ४

# दक्षता, शुद्ध चारित्र्यामुळे एड्स पूर्णपणे टाळता येतो

## कर्करोगतज्ज्ञ डॉ. कुमठेकर यांचे प्रतिपादन



ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील कार्यक्रमात डॉ. शिरीष कुमठेकर, के. एम. जमादार, डॉ. आयेशा रंगरेज आदी.

प्रतिनिधी | सोलापूर

असुरक्षित लैंगिक संबंध, रक्त घटकांचे संक्रमण, दूषित सुया व सिरींजचा वापर, एड्सग्रस्त मातेकडून बाळास या चार मार्गाने माणसाला एड्स होतो. एड्सचा विषाणू माणसाच्या रोग प्रतिकारशक्तीवर हल्ला करून ती क्षीण करतो. पण दक्षता व एक पती, एक पत्नी व्रत पाळल्याने एड्ससारखा घातक रोग टाळता येतो, असे मत कर्करोग तज्ञ डॉ. शिरीष कुमठेकर यांनी व्यक्त केले.

जागतिक एड्स दिनानिमित्त ते एड्स कारणे, लक्षणे, परिणाम व उपाय योजना या विषयावर ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, महाविद्यालय, सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल १५०, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान झाले.

मंचावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूरचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार, सचिव डॉ. आयेशा रंगरेज, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, टेबलचे खजिनदार ओंकार पत्की, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस, कपिल जाजू, निखिल सुराणा, भव्य शहा, एड्स नियंत्रण संस्थेचे सांख्यिकी विभाग प्रमुख दिनेश राठोड, सुपरवायझर कृष्णा सकट, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रीती ससाने, फॅमिली प्लॅनिंगचे युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत, अपेक्षा सावंत, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते

सुराज्य सोलापूर, दि. ०७ जानेवारी २०१९ 5

# लगट करणाऱ्या पुरुषांची कानउघाडणी करावी : पो.नि. शिरगिरे

सोलापूर : 'लाखात एखादा पुरुष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरुष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कानउघाडणी करावी. यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाही, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक वंदन शिरगिरे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस उन्नत दिनानिमित्त महिलांची कायदेविषयक जनजागृती हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी त्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.

शिरगिरे पुढे म्हणाल्या, महिलांनी स्वत:वर ओढवणारा वाईट प्रसंग टाळण्यासाठी स्वत:च काही उपाय केले पाहिजेत. जिथे कोणीच नाही अशा ठिकाणी जाण्याचे टाळलेच पाहिजे. खरे तर पोलिसांना गुन्हेगारांनी घाबरले पाहिजे, नागरिकांनी नाही. म्हणूनच एखाद्या पुरुषाकडून लज्जा वाटेल म्हणजे आपल्याला अपमान वाटणे, राग येणे रडू येणे असे कृत्य होत असेल तर तत्काळ महिलांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ महाडिक यांनी नागरिकांनी कधीही आवाज द्यावा. पोलीस तत्काळ त्यांच्या मदतीला येतील, असे सांगून




म्हणाले, मोबाईल हॅकरचा धोका वाढला आहे. यामुळे अनोळखी व्यक्तीच्या हाती मोबाईल देऊ नये, अनावश्यक ॲप घेऊ नयेत, एटीएम कार्ड, क्रेडिट कार्डचा सांभाळून वापर करावा, शादी डॉट कॉम, डेटिंग साईट, व्हॉटस्ॲप, फेसबूक व इतर सोशल साईटवर अनोळखी व्यक्तीशी संपर्क ठेवू नये. अन्यथा केवळ आर्थिकच नाही तर जीवनभराची फसवणूक होऊ शकते. याचवेळी ॲड. सत्यनारायण माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक पो.नि. अमोद भुजबळ यांनी केले तर, सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले.कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सोलापूर
तरुण भारत
, दि. ८ जानेवारी २०१९ ११




# महिलांनी पुरुषांची कानउघाडणी करावी

## पो नि. शिरगीरे यांचे मत

**सोलापूर, दि. ७ जानेवारी**

लाखात एखादा पुरुष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरुष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कानउघाडणी करावी. यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाहीत असे प्रतिपादन पोलिस निरिक्षक वंदना शिरगीरे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिस उन्नत दिनानिमित्त महिलांची कायदेविषयक जनजागृती ही कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी त्या विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते.

याप्रसंगी पो. उपनिरिक्षक श्रीनाथ महाडिक यांनीही मनोगत व्यक्त केले. याचवेळी ॲड. सत्यनारायण माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस निरिक्षक अमोद भुजबळ यांनी केले. सुत्रसंचालन व प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थीनी उपस्थित होते.

संचार २ सोलापूर, मंगळवार ८ जानेवारी २०१९

# संरक्षणाच्या कायद्याबाबत महिलांनी जागरूक राहावे

शहर संचार

सोलापूर, दि. ७- एखाद्या पुरुषाकडून महिलांना लज्जा वाटेल असा प्रसंग घडत असेल तर महिलांनी तत्काळ पोलिसांकडे तक्रार केली पाहिजे. संरक्षणाच्या कायद्याबाबत महिलांनी सदैव जागरूक राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक वंदना शिरगिरे यांनी केले.

येथील अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात स्त्री अभ्यास केंद्र आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस उन्नत दिनानिमित्त 'महिलांची कायदेविषयक जनजागृती' या विषयावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे हे होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ महाडिक, अॅड. सत्यनारायण माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिरगिरे पुढे म्हणाल्या की, लाखात एखादा पुरूष दुष्कृत्य करणारा असतो. असा पुरूष लगट करू लागला, स्पर्श करू लागला तर महिलांनी त्याची कठोर शब्दात कान उघाडणी करावी. त्यामुळे त्याचे आणखी धाडस वाढणार नाही आणि महिला अत्याचाराच्या बळी ठरणार नाहीत. महाडिक म्हणाले की, नागरिकांनी कधीही आवाज द्यावा. पोलीस तत्काळ त्यांच्या मदतीला येतील. मोबाइल हॅकरचा धोका वाढला आहे. त्यामुळे अनोळखी व्यक्तीच्या हाती मोबाइल देऊ नये. अनावश्यक ॲप घेऊ नयेत. एटीएम कार्ड, क्रेडीट कार्डचा सांभाळून वापर करावा. शादी डॉट कॉम, डेटिंग साइट, व्हॉटस्ॲप, फेसबुक व इतर सोशल साइटवर अनोळखी व्यक्तीशी संपर्क ठेवू नये, अन्यथा केवळ आर्थिक नाही तर जीवनभराची फसवणूक होऊ शकते.

अॅड. माने यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक अमोद भुजबळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. रजनी दळवी यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी मानले.




सोलापूर : महिलांची कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमात पोलीस निरीक्षक वंदना शिरगिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्रीनाथ महाडिक, अमोद भुजबळ, डॉ. राजेंद्र शेंडगे व अन्य.

सकाळ
सोलापूर, बुधवार,
१६ जानेवारी २०१९ ४

## एआर बुर्ला महिला महाविद्यालयाचे संस्कार परीक्षेत यश

**सोलापूर, ता. १५ :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाने गांधी विचार संस्कार परीक्षेत यश संपादन केले.

जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनच्या वतीने ही परीक्षा घेण्यात आली. त्यात स्वाती बिटला हिने जिल्हास्तरीय परीक्षेत प्रथम तर मंजूषा गंपले हिने तृतीय क्रमांक मिळविला. प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांनी त्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे आदींनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

संचार
बुधवार १६ जानेवारी २०१९ ५

## बुर्ला महाविद्यालयाचे संस्कार परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १५-** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गांधी विचार संस्कार परीक्षेत यश मिळविले.

जळगाव येथील गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे ही परीक्षा घेण्यात आली होती. त्यामध्ये बुर्ला महाविद्यालयातील बी.कॉम भाग-१ च्या स्वाती बिटला हिने प्रथम तर मंजूषा गंपले हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्रीधर चिट्याल, खजिनदार दिनेश यन्नम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी अभिनंदन केले.

# महिलांच्या पाठीशी पुरुषांनी ठामपणे उभे राहावे : डॉ. कोकरे



**सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकांत कोकरे. यावेळी उपस्थित मान्यवर.**

**सोलापूर :** स्त्रियांच्या यशासाठी पुरुषांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, त्याचबरोबर समाजाने स्त्रियांचा आदर केला पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत कोकरे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात अनुसयाबाई बुर्ला यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. कोकरे बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, श्रीधर चिट्याल, दिनेश यन्नम, श्रीनिवास आकेन, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, नरेश श्रीराम, शशिकला आकेन, इंदिरा रच्चा, सुवर्णा येमूल, डॉ. आर. के. वडजे, डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. शिरीष भोसले आदी उपस्थित होते.

तरुण भारत
www.tarunbharat.org
११
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महा
गुरुवार, ३१ जानेवारी २०१९

# शिक्षणातील ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करावा

## प्राचार्या डॉ. किर्ती पांडे



सोलापूर, दि. ३० जानेवारी-

विद्यापीठ स्तरावर जे अभ्यासक्रम तयार केले जातात ते व्यवहारात उपयोगी ठरणारे असतात. विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम पण विषयाच्या पलिकडे जावून विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी ज्या विषयाचे ज्ञान आत्मसात केलेले असते. त्याचा व्यवहारामध्ये उपयोग करावा असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्राचार्या डॉ. किर्ती पांडे यांनी केले.

बुर्ला महिला महाविद्यालयात बी. कॉम. भाग ३ व बी.ए. भाग ३ च्या सुधारीत अभ्यासक्रमावर आधारीत विद्यापीठस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे अध्यक्षस्थानी होते. पुढे बोलताना डॉ. किर्ती पांडे म्हणाल्या की, अभ्यासक्रम हे केवळ परीक्षेपुरते मर्यादित राहू नयेत. विद्यार्थ्यांनी समजात जावून ज्ञान आत्मसात करावे. विद्यार्थ्यांनी अशा पध्दतीने अभ्यास करण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत बी. कॉम व बी.ए. भाग ३ सुधारित अभ्यासक्रमावर चर्चा झाली. कार्यशाळेत सोलापूर विद्यापिठ कार्यक्षेत्रातील विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे म्हणाले की, अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी आणि विविध संज्ञा समजावून सांगण्यासाठी अशा कार्यशाळांचा उपयोग होतो. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवानंद भांजे यांनी केले.

सकाळ सोलापूर, रविवार, २४ फेब्रुवारी २०१९ ३

## ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी विवेकानंद केंद्र यांच्या वतीने ग्रंथप्रदर्शन पार पडले. त्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. डॉ. प्राजक्ता जोशी, प्रा. सविता मल्लाडे, प्रा. डॉ. शंकर राजे, स्वामी विवेकानंद केंद्राचे सदस्य ऋत्विक कुर्ले, केदार कलशेट्टी, शेखर निंगदळ्ळी आदी उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील इंग्रजी व मराठी ग्रंथ, ताणतणावाचे व्यवस्थापन, गीता, व्यक्तिमत्त्व विकास आदी विषयांवरील पुस्तकांचा या ग्रंथप्रदर्शनात समावेश करण्यात आला होता.

# कुंभार यांना जीवनगौरव तर अणवेकर यांना इतिहास संशोधक पुरस्कार जाहीर


आनंद कुंभार नितीन अणवेकर

सोलापूर : विद्यार्थी इतिहास परिषदेच्यावतीने इतिहास विषयात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आनंद कुंभार यांना जीवनगौरव, तर शिलालेख, शिल्प संवर्धन केल्याबद्दल नितीन अणवेकर यांना इतिहास संशोधन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात मंगळवार, २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यार्थी इतिहास परिषदेचे राज्यस्तरीय सोळावे अधिवेशन होणार आहे. या कार्यक्रमामध्ये पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. अधिवेशनास लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य प्राचार्य डॉ.वसंतराव वनसुडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, इतिहास संशोधिका डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, प्रा. एम. एम. मस्के उपस्थित राहणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली करावीत : बनसुडे

## आनंद कुंभार व अणवेकर यांचा सन्मान

**शहर संचार**

**सोलापूर, दि. २७-** आयुष्यभर इतिहासाचे संशोधन करून नवीन पैलू उजेडात आणणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार हे सोलापूरचे भूषण आहेत, तर नितीन अणवेकर यांनी शिल्प व शिलालेख संवर्धन करून मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली केली पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. वसंतराव बनसुडे यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यार्थी इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, समन्वयक डॉ. टी. एन. शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार यांना जीवनगौरव तर नितीन अणवेकर यांना इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. शेंडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नवनवीन शोध घेण्याची वृत्ती ठेवली पाहिजे. त्यामुळे संशोधनातील अभिरूची जास्त मोहक होते. दर्जेदार संशोधन केल्याने समाज परिवर्तनास चालना दिली पाहिजे.

कुंभार म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या जीवन गौरव पुरस्कारामुळे जीवन कृतकृत्य झाले आहे. यापुढेही इतिहास विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करून इतिहास अभ्यासास गती प्राप्त करून देईन. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र वडजे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटुळे यांनी केले. परिषदेचे अध्यक्ष निकिता शितोळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास राज्यभरातील १७० प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनात ४७ शोधनिबंधांचे विद्यार्थ्यांनी वाचन केले.



**सोलापूर : बुर्ला महिला महाविद्यालयातील विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशनात आनंद कुंभार यांना जीवनगौरव तर नितीन अणवेकरांना इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी डॉ. वसंतराव बनसुडे, डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. के. एम. जमादार आदी**

पुरोगामी विचाराचे
एकमत
गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१९

▶प्रा. डॉ. बनसुडे यांचे प्रतिपादन ▶इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन

# विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली करावीत



**प्रतिनिधी / सोलापूर :**

आयुष्यभर इतिहासाचे संशोधन करुन नवीन पैलू उजेडात आणणारे इतिहास संशोधक आनंद कुंभार हे सोलापूरचे भूषण आहेत. तर नितीन अणवेकर यांनी शिल्प व शालालेख संवर्धन करुन योगदान दिले आहे. म्हणून त्यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी इतिहासाची दालने खुली केली पाहिजेत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. वसंतराव बनसुडे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात विद्यार्थी इतिहास परिषदेचे १६ वे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते. यावेळी शुभारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडे होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. के. एम. जमादार, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. नभा काकडे, प्रा. नामदेवराव गरड, समन्वयक डॉ. टी. एन. शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक आनंद कुंभार यांना जीवन गौरव तर नितीन अणवेकर यांनी इतिहास संशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ते पुढे म्हणाले की, इतिहास मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. इतिहासाची पाळेमुळे भूतकाळात रुतलेली असतात. त्याचा वेध घेतला पाहिजे आणि संशोधन गतीमान होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र वडजे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. स्वाती घाटुळे यांनी केले. आभार परिषदेच्या अध्यक्षा निकीता शितोळे यांनी मानले.

कार्यक्रमास डॉ. जयश्री कुलकर्णी उस्मानाबाद, डॉ. शीला स्वामी मुरुम, डॉ. शहाजहान शेख औसा, डॉ. देशमुख तुळजापूर, प्रा. लक्ष्मी रेड्डी, डॉ. ज्योती सुरवसे, प्रा. सुमन केंद्रे, डॉ. युवराज सुरवसे, प्रा. बिरुनगे, डॉ. साईनाथ कबाडे यांच्यासह राज्यभरातील १७० प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनात ४७ शोधनिबंधाचे विद्यार्थ्यांनी वाचन केले.

लोकमत
दि. २८ फेब्रुवारी २०१९ २

## इतिहास परिषदेसाठी दोघांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित अे. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयोजित इतिहास परिषदेसाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात निकिता शितोळे, अमृता गांगुर्डे, सोनाली शिंगे, कोमल भोसले, शारदा कसबे, तेजस्विनी धुळम, अश्विनी क्षीरसागर यांची निवड करण्यात आली. अधिवेशन यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. टी.एन. शिंदे, डॉ. स्वाती घाटुळे हे प्रयत्न करीत आहेत.

## ह. दे. प्रशालेतील विद्यार्थ्यांना निरोप

लोकमत न्यूज नेटवर्क